# शिक्षण संक्रमण

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

मार्च २०१५ : शके-१९३६

♦ संपादक ♦

**श्री. कृष्णकुमार भा. पाटील**
सचिव, राज्यमंडळ, पुणे

कार्यकारी संपादक
श्री. अनिल गुंजाळ
सहसचिव, राज्यमंडळ, पुणे

♦ संपादन सहाय्यक ♦
श्री. गोवर्धन सोनवणे
डॉ. उमेश प्रधान
डॉ. स्नेहा जोशी
डॉ. जयश्री अत्रे
डॉ. सुलभा विधाते

♦ सल्लागार मंडळ ♦

| | |
|---|---|
| **श्री. गंगाधर म्हमाणे** | **अध्यक्ष** |
| श्री. लक्ष्मीकांत पांडे | सदस्य |
| श्री. सं. मा. गणोरकर | सदस्य |
| श्री. सुनील चौहान | सदस्य |
| श्री. द. गो. जगताप | सदस्य |
| श्री. भि. पां. कांबळे | सदस्य |
| श्री. सु. ह. डेरे | सदस्य |

## लेखानुक्रम



| | | |
|---|---|---|
| हार्दीक अभिनंदन ! | ........... | ५ |
| जरी आज ती राजभाषा असे | डॉ. न. म. जोशी | ८ |
| मराठीचा अभ्यासक्रम काही विचार | प्रा. वसंत आ. डहाके | १३ |
| मराठीच्या विकासासाठी तंत्रज्ञानाची जोड आवश्यक | डॉ. माधवी वैद्य | १७ |
| कवीतेतील सौंदर्यस्थळे | प्रा. नीला कदम | २१ |
| लोकसाहित्याची भाषा आणि स्त्रीगीते | डॉ. मंगला बाबर | २५ |
| ग्रामीण भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचार एक आस्वाद | श्री. सदानंद देशमुख | ३० |
| प्रसारमाध्यमांची भाषा | श्री. संतोष शेणई | ३३ |
| मराठी पाट्या व मराठी लेखन | प्रा. विश्वनाथ बाहेकर | ३५ |
| व्यावहारिक मराठी व करिअर संधी | प्रा. सुजाता शेणई | ३७ |
| अखिल मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षांची यादी | ........... | ४० |
| साहित्य अकादमी पुरस्कारांचे मानकरी यांची यादी | ........... | ४२ |
| मराठी भाषेच्या अध्यापनाची अनौपचारिक पद्धत | प्रा. उत्कर्षा मल्ल्या | ४४ |
| माझे मराठी अध्यापन आणि गमती-जमती | प्रा. संजीवनी बोकील | ४६ |
| मराठी अभंग | प्रा. नि. ना. रेळेकर | ४९ |
| भारूड - एक अनोखा वाङ्मयीन प्रकार | श्री. अविनाश हळबे | ५१ |
| मानवी जीवनमूल्ये रुजविण्याचे साधन | डॉ. स्नेहा जोशी | ५३ |
| शिक्षणाचे माध्यम - वास्तव व उपायांची गरज | प्रा. राजकुंवर सोनवणे | ५५ |
| महिला सक्षमीकरणाची वाटचाल | सौ. निर्मला बऱ्हाटे | ५९ |
| पहिल्या भारतीय महिलांची यादी | श्री. विवेक चव्हाण | ६३ |
| प्रतिक्रिया | ........... | ६५ |



'शिक्षण संक्रमण' हे मासिक मालक, महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकंडरी ॲण्ड हायर सेकंडरी एज्युकेशन, पुणे यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. कृष्णकुमार भास्करराव पाटील यांनी **डिलाईट प्रिंटर्स**, १६-ए, हिमालया इस्टेट, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ येथे छापून स.नं. ८३२-ए, फायनल प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक : श्री. कृष्णकुमार भास्करराव पाटील**

- वर्गणी मनीऑर्डरने किंवा ड्राफ्टने पाठवावी. **वार्षिक वर्गणी :** ♦ माध्य.शाळा/क.म.विद्यालय/शिक्षक/पालक रु.२००/- किरकोळ अंक किंमत रु. २०/-
**Email :** monthly@msbshse.ac.in | **Website :** http.//www.mahahsscboard.maharashtra.gov.in | फोन : ०२०-२५७०५०००

- अंकातील लेखांचे अन्यत्र कोठेही पुनर्मुद्रण करण्यासाठी राज्यमंडळाची पूर्वानुमती घेणे आवश्यक आहे.

**महत्त्वाचे : या अंकात व्यक्त झालेली मते त्या त्या लेखकाची स्वतंत्र असतात; मंडळ त्यास सहमत असेलच असे नाही.**

# मनोगत



*लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी ।।*
*लाभले आम्हास भाग्य ऐकतो मराठी ।।*

'मराठी' महाराष्ट्राची भाषा या मायबोली मराठी चा विशेषांक हेच सदर अंकाचे वैशिष्ट्य आहे. झाडाची मूळे जितकी खोलवर रूजलेली असतील तितकी झाडाची वाढ अधिक उत्तम होते. ती मूळेच त्या वृक्षाचा बहर पेलण्यास समर्थ असतात. त्याचप्रमाणे मातृभाषेवर प्रभुत्व असेल तर ज्ञानवृक्षाचा विकास व कोणत्याही विषयाचे अध्ययन, आकलन सुलभ होते.

मराठी भाषेतील साहित्यभांडार खूप समृद्ध आहे. त्या साहित्याला खूप मोठी परंपरा आहे, इतिहास आहे. संतवाङ्मयासारखे अमोल लेणे मराठी भाषेचा अभिमान आहे. या वैभवाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे ही शिक्षकांचीच जबाबदारी आहे. आज विद्यार्थीवर्ग वाचनापासून दूर जात आहे असे आपण नेहमीच ऐकतो आणि हळहळतो. खर म्हणजे नुसते हळहळण्यापेक्षा कृती व्हायला हवी. कुतूहल, जिज्ञासा आणि अनुभव ही त्रयी, भाषा समृद्धीची यश:सूत्री आहे. ही विद्यार्थ्यांमध्ये रुजवून वाचनसंस्कृतीचा विकास साध्य झाला तरच आजचा विद्यार्थी या आनंदापासून वंचित राहणार नाही. शासन, राज्यमंडळ सर्व विषयांना समान न्याय मिळावा म्हणून सदैव प्रयत्नशील असते.

साहित्यक्षेत्रातील सर्वोच्च सन्मान 'ज्ञानपीठ' पुरस्काराने सिद्धहस्त प्रतिभावंत साहित्यिक श्री. भालचंद्र नेमाडे यांना सन्मानित करण्यात आले. सर्व साहित्यप्रेमीतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन! दि. ८ मार्च 'महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. साहित्य क्षेत्राबरोबरच सर्वच क्षेत्रात आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवणाऱ्या सर्व स्त्रियांचे, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे यानिमित्ताने आदरपूर्वक स्मरण व्हायलाच हवे. स्त्री शिक्षणातील अध्वर्यू क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त (१० मार्च) विनम्र वंदन । प्रगल्भ विचार आणि अलौकिक कर्तृत्वाचे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन याच महिन्यातील (१२ मार्च) त्यानिमित्त त्यांना सादर अभिवादन ।

मराठी भाषेतून निबंधमालेच्या रूपाने सहविचार पेरण्याचे महान कार्य करणारे साहित्यक्षेत्रातील मराठी भाषेचे शिवाजी-विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा स्मृतिदिन याच महिन्यातील या निमित्ताने त्यांचे पुण्यस्मरण करताना त्यांचे हे सर्व साहित्य विद्यार्थ्यांकडून वाचले जावे. अर्थात ही जबाबदारी मराठी भाषा शिक्षकांनी स्वीकारायलाच हवी.

सदर अंकात 'मराठी भाषा विशेषांक' म्हणून अनेक मान्यवरांच्या अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश आहे. मा. प्रा. वसंत आबाजी डहाके, डॉ.न.म.जोशी यांच्या व्यासंगी विचाराचे लेख हे अंकाचे खास वैशिष्ट्य आहे. त्याचबरोबर साहित्यिकांचे किस्से अशा सहित्यामुळे अंक संग्राह्य झाला आहे. मराठी भाषा विशेषांकाच्या निमित्ताने सर्वच शिक्षकांनी लिहिते व्हावे अशी अपेक्षा व त्यासाठी मनापासून शुभेच्छा ।

*दिसामाजी काहीतरी लिहीत जावे*
*प्रसंगी अखंड वाचीत जावे ।।*

समर्थांचे हे वचन विद्यार्थ्यांकडून कृतीत यावे यासाठी आपणा सर्व शिक्षकांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठीही मनापासून शुभेच्छा व सुयश चिंततो ।

*मराठी असे आमुचि मायबोली ।*
*हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू ।*
*हिला बैसवू वैभवाचे शिरी ।।*

**गंगाधर म्हमाणे**
**अध्यक्ष,**
**राज्यमंडळ, पुणे.**

# हार्दीक अभिनंदन !

सन २०१५ चा ज्ञानपीठ पुरस्कारानिमित्त मा. श्री. भालचंद्र नेमाडे यांचे राज्यमंडळातर्फे हार्दीक अभिनंदन !



श्री. भालचंद्र नेमाडे

## अल्पपरिचय

**श्री. भालचंद्र नेमाडे** यांचा जन्म दि. २७ मे १९३८.
रा. डोंगर सांगवी, ता. यावल, जि. जळगाव.

**साहित्य –**

**कवितासंग्रह**

- मेलडी
- देखणी

**कादंबरी**

- कोसला
- बिढार
- हूल
- जरीला
- झूल
- 'हिंदू' जगण्याची समृद्ध अडगळ

**समीक्षा :**

- टीकास्वयंवर
- साहित्याची भाषा
- तुकाराम
- द इफ्ल्युअन्स ऑफ इंग्लिश ऑन मराठी
- नेटिव्हिजम
- इंडो-ॲंग्लियन रायटिंग्ज – टू लेक्चर्स
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडी

**पुरस्कार, मानसन्मान**

- १९७६ – बिढार, ह. ना. आपटे पुरस्कार
- १९८४ – झूल, यशवंतराव चव्हाण (कऱ्हाड) पुरस्कार
- १९८७ – कुरुंदकर पुरस्कार, साहित्याची भाषा
- १९९१ – टीका स्वयंवर – साहित्य अकादमी पुरस्कार.
- १९९१ – देखणी – ना. धों. महानोर पुरस्कार
- २००१ – महाराष्ट्र फौंडेशनचा गौरव पुरस्कार
- २०१३ – नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे जनस्थान पुरस्कार
- **२०१५ – ज्ञानपीठ पुरस्कार**

### ''इंग्रजी भाषा हटवणे ज्ञानपीठाहून मोठे''

*''इंग्रजी भाषा हटवणे हे ज्ञानपीठाहून मोठे आहे. इंग्रजी चांगली आहे, ती आली पाहिजे या मताचा मी आहे. मात्र, इंग्रजी माध्यमामुळे ती बदलते. मराठी माध्यमातले लोक जास्त चांगले इंग्रजी बोलतात, जास्त चांगले इंग्रजी लिहितात. महात्मा गांधी, टागोर, जगदीशचंद्र बोस हे मातृभाषेतूनच शिकले, मोठे झाले. भाषा ही नुसती शाळेत शिकली असे होत नाही, तर तुमच्या मेंदूत, समाजात असावी लागते.''*

☆☆☆

# हार्दीक अभिनंदन !

## ८८व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी निवड झाली त्यानिमित्त मा. डॉ. सदानंद मोरे यांचे राज्यमंडळातर्फे हार्दीक अभिनंदन !

## डॉ. सदानंद मोरे यांची महत्त्वाची ग्रंथसंपदा



डॉ. सदानंद मोरे

**डॉ. सदानंद श्रीधर मोरे (देहूकर)**

- जन्म : २५ जून १९५२
- शिक्षण : एम.ए. (तत्त्वज्ञान), एम.ए. (प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास)
- संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे वंशज, लेखक, कवी, नाटककार, समीक्षक, इतिहास संशोधक, प्रवचनकार, कीर्तनकार

''मराठी भाषेची सक्ती करायला हवी किंवा इंग्रजीचे स्तोम माजतेय ही टोकाची भूमिका आहे. हे दोन्ही विषय अंगीकारणे आताच्या काळात शक्य होणार नाही. भाषेच्या क्षेत्रात कोणतीच अतिरेकी गोष्ट करून चालणार नाही'' ही भाषेबद्दलची डॉ. सदानंद मोरे यांची भूमिका आहे.

- **'तुकाराम दर्शन' या ग्रंथासाठी साहित्य अकादमीसह १५ संस्थांचे पुरस्कार प्राप्त.**
- **'उजळत्या दिशा' या नाटकासाठी राज्य शासनासह १० संस्थांचे पुरस्कार प्राप्त.**

- *द गीता : अ थिअरी ऑफ ह्यूमन ॲक्शन*
- *कृष्ण: द मॅन अँड हिज् मिशन*
- *पालखी सोहळा*
- *'जागृती' कार पाळेकर*
- *तुकाराम दर्शन*
- *लोकमान्य ते महात्मा*
- *गर्जा महाराष्ट्र*
- *कर्मयोगी लोकमान्य*
- *प्रसादाची वाणी*
- *ज्ञानोबा-तुकाराम*
- *तुका म्हणे*
- *उजळल्या दिशा*
- *त्रयोदशी*
- *मंथन*
- *बखर*
- *वाळूचे किल्ले*
- *संदर्भाच्या शोधात*
- *श्री तुकाराम गाथा - देहू प्रत (सं)*
- *अनुभवामृत - वासुदेवी टीका (सं)*
- *ताटीचे अभंग*

# हार्दीक अभिनंदन !

### डॉ. जयंत नारळीकर

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ आणि विख्यात विज्ञान कथालेखक डॉ. जयंत नारळीकर यांना त्यांच्या 'चार नगरांतले माझे विश्व' या आत्मकथनासाठी यंदाचा 'साहित्य अकादमी' सन्मान जाहीर झाला आहे.




डॉ. जयंत नारळीकर




श्रीमती माधुरी पुरंदरे

बालसाहित्यातील योगदानाबद्दलचा साहित्य अकादमी पुरस्कार



श्री. अवधूत डोंगरे

साहित्य अकादमीचा युवा साहित्यिक पुरस्कार



श्री. अरुण साधू

साहित्य क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या जनस्थान पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक अरुण साधू. यांचे हार्दीक अभिनंदन !

*उपरोक्त सर्व मान्यवरांचे राज्यमंडळामार्फत हार्दीक अभिनंदन !*

# जरी आज ती राजभाषा असे

डॉ. न. म. जोशी
संपर्क : ९२२६५७५२५०

**महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी असली तरी आज या राजभाषेसंबंधीच काही प्रश्न निर्माण झाले आहेत. यासंबंधी हे विवेचन.**

रविकिरण मंडळाचे प्रख्यात कवी माधव ज्युलियन यांनी त्याकाळात मराठी संबंधी एक सुंदर कविता लिहिली होती.

*मराठी असे आमुची मायबोली*
*जरी आज ती राजभाषा नसे*
*हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू*
*हिला बैसवू वैभवाचा शिरी ।।*

ज्या काळात माधव ज्युलियन यांनी ही कविता लिहिली तो काळ अस्सल इंग्रजी सत्तेचा होता. भारतात ब्रिटिश शिक्षण पद्धती अंमलात आणली गेली होती. इंग्रजी भाषेच्या वैभवाने नवशिक्षितांचे डोळे दिपून गेले हाते. सत्ताधीशांनीही शिक्षणक्रमात इंग्रजीचा वावर आणि वापर अधिक कसा होईल याबाबत धोरण आखले होते. मातृभाषेपेक्षा इंग्रजीचा वरचष्मा अधिक होता.

संस्कृत नाटकेसुद्धा इंग्रजी माध्यमातून शिकावी लागत. संस्कृत नाटकांच्या इंग्रजी टिप्पणी असलेल्या संपादित आवृत्त्या निघत होत्या. मराठी विषय होता. नाही असे नाही. पण त्याला दिवाणखान्याऐवजी माजघरातला अंधारी कोपरा दाखवला गेला होता.

## स्वातंत्र्योत्तर काळातील स्थिती

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र भारताची नवी शिक्षण पद्धती कशी असावी याचा विचार सुरू झाला. जे. पी. नाईक यांच्या सारख्या द्रष्ट्या व प्रयोगशील शैक्षणिक विचारवंताने स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षणाची गती यासंबंधी अभ्यासपूर्वक अहवाल सादर केले त्यामध्ये त्यांनी मातृभाषेचा महत्त्वाचाही विचार केला होता. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक शैक्षणिक समित्या (कमिशन) निर्माण झाला.

## डॉ. राधाकृष्णन कमिशन, कोठारी कमिशन, राममूर्ती कमिशन ही त्यापैकी काही महत्त्वाची नावे.

डॉ. राधाकृष्णन यांनी स्वच्छ व स्पष्ट शब्दांत 'शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असले पाहिजे' असे आवर्जून सांगितले. अन्य सर्व कमिशन्सच्या अहवालांतही मातृभाषाशिक्षराचे महत्त्व विशद केले आहे. म. गांधी यांनीही शिक्षण प्रणालीमध्ये मातृभाषेचाच पुरस्कार केला आहे. मातृभाषेबाबत अशा तऱ्हेने तात्विक दृष्ट्या तरी उत्साहवर्धक व उत्तेजक अशी परिस्थिती आहे.

## इंग्रजीबाबतचे धोरण

महाराष्ट्रात इंग्रजी भाषाध्ययनाबाबत अनेक वेळा बदलती धोरणे झाली. कै. बाळासाहेब खेर मुख्यमंत्री असताना त्यांच्या मंत्रिमंडळाने काही काळ आठवीपासून इंग्रजी शिकविण्याची शिफारस केली ती पुढच्या मंत्रिमंडळाने अंमलात आणली. पण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना ३ वर्षे इंग्रजी कमी शिकायला मिळते असे लक्षात आल्यावर पुन्हा ५ वी पासून इंग्रजी शिकविण्यास सुरुवात झाली.

कै. रामकृष्ण मोरे यांच्या काळात १ ली पासून इंग्रजी शिकवणे हा उपक्रम सुरू झाला. महाराष्ट्रात मातृभाषा मराठी, इंग्रजी व हिंदी या तीनही भाषा शालेय स्तरावर शिकवल्या जातात. त्यातही सर्वच माध्यमाच्या शाळांमधून हिंदी आहेच. पण मराठी अणि इंग्रजी यांच्या स्तराबाबत महाराष्ट्रातील शाळांमधून भेद दिसून येतो.

मराठी मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शाळांमधून मराठी ही प्रथम भाषा तर इंग्रजी ही द्वितीय भाषा म्हणून शिकवली जाते. महाराष्ट्रात आता इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेव फुटले आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून मराठी ही द्वितीय भाषा म्हणून शिकवली जाते. तर इंग्रजी व्यतिरिक्त अन्य माध्यमांच्या शाळातून मराठी ही तृतीय भाषा म्हणून शिकवली जाते.

## ना घरका ना घाटका

महाराष्ट्रात आता खेडोपाडीही इंग्रजी माध्यमाच्या शाळा निघाल्या आहेत. या शाळांतील विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठीच असते. ते घरी दारी सर्वत्र मराठीच बोलतात. पण केवळ इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असल्यामुळे त्यांना शाळेत ती भाषा द्वितीय भाषा म्हणून शिकावी लागते असे विद्यार्थी मराठी बाबत कोणत्या पर्यावरणात वावरतात ? त्यांची स्थिती ना घाटका, ना घरका अशी होत असते.

## सेमी इंग्रजी

काही शाळांमधून फक्त गणित व सायन्स हे विषय इंग्रजी माध्यमातून शिकवले जातात. तर बाकीच्या विषयांचे माध्यम मराठीच असते. या सेमी इंग्रजी धोरणाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होतो अणि ते सेमी गुणवत्ता प्राप्त करतात असं काही शिक्षकांच म्हणणं आहे.

## मराठीबाबतची मानसिकता

मराठीबाबत विद्यार्थी, शिक्षक, पालक, शिक्षणतज्ज्ञ यांची आजमितीस मानसिकता काय आहे याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शैक्षणिक तत्त्वज्ञानानुसार व शिक्षणशास्त्रानुसार मातृभाषा मराठीचे महत्त्व कोणीच नाकारलेले नाही. मातृभाषेला म्हणजेच मराठीला अनुक्रम देण्याबाबात तात्त्विकदृष्ट्या तरी सर्वांचे एकमत आहे. अनेक शिक्षणतज्ज्ञांच्या मुलाखतीतून, लेखनातून याबाबतचे स्पष्ट उल्लेख वारंवार येतात अणि मायबोलीचे गोडवे गायले जातात. असं असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मराठीबाबतची मानसिकता ही उपेक्षेची उदासीनतेची. काहीवेळा न्यूनगंडात्मक व बऱ्याच वेळा इंग्रजीचे दास्य मानण्याची आहे यात शंका नाही. इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. १९४७ साली इंग्रज गेला झेंडा बदलला. पण भारतीयांची दास्यत्वाने अवगुंठित झालेली मने बदलली आहेत का असा प्रश्न विचारला तर उत्तर आशादायक येणार नाही.

एक संपन्न भाषा म्हणून इंग्रजीचा अभ्यास करणे त्या भाषेतील वैभवाचा परिचय करून घेणे ही वेगळी गोष्ट आहे. ती असायलाच हवी. पण आमची मानसिकता तशी नाही.

## फाडफाड इंग्रजी बोलणारा

आपण भाषेत नेहमीच इंग्रजी शब्दांचा वारेमाप उपयोग करणार आणि अकाराण मराठी संवादाला इंग्रजीची फोडणी

देणारा तशा माणसाकडे आम्ही ‘आम्ही अधिक अचंब्याने बघतो.

या मातीतलं शेतकऱ्याचं पोट....

मराठी कितीही चांगले बोललं तरी मागासलेलंच आहे असं आम्ही समजू लागलो.

या न्यूनगंडात्मक भावनेतूनच मग पहिलीपासून इंग्रजी शिक्षणाची टूम निघाली. पण खेड्यपाड्यातील व दूरस्थ डोंगराळ भागातीलच नव्हे तर तालुक्याच्या, जिल्ह्याच्या ठिकाणीही असलेल्या शाळांमधून योग्यतऱ्हेने इंग्रजी शिकवणारे शिक्षक कुठून आणणार !

मग शेकडो शिक्षकांना स्मार्ट पी. टी. दुवारे इंग्रजीचे प्रशिक्षण दिले गेलं आणि तेच शिक्षक इंग्रजी शिकवू लागले.

खेड्यातील पोरगं आई-बाबा ऐवजी डॅडी मम्मी म्हणू लागली.आणि नमस्ते ऐवजी गुडमॉर्निंग म्हणू लागली. एवढाच काय तो बदल झाला. इंग्रजी भाषेमध्ये कौशल्य प्राप्त करणे, प्रभुत्व मिळवणे तर सोडाच पण सामान्य संवादही बोलणे शक्य झाले नाही असे अनेक पाहुण्यांबद्दल आढळते. ही झाली इंग्रजीबाबत स्थिती ! पण या फाड्फाड् इंग्रजीमुळे मुलांचे मराठीकडे दुर्लक्ष होऊ लागले.

आजकाल पालकांचा इंग्रजी माध्यमांकडे प्रचंड ओढा आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या धोरणामुळे प्राथमिक शिक्षण फुकट असले तरी आणि वर सांगितल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षणातही इंग्रजी शिकवले जात असले तरी पालकांची मानसिकता आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याची आहे. त्यासाठी वारेमाप फी भरून, गरीब पालक कर्ज काढूनही आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमाचा शाळेत घालण्याचा मनस्थितीत आहेत. याला कोणती कारणे असावीत ? पालकांना काय वाटते ?

- माझे मूल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गेल्यावर अधिक स्मार्ट होईल.
- मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेतल्यावर माझे मूल मागे पडेल.
- मराठी माध्यमाच्या शाळेत शिकल्यामुळे माझ्या मुलाला उच्च शिक्षणाच्या संधी कमी मिळतील व त्यात प्रगती करण्याच्या दृष्टीने अडसर येईल.
- मराठी माध्यमाच्या शाळेत माझे मूल शिकले तर जगाच्या बाजारात उभे राहण्यासाठी त्याची पात्रता व गुणवत्ता कमी पडेल.

या व यासारख्या अनेक समजुतींमुळे पालकांचा ओढा इंग्रजी माध्यम शाळांकडे अधिक वाढतो आहे.

## मराठी शाळांची घटती संख्या

गेल्या दहा वर्षांतील शिक्षण खात्याचे अहवाल पाहिले तर असे लक्षात येते की शासनाकडे नवीन शाळांचे जे प्रस्ताव येतात त्यामध्ये मराठी माध्यमाच्या शाळांचे प्रस्ताव कमी कमी होत चालले आहेत तर इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रस्ताव प्रतिवर्षी वाढत आहेत.

एवढेच नव्हे तर मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या घटत आहे. कारण त्यातील विद्यार्थी संख्या गटत आहे. तेथील कायम शिक्षक अतिरिक्त होत आहेत. आणि या अतिरिक्त शिक्षकांची सोय इतरत्र करावी लागण्याचा खटाटोप शिक्षणखात्याला करावा लागत आहे. ही बाब अत्यंत चिंतनीय आहे. २०१४ मध्ये १४ टक्के मराठी माध्यमाच्या शाळा बंद करण्याचे प्रस्ताव केले होते. त्या कशाबशा सुरू ठेवण्यासाठी शासनाला प्रयत्न करावे लागले.

## चावडी वाचन प्रकल्पातील निरीक्षणे

शाळांमधील विद्यार्थ्यांच्या मराठी भाषा संपादणुकीबाबत काही धक्कादायक निष्कर्ष तीन वर्षांपूर्वी ध्यानात आले. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी श्री. संजीवकुमार यांच्या प्रेरणेने पुणे जिल्ह्यात निवडक ठिकाणी चावडी वाचन प्रकल्प या नावाचा एक प्रकल्प राबविण्यात आला. विशिष्ट विभागातील विद्यार्थी, पालक, शिक्षणाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ यांना एकाच ठिकाणी एकत्र करून विद्यार्थ्यांचा संपादणुकीची पाहणी करण्यात आली. त्यातील काही निष्कर्ष अत्यंत धक्कादायक निराश करणारे व आत्मपरीक्षण करायला लावणारे आहेत. ते असे

- आठवीतील विद्यार्थ्यांना मराठी वर्णमालेतील काही वर्णांचे उच्चार करता येत नाहीत. उदा.वाङमय वांगमय किंवा वाड्मय...
- जोडाक्षर व संधी याबाबत विद्यार्थ्यांचे ज्ञान अपुरे आहे.
- कवितेचे सौंदर्यात्मक आकलन बहुसंख्य विद्यार्थ्यांना झालेली नाही.
- दहावीतील विद्यार्थ्यांना स्वतंत्र मराठी वाक्यरचना (अर्थपूर्णरीतीने व अन्वयासह) करता येत नाही.
- आकलन व आविष्कार या दोहोंबाबत, मातृभाषा मराठी असूनही अनेक विद्यार्थी मागे आहेत.
- श्रवण, भाषण, वाचन, लोखन या चार भाषिक कौशल्यांबाबत आठवीपर्यंतचे विद्यार्थी खूपच मागे आहेत.
- मराठी भाषेच्या अध्ययन अध्यापनाबाबत अशी स्थिती असेल तर, आणि वर्षानुवर्षे अशीच स्थिती राहत असेल तर मराठीची स्थिती कशी सुधारणार ?

## कुसुमाग्रजांची व्यथा

थोर कवी, नाटककार आणि ज्यांचा जन्मदिन मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो त्या कुसुमाग्रजांनी एकेकाळी अंतरीची व्यथा व्यक्त केली होती की ‘मराठी भाषा लक्तरे लेवून विपन्नावस्थेत मंत्रालयाच्या दाराशी घोटाळते आहे.’’

## या विषण्ण उद्‍गारांमध्ये कुसुमाग्रजांना काय सुचवायचे होते ?

त्यांच्यासारख्या श्रेष्ठ कवीला व मराठी सारस्वताला असे का म्हणावेसे वाटले ? वरील उद्‍गार म्हणजे केवळ काही शब्दांचे वाक्य नाही. तर त्यात मराठीची दुरवस्था ओतप्रोत भरलेली आहे. मराठीविषयीची उदासीनतेची अवकळा त्या शब्दांत व्यक्त झालेली आहे. शासन आणि समाज यांनी मराठींची काय अवस्था करून ठेवली आहे याचे विदारक चित्र सामावलेले आहे.

कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी मराठी भाषा दिन साजरा करताना कुसुमाग्रजांच्या उद्‍गारातील खंत कमी करण्याच प्रयत्न करणे कोठे घडते आहे काय ? की फक्त समारंभ साजरा केला जातोय ? हेही पाहणे गरजेचे आहे.

## शिक्षकांची भूमिका

कोणतीही भाषा ही प्रामुख्याने कुटुंबात, सामाजात, पर्यावरणातच शिकली जाते. पण तिला अध्ययानाचे एक विशिष्ट वळण मिळते ते अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेतूनच ! या प्रक्रियेमध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होतात ते असे...

* मराठी भाषा विषयाच्या शिक्षकाला मराठी विषयाची गोडी आहे काय ?
* मराठीच्या शिक्षकाला मराठी विषयी अभिमान आहे काय ?

* मराठीच्या शिक्षकाने मराठी अध्यापनकौशल्यांचे प्रशिक्षण घेतले आहे काय ?
* असे प्रशिक्षण घेतले असल्यास ही कौशल्ये आपल्या अध्यापन प्रक्रियेत उपयोगात आणण्यासाठी तो / ती / विशेष प्रयत्न करतात का ?
* मराठीचे अध्यापन करताना शिक्षक स्वत:च त्यामध्ये रंगून जातो का ?
* मराठीचे अध्यपन करणारा शिक्षक विद्यार्थ्यांची संपादणूक क्षमता वाढवू शकतो का ? तशी ती वाढत नसेल तर त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची त्याची इच्छा व तयारी आहे काय ?

### संस्थेची भूमिका

मातृभाषा अध्ययन अध्यापनाबाबत त्या त्या संस्थेची भूमिका व दृष्टिकोनही महत्त्वाचा असतो. पुण्यातील शिक्षण प्रसारक मंडळी (नू.म.वि.) यासारख्या संस्था मराठी भाषा विकास व संवर्धन या प्रमुख उद्‍दिष्टांसाठीच स्थापन झाल्या होत्या. पुणे विद्यापीठाची स्थापना झाली ती त्यातील प्रमुख उद्‍दिष्ट 'मराठी भाषा विकास व संवर्धन' हे डोळ्यासमोर ठेवूनच. पण अशा संस्था आपल्या मूळ उद्‍दिष्टांसाठी कोणते प्रयत्न करतात ? त्यासाठी वेळ किती देतात ?' त्यासाठी काही विशेष अर्थव्यवस्था करतात का ? या गोष्टीही विचारात घेण्यासारख्या आहेत.

महाराष्ट्रातील अनेक मराठी माध्यमांच्या शाळातील स्थिती अभ्यासली तरी असे लक्षात येते की गणित, इंग्रजी, शास्त्र या विषयांना त्या त्या विषयातील पदवीधर शिक्षक दिला जातो. पण वेळापत्रकाच्या सोयीसाठी मराठी विषयाला मात्र कोणत्याही शिक्षकाची योजना गाळलेल्या जागा भरा या पद्‍धतीने केली जाते. बी. कॉम झालेल्या, बी. एड साठी मराठी हा अध्यापनपद्‍धती नसलेला शिक्षकही नववी दहावीला मराठी शिकवतो. ही संस्थेची व वेळापत्रकाची सोय असते. पण सोयीमुळे आपण शेकडो विद्यार्थ्यांवर अन्याय करीत आहोत याचे भान सुटलेलेच दिसते.

### काय व्हायला हवं ?

मराठी आज राजभाषा आहे. पण तरीही तिची स्थिती चिंताजनक वाटते. ही स्थिती घालवण्यासाठी आपण तिला वैभवाच्या शिरी बसविण्यासाठी नेमकं काय व्हायला हवं ? त्यासाठी खालील मुद्‍दे मांडता येतील .

* मराठी अध्ययन - अध्यापनाचा दर्जा सुधारला पाहिजे.
* सर्व स्तरांवर मराठीचे अध्यापन अनिवार्य केले पाहिजे.
* इंग्रजीचे महत्त्व कमी न करता तिचे स्तोम मात्र कमी केलं पाहिजे.
* राज्यसरकार संपूर्णपणे मराठीत व्हायला हवा.
* न्यायालयीन निवाडे व कामकाज मराठीतच व्हायला हवे.
* दैनंदिन व्यवहारात सर्व स्तरावर मराठीचा वापर अजून व्हायला पाहिजे.
* मराठी साहित्य परिषद, महामंडळ, मराठी अध्यापक संघ, अशा अनेक स्वयंसेवा सांस्कृतिक संस्था अस्तित्वात आहेत. त्यांच्या कार्यक्रमांचे स्वरूप बरेचसे उत्सवी असते. उत्सवी कार्यक्रमांबरोबरच मराठी भाषा विकास व संधर्वन यासाठी त्या निश्चित उद्‍दिष्टे व निश्चित क्षेत्रे ठरवून कृती कार्यक्रमांची योजना केली पाहिजे. अशा संस्थांनी असे कृतिकार्यक्रम केले व त्याची निश्चित फलनिष्पत्ती वस्तुनिष्ठ रीतीने दाखविली गेली तरच अशा संस्थांना शासकीय अनुदान व मदत मिळेल अशी व्यवस्था हवी.

अशा अनेक उपक्रमांनी, योजकतेने प्रयत्न केलं तर मराठीला चांगले दिवस येतील यात शंका नाही.

☆☆☆

# मराठीचा अभ्यासक्रम : काही विचार

प्रा. वसंत आ. डहाके
संपर्क : ९८९०३६२७०३

**मराठी भाषेच्या व साहित्याच्या महाविद्यालयीन शिक्षणात मराठीच्या बोलींचाही, लोकसाहित्य व अन्य साहित्यप्रवाह यांच्याप्रमाणे, समावेश केला पाहिजे.**

मराठीचा अभ्यासक्रम या शब्दांत १) मराठी भाषेचा अभ्यासक्रम आणि २) मराठी साहित्याचा अभ्यासक्रम या दोन गोष्टी अंतर्भूत आहेत. मराठीच्या अभ्यासक्रमाच्या बाबतीत शालेय आणि महाविद्यालयीन अशा दोन गटांत विभागणी करावी लागते. शालेय अभ्यासक्रमाच्या बाबतीत प्राथमिक (इयत्ता १ ते ४), पूर्व माध्यमिक (इयत्ता ५ ते ८), माध्यमिक (इयत्ता ९, १०) आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११, १२) असे विभाग पडतात. महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या संदर्भात १ ते ३ अशी बीएची वर्षे, १ व २ अशी एमएची वर्षे आणि एमफिल अशी विभागणी होते. सर्वसाधारणपणे इयत्ता १ ते ८ यांसाठी नेमलेल्या पाठ्यपुस्तकांत भाषाशिक्षणावर भर असतो. तथापि त्यासाठी केलेल्या पाठ्यपुस्तकात सहित्यातले विविध वेचे घेतलेले असतात. इयत्ता ९ ते १२ यांसाठी तयार केलेल्या पाठ्यपुस्तकांत भाषा आणि साहित्य यांवर भर असतो. बीए, बीकॉम, बीएससी यांच्या पहिल्या वर्षातील अनिवार्य मराठीच्या पाठ्यपुस्तकांत भाषा आणि साहित्य यांवर भर असतो. महाविद्यालयीन शिक्षणात बीएच्या अध्ययनात साहित्यावरच भर असतो. तेथे विषयच मराठी साहित्य हा असतो.

येथे इयत्ता १ ते एमए, एमफिलपर्यन्तच्या अभ्यासक्रमाविषयी विचार मांडायचा आहे. ही केवळ रूपरेषा आहे, तपशील नाही.

मातृभाषा मराठी असलेल्या विद्यार्थ्याला शाळेत प्रवेश करण्याआधी मराठीतून बोलता येते, मराठीतून बोललेले त्याला समजते. शाळेत लिहिणे आणि वाचणे या नवीन गोष्टींशी त्याचा परिचय होतो. तो आयुष्यभर शाळेत गेला नाही तरी त्याचे बोलता येणे मावळत नाही, बोललेले समजत नाही असेही होत नाही. शाळेत मुख्यत: त्याची अक्षरांशी ओळख होते आणि लिहिलेल्या शब्दांच्या जगाशी त्याचा परिचय होतो. हे जग फार विशाल आहे हे त्याला हळूहळू समजत जाते. एकदा त्याला लिहिलेले वाचता आले की केवळ पुस्तकेच नव्हे तर आपल्या आसपास जे जे काही लिहिलेले आहे ते सर्व तो वाचू शकतो किंवा तसा प्रयत्न करू शकतो. बोलणे ऐकताना जसे तो वेगवेगळे शब्द साठवून ठेवतो, तसेच वाचलेले शब्दही तो गोळा करतो. त्याच्या शब्दभांडारात भर पडत राहते. या मुलांच्या पाठ्यपुस्तकांत संतांचे अभंग, सुंदर कविता, गाणी यांच्याबरोबर छान गोष्टी असतात. त्यामुळे शाळेतल्या भाषेचा सराव होण्यास मदत मिळते. कर्ता, कर्म, क्रियापद, लिंग, वचन या संज्ञा त्याला माहीत नसल्या तरी त्यानुसार तो वाक्यरचना करू लागतो. कुठे, कुणाशी कसे बोलावे हे त्याला कळत जाते. लिहिणे शिकताना चुका होतात. बोलणे सरावाने सहज घडत राहते. लिहिणे, व्याकरणशुद्ध लिहिणे शिकावेच लागते. शाळेत जसे तो बोलतो तसे लिहिता येत नाही. अक्षरओळख झालेली असली तरी व्याकरणशुद्ध लिहिणे शिकण्याचा काळ चारसहा वर्षांचा असू शकतो. शब्दांच्या रूपांच्या बाबतीत, वाक्यरचनांच्या बाबतीत, र्‍हस्व-दीर्घाच्या बाबतीत चुका होत राहतात.

शाळेत जाणारा मुलगा प्रमाण भाषेत लिहिणे शिकतो, प्रमाण भाषेत त्याने बोलावे अशी अपेक्षा असते. मराठीच्या विविध बोली आहेत. एरवी घरीदारी बोलीभाषा बोलणाऱ्या मुलाला शाळेत प्रमाण भाषेत बोलावे लागते आणि प्रमाण भाषेतच लिहावे लागते. प्रमाण भाषेविषयी तो अनभिज्ञ असतो असे नाही, ती त्याच्या सरावाची भाषा नसते एवढेच. आपापली बोली बोलणाऱ्या ग्रामीण परिसरांतील व्यक्तींना नामदेव-ज्ञानदेवांपासून तुकाराम-रामदासांपर्यन्त अनेक संतांची वचने पाठ असतात. त्यांच्या बाबतीत बोली आणि प्रमाण भाषा यांचे साहचर्य असते. तथापि शाळेत जाणाऱ्या मुलाला प्रमाण भाषेत निर्दोष लिहिणे शिकावेच लागते. ते प्रमाण भाषेतले म्हणजे त्याच्या नित्याच्या भाषेतले नसते. त्यामुळे एक गंड तयार होऊ शकतो. आपली बोली अशुद्ध, प्रमाण भाषा शुद्ध असे त्याला वाटू शकते. प्रमाण भाषेतल्या लिहिण्या-बोलण्याचा सराव करताना बोलीतले शब्द आले तरी ती चूक नाही असा विश्वास त्याला दिला पाहिजे. अर्थातच बोलीतले शब्द कुठे वापरायचे आणि कुठे नाही याचे भानही दिले पाहिजे. इयत्ता ९ ते १२ या काळात सरळसरळ मराठीच्या विविध बोलींचा परिचय करून दिला पाहिजे. त्यामुळे त्या विद्यार्थ्याची भाषा समृद्ध होईल. निव्वळ कोरडी प्रमाण भाषा न राहता बोलीचा गोडवा त्यात मिसळलेला असेल. मराठीत आज विविध बोलींमध्ये कविता, कथा लिहिल्या जातात. प्रमाण मराठीतले निबंध, बोलीतल्या आणि प्रमाण मराठीतल्या कविता, बोलीतल्या कथा पाठ्यपुस्तकात असल्या तर आपल्या मराठी भाषेशी आपला संबंध आहे याची जाणीव होईल. निबंधासाठी, शास्त्रीय विवेचनासाठी प्रमाण भाषा वापरायची असते आणि इतर लेखनासाठी बोलीचा उपयोग करता येतो हे त्याला समजेल.

इयत्ता १ ते ८ या भाषाशिक्षणाच्या काळात भाषेचे वेगवेगळ्या क्षेत्रांत कसे उपयोजन होत असते हेही समजले पाहिजे. कारण शाळेबाहेरच्या जगात काही गोष्टी विद्यार्थ्यांना सहजच दिसत असतात. उदाहरणार्थ, जाहिराती, विविध घोषणाफलक, आवाहने वा निवेदने. पुढच्या (९ ते १२) इयत्तांमध्ये या विषयाच्या अनुषंगाने अधिक पाठ असले पाहिजेत. याचा अर्थ या विद्यार्थ्यांना साहित्यापासून तोडायचे असा नाही, तर साहित्याबरोबरच भाषेचे उपयोजन अन्य क्षेत्रांतही कौशल्याने कसे करता येते हे त्यांच्या लक्षात आले पाहिजे. वृत्तपत्रे, दृकश्राव्य प्रसारमाध्यमे, जनसंपर्क इत्यादी क्षेत्रांतले भाषिक उपयोजन त्यांना अवगत असले तर त्या क्षेत्रांत त्यांना प्रवेश मिळू शकतो. बीएच्या मराठीच्या अभ्यासक्रमातही साहित्याच्या शिक्षणाबरोबर भाषेच्या व्यावहारिक उपयोजनाचेही शिक्षण दिले पाहिजे.

सर्वसाधारणपणे बीएच्या अभ्यासक्रमात कविता, कथा, कादंबरी, नाटक, ललित गद्य या साहित्यप्रकारांसोबत साहित्यशास्त्र आणि भाषाविज्ञान या विषयांचा समावेश असतो. या साहित्यप्रकारांची प्रकृती समजून घेणे आणि साहित्यशास्त्रातल्या विविध संकल्पनांची ओळख करून घेणे, त्याचप्रमाणे भाषाविज्ञानातीलही विविध संकल्पना समजून घेणे अशी उद्दिष्टे असतात. त्याचबरोबर मध्ययुगीन साहित्यापासून वर्तमानकालीन साहित्यापर्यन्तचा पैस डोळ्यांसमोर ठेवला जातो. या अभ्यासक्रमाला जोडूनच अधिक व्यापक अभ्यासक्रम एमएला असतो. शिवाय त्यात लोकसाहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य अशा प्रवाहांतील समीक्षात्मक पुस्तकांचा आणि साहित्यकृतींचा समावेश असतो. (संतसाहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी साहित्य या गोष्टी असतातच. शिवाय साहित्याचा इतिहासही असतो.)

**या अभ्यासक्रमांचे उद्दिष्ट काय ? कशासाठी हा अभ्यासक्रम असतो ?**

या विद्यार्थ्याने विविध साहित्यप्रकार समजून घ्यायचे, साहित्यप्रवाह समजून घ्यायचे, साहित्याचा इतिहास समजून

घ्यायचा, साहित्यशास्त्रातले आणि समीक्षेतले विविध सिद्धान्त समजून घ्यायचे, भाषाविज्ञानाचीही ओळख करून घ्यायची, थोडी सौंदर्यशास्त्राचीही ओळख करून घ्यायची. एवढे झाले की तो साहित्य आणि साहित्यशास्त्र यांत पारंगत झाला असे समजायचे. चित्र-शिल्पकला विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडून त्यांनी चित्रनिर्मिती करावी, शिल्पे घडवावी अशी अपेक्षा असते. चित्रपट शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी चित्रपटनिर्मितीची विविध अंगे समजून घ्यावीत आणि त्याप्रमाणे कृती करावी अशी अपेक्षा असते. मराठी विषय घेऊन बीए, एमए होणाऱ्यांकडून त्याने साहित्यकृतींची निर्मिती करावी अशी अपेक्षा नसते. त्याने समीक्षक व्हावे असाच अभ्यासक्रम आखलेला असतो. लेखी समीक्षा करावी आणि/किंवा शाळेत, महाविद्यालयात अभ्यासक्रमातील पुस्तके शिकवताना मौखिक समीक्षा करावी. विविध साहित्यप्रकारांत लेखन करणाऱ्यांना बीए,एमएचा अभ्यासक्रम करण्याची काही गरज नसते. तशी सोय या अभ्यासक्रमात नाही. एमफिल, पीएचडी करून शिक्षक, प्राध्यापक व्हावे यासाठी हा अभ्यासक्रम आहे. शिक्षक व्हायचे असेल तर बीएडचा वेगळा अभ्यासक्रम करावाच लागतो, बीएएमएच्या अभ्यासक्रमात ते विषय अंतर्भूत नाहीत. प्राध्यापक व्हायचे असेल तर एमए, एमफिल, पीएचडी करावे लागते. बीएड नसल्याने शिक्षक होता येत नाही, बीजे नसल्याने प्रसारमाध्यमात जाता येत नाही. प्रसारमाध्यमात काम करायचे असेल तर वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद या विषयातली पदवी घ्यावी लागते.

तात्पर्य असे की बीए,एमएच्या अभ्यासक्रमातच असे विषय का असू नयेत की ते अभ्यासल्यामुळे या विद्यार्थ्याला अन्य क्षेत्रात जाता येईल ? एक पदवी संपादित केल्यानंतर आवश्यकतेनुसार विशेष प्रावीण्य मिळवण्यासाठी ते दुसरा अभ्यासक्रमही पुरा करू शकतील. उदाहरणार्थ, वृत्तपत्रात (आणि दृकश्राव्य प्रसारमाध्यमांतही) राजकीय-सामाजिक वृत्तांकनाखेरीज साहित्य, चित्रकला, शिल्पकला, नाटक, चित्रपट या विषयांवरही मजकूर येत असतो. आमच्या निव्वळ साहित्याच्या विद्यार्थ्याला या विषयांतही थोडे शिक्षण मिळाले तर प्रशिक्षणाच्या साहाय्याने तो या क्षेत्रात समर्थपणे काम करू शकेल.

आतापर्यन्त बीएचा उल्लेख केला, बीकॉम आणि बीएससीचा केवळ अनिवार्य मराठीपुरता उल्लेख केला. त्यांनी मराठी साहित्याचा अभ्यास करू नये अशी व्यवस्था आहे. या विद्याशाखेतल्या काही विद्यार्थ्यांना वाणिज्य/ विज्ञान यांशिवाय साहित्याचीही आवड असू शकेल. इतकेच नव्हे तर आपल्या म्हणजे वाणिज्य/ विज्ञान या विषयांवर मराठीतून चांगले लेखन करावे असेही वाटत असेल. तर त्यांना मराठी भाषेपासून आणि साहित्यापासून का तोडायचे ? माझे तर असे मत आहे की व्यवस्थापनविद्या (येथे खरोखरच साहित्याला निश्चित स्थान आहे), अभियांत्रिकी, वैद्यक या विद्याशाखांमध्येही साहित्याचा अभ्यासक्रम असावा. एकीकडे बीएएमएच्या अभ्यासक्रमात भाषेशी व साहित्याशी निगडित अन्य अभ्यासविषयांची जोड दिली पाहिजे, दुसरीकडे भाषा व साहित्य यांच्यापासून वंचित ठेवलेल्यांना साहित्याचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. सध्या अशी व्यवस्था नाही.

मराठी भाषेच्या व साहित्याच्या महाविद्यालयीन शिक्षणात मराठीच्या बोलींचाही, लोकसाहित्य व अन्य साहित्यप्रवाह यांच्याप्रमाणे, समावेश केला पाहिजे. त्याचबरोबर आपला समाज आणि संस्कृती यांचा परिचय होईल अशी पाठ्यपुस्तके असली पाहिजेत. त्याशिवाय भाषेचे व साहित्याचे समग्र आकलन अशक्य आहे. बीए, एमए, एमफिल यांचा एकत्रित विचार करून अभ्यासक्रमातील विषयांची रूपरेषा पुढीलप्रमाणे दाखवता येईल : मराठी समाज, मराठी संस्कृती, सामाजिक-राजकीय चळवळी, मध्ययुगीन साहित्य, विविध पंथ, शिवशाही, शाहिरी वाङ्मय, वसाहतवाद, अव्वल इंग्रजीतील

साहित्य, एकोणिसाव्या-विसाव्या शतकांतील प्रबोधनपर्व, सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीतील साहित्य, तत्कालीन वृत्तपत्रे, नियतकालिके, अर्वाचीन मराठी साहित्य, दोन महायुद्धांमधला युरोप, नवसाहित्य, समकालीन साहित्य, विविध साहित्यप्रवाह, लोकप्रिय साहित्य, भाषाविज्ञानाची रूपरेषा, साहित्यशास्त्र व समीक्षा यांतील सिद्धान्त, नाटक व रंगभूमी, चित्रपटकथा, लघुनियतकालिके, संशोधनशास्त्र, वृत्तपत्रविद्येची रूपरेषा, शिकवण्याच्या पद्धती, निबंध, वृत्तकथा, वृत्तान्तलेखन, भाषांतरविद्या, विविध ललित कलांचा परिचय. बीएपासूनच निबंधलेखनाची प्रश्नपत्रिका अनिवार्यतेने असली पाहिजे.

मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमात इंग्रजी वा अन्य विदेशी साहित्याचे काय स्थान आहे ? एमएच्या अभ्यासक्रमात ॲरिस्टॉटलच्या (गो. वि. करंदीकरांनी भाषांतरित केलेल्या) काव्यशास्त्राचा समावेश होत असे. कालमानानुसार नवे सिद्धान्त आलेले आहेत. भाषाविज्ञानाच्या अभ्यासपत्रिकेत सोस्यूर, याकोबसन यांच्या भाषाविचाराचा समावेश केला जातो. त्याचप्रमाणे समीक्षासिद्धान्ताच्या अभ्यासपत्रिकेत चिन्हमीमांसा, कथनमीमांसा, संरचनावाद, विरचना यांचा समावेश असावा/ किंवा वक्रोक्तीसिद्धान्त, ध्वनिसिद्धान्त, रससिद्धान्त यांना पर्याय म्हणून ठेवावा. तसेच भाषांतरित साहित्याच्या अभ्यासक्रमात भारतीय भाषांतील साहित्यकृतींप्रमाणे विदेशी साहित्यकृतींचा समावेश केला तर आपले आकलन अधिक व्यापक होईल. म्हणजे आपण मराठी समाज, संस्कृती, साहित्य समजून घेत असताना जागतिक पातळीवर साहित्याच्या गतिविधी काय आहेत हेही समजून घेता येईल. वर सुचवलेल्या विविध गोष्टी अभ्यासक्रमात आल्या तर हे विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, जाहिरातलेखक, चित्र-शिल्पसमीक्षक, निवेदक, कार्यक्रमसंचालक, भाषांतरकार अशा कोणत्याही भूमिकेतून समर्थपणे काम करू शकतील. म्हणजे मग त्यांना भाषेच्या आणि साहित्याच्या अध्ययनापासून उपजीविकेचा मार्ग मिळू शकेल. मराठी ही केवळ ज्ञानभाषा होऊन चालणार नाही, ती उपजीविकेचीही भाषा असली पाहिजे.

या टिपणात मी मुद्रण-माध्यमाचा विचार केला आहे. तथापि आज संगणकाचा सर्वच क्षेत्रात वापर होत असतो. या दृष्टीने मराठीच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने आवश्यक अशी सामग्री आहे की नाही याचाही शोध घेतला पाहिजे. इंटरनेटवर शोधपत्रिका आहेत का, मराठी भाषा व साहित्य या विषयांवर शोधनिबंध आहेत का इत्यादींचा शोध घेतला पाहिजे. पुस्तके, नियतकालिके यांच्या बरोबरच संगणकाचेही साहाय्य विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. माहितीच्या महापुरात मराठीची नदीही तुडुंब भरून वाहते आहे की तिचे पात्र अद्याप कोरडेच आहे याचाही शोध घेणे आवश्यक आहे. बीए,एमए, एमफिल, पीएचडीचे विद्यार्थी आणि मराठीचे प्राध्यापक संगणकाचा वापर करताहेत असे दृश्य आज पाहायला मिळू शकते.

मराठीच्या शालेय आणि विशेषत: महाविद्यालयीन अभ्यासक्रमाचा या दृष्टीने पुनर्विचार झाला पाहिजे. त्याचबरोबर शिक्षणक्षेत्राखेरीज अन्य म्हणजे प्रसारमाध्यमे, जाहिरात संस्था, शासकीय-अशासकीय कार्यालयांतील भाषा अधिकारी या विविध क्षेत्रांत मराठी विषयात एमए, एमफिल, पीएचडी असणे आवश्यक मानले पाहिजे.

काही काळापूर्वी मराठी विषयात एमए झालेले प्राध्यापक साहित्य-कलासमीक्षा, संशोधन, इतिहाससंशोधन, पुरातत्त्व, सामाजिक-राजकीय विचारविमर्श, तत्त्वज्ञान, वृत्तपत्रे इत्यादी क्षेत्रांकडे वळलेले दिसतात आणि तेथे त्यांनी मोलाची कामगिरी केलेली दिसते. आपला अभ्यासक्रम व्यापक आणि सखोल असला तर आज-उद्या नव्या पिढीतही हे दृश्य दिसू लागेल.

☆☆☆

# मराठीच्या विकासासाठी तंत्रज्ञानाची जोड आवश्यक

**डॉ. माधवी वैद्य**
संपर्क : ९४२२०५७९६०

एप्रिलमध्ये पंजाबमधील घुमान येथे ८८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरणार आहे. महाराष्ट्राच्या बाहेर भरणाऱ्या या संमेलनात मुलाखत, परिसंवाद, कविसंमेलन, ग्रंथदिंडी इत्यादी अनेक साहित्यविषयक उपक्रम राबविले जातात. संमेलनाला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. हे संमेलन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडून भरविले जाते. केवळ संमेलन भरविणे एवढीच फक्त महामंडळाची जबाबदारी नसते, तर मराठी भाषेसाठी मराठीच्या संवर्धनासाठी इतरही अनेक उपक्रम राबविले जातात. या निमित्ताने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांची मुलाखत घेतली आहे **प्रा. सुजाता शेणई** यांनी ! त्यातून काही नवीन मुद्दे समोर आले.

**महामंडळातर्फे मराठी साहित्य आणि मराठी भाषा यांच्या संवर्धनासाठी कोणकोणते उपक्रम राबविले जातात ?**

**डॉ. माधवी वैद्य :** मराठी भाषेसमोर अनेक प्रश्न आहेत. याची महामंडळाला पूर्ण जाणीव आहे. मराठी भाषेचे वास्तव, त्याची सद्यस्थिती, भाषेसमोरील आव्हाने याचा विचार करून 'अक्षरयात्रा' हा वार्षिकांक 'मराठी भाषा विशेषांक' काढत आहोत. हा अंक लवकरच प्रकाशित होईल. यात भाषेच्या अभ्यासकांचे लेख आहेत. यातून भाषेसंबंधी काही उत्तरे सापडतात का त्याचाही विचार केला आहे. महामंडळाच्या चार घटक संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर या राज्यात कार्यरत आहेत. या घटकसंस्था मराठीची गोडी उत्पन्न व्हावी, मराठीचा प्रसार व्हावा यासाठी त्यांच्या भागात संमेलने आयोजित करतात. तेथील स्थानिक लोकांना संधी मिळते आणि सहभागही वाढतो. या चार घटकसंस्थाची अनुक्रमे महाराष्ट्र साहित्य पत्रिका, साहित्य, प्रतिष्ठान आणि युगवाणी ही मुखपत्रे निघतात. बृहन् महाराष्ट्रातही महामंडळाचं काम चालतं, यात 'बडोदा' ही संलग्न संस्था आणि पणजी, भोपाळ, बिलासपूर, हैदराबाद आणि गुलबर्गा या समाविष्ट संस्था आहेत. हैदराबाद संस्थेचं 'पंचधारा' हे नियतकालिक मराठी भाषा आणि साहित्य यासाठी महत्त्वाचं मानलं जातं. हैदराबादमध्ये मराठी भाषा शिकविण्यासाठी रात्रशाळा चालविली जाते. अगदी तळागाळातले विद्यार्थी, दिवसभर काम करणारे विद्यार्थी या शाळेत येतात. यातील काही विद्यार्थी आता शिक्षक झाले आहेत याचा खूप आनंद आहे.

महामंडळाचा वर्धापनदिन केला जातो. या निमित्ताने एका वाङ्मयप्रकाराची निवड करून त्यावर चर्चा, परिसंवाद, निबंध घेतले जातात. याचा गांभीर्याने विचार होतो. यावर्षी एकांकिका या वाङ्मयप्रकाराची निवड केली आहे. भाषेच्या संदर्भातील संशोधनपर काम खंडाच्या रूपात प्रसिद्ध होतं. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे वाङ्मयीन खंड अगदी १९५०–२००० या कालखंडावर आधारित, (म्हणजे अद्ययावत म्हणायला हरकत नाही) प्रसिद्ध झाले आहेत. विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना आणि संशोधकांना याचा खूप उपयोग होतो आणि होईल.

**व्याकरणाच्या नियमांबाबत महामंडळ काम करत आहे, त्याचे स्वरूप आणि सद्यस्थिती काय आहे ?**

शुद्धलेखनाचा प्रकल्प २००८ मध्ये सुरू करण्यात आला. चार घटकसंस्थांमधील भाषा अभ्यासकांशी चर्चा झाली. शुद्धलेखनाच्या नियमात सुलभीकरणाचा प्रयत्न केला गेला. या संदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीत अस्मीन शेख, सत्त्वशीला सामंत (यांचे निधन झाले आहे.) अरुण फडके, डॉ. मरगज, कौतिकराव ढोले-पाटील, शोभा उखगडे आणि नीलिमा गुंडी काम करत आहेत. हा प्रकल्प लवकरच शासनाला सादर करण्यात येणार आहे.

**मध्यवर्ती संस्था**

**अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ**

**(स्थापना १९६०)**

**चार घटकसंस्था व मुखपत्रे**

- पुणे — महाराष्ट्र साहित्य परिषद — महाराष्ट्र साहित्य पत्रिका
- मुंबई — मुंबई साहित्य संघ — साहित्य
- औरंगाबाद — मराठवाडा साहित्य परिषद — प्रतिष्ठान
- नागपूर — विदर्भ साहित्य संघ — युगवाणी

**पाच समाविष्ट संस्था**

- पणजी — गोमंतक साहित्य सेवक मंडळ (गोवा)
- भोपाळ — मराठी साहित्य संघ (मध्यप्रदेश)
- बिलासपूर — मराठी साहित्य परिषद (छत्तीसगड)
- हैदराबाद — मराठी साहित्य परिषद (आंध्रप्रदेश)
- गुलबर्गा — कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद (कर्नाटक)

**एक संलग्न संस्था**

- बडोदा — मराठी वाङ्मय परिषद

**अमराठी भाषकांसाठी महामंडळाकडून कोणते प्रयत्न होतात ?**

अमराठी भाषकांसाठीचा प्रश्न हा विशेषत: कर्नाटक आणि तेलंगणात येतो. यावर्षीचं संमेलन पंजाबमध्ये म्हणजे अमराठी प्रदेशातच होतंय. या संमेलनात उर्दू साहित्य परिषदेचे कवी सैय्यदभाई आणि मुमताज पीरभॉय सहभागी होत आहेत. ग्रंथदिंडीत पंजाबी साहित्य अकादमीचे अध्यक्ष गुरुभजनसिंग गिल, पद्मश्री पुरस्काराने सन्मानीय सुरजित पाथर, पंजाबी भाषेत ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त गुरदयाल सिंग सहभागी होत आहेत. पंजाब केसरीचे संपादक विजयकुमार चोप्रा यांची मुलाखत ऐकायला मिळेल.

डॉ. अश्विनी धोंगडे यांच्या संपादनाखाली 'भारतीय भाषांतील स्त्रीवाद' हा संशोधनपर ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. यात गुजराथी, हिंदी, सिंधी, तमीळ, उडिया इ. अनेक भाषा आहेत. हा ग्रंथ सुरुवातीला मराठी भाषेत प्रसिद्ध होत आहे. ८ मार्च, जागतिक महिला दिनाचं औचित्य साधून हा प्रकाशित करण्याचा मानस आहे. नंतर इंग्रजीतून काढू. यामुळे मराठी भाषा ही भारताच्या विविध प्रांतात पोचण्यास, संवर्धन होण्यास मदत होईल.

मुंबई साहित्य संघातर्फे अमराठी भाषकांसाठी वर्ग चालविले जातात. या वर्गालाही चांगला प्रतिसाद मिळतो.

**विविध विद्याशाखांना मराठीतून अध्यापन-अध्ययनाची तयारी शासन दाखवत आहे. दुसऱ्या बाजूला मराठी शाळा बंद होत आहेत. याबाबत महामंडळाची भूमिका काय आहे ?**

महामंडळाने साहित्य संमेलन, वार्षिकांक आणि वर्धापनदिन एवढ्यावरच थांबू नये. मराठी ज्ञानभाषा व्हायची असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली गेली पाहिजे. युवक, लेखक आणि समीक्षक यांनी मराठी ज्ञानभाषेसाठी चळवळ उभी करणे आवश्यक आहे. आता महाजालावर विविध संकेतस्थळे उपलब्ध आहेत. ज्यातून मराठीचा प्रसार होतो. विविध विद्याशाखात मराठीचे अध्ययन-अध्यापन करण्यासाठी अभ्यासू प्राध्यापक एकत्र येण्याची आणि अनुवादाची तयारी असण्याची टीम तयार झाली पाहिजे. म्हणजे उदा. मराठी - मानसशास्त्र, मराठी - वास्तूशास्त्र इ. म्हणजे अभ्यासक्रमाचे घटक सुलभरीत्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील आणि विद्यार्थी मातृभाषेतून शिकू शकतील. आपण मराठी ज्ञानभाषा व्हावी म्हणून भावनिकदृष्ट्या विचार करतो, वास्तविकता काय आहे ते समजून पावलं उचलली पाहिजेत. किती टक्के मराठी शाळा बंद झाल्या ? किती टक्के विद्यार्थी इंग्रजी माध्यमात मराठी/हिंदी/जर्मन/फ्रेंच/संस्कृत ही भाषा घेतात याबद्दलचे निश्चित सर्वेक्षण उपलब्ध नाही. त्यादृष्टीने प्रयत्न करायला हवेत. म्हणजे निश्चित दिशा सापडून उत्तरे शोधायला मदत होईल. मराठी साहित्याला नोबेल पारितोषिक नाही याचा अर्थ मराठीत नोबेलच्या दर्जाचे साहित्य नाही असा नसून, अनुवादाची खीळ तिथे बसली आहे असा होतो. अमराठी लोकांना मराठी शिकविणे आणि मराठी लोकांना इंग्रजी प्राबल्यापासून दूर ठेवणे हे महत्त्वाचे आहे.

**महामंडळ नव्याने कोणती कामे करत आहे ?**

आताचं युग हे तंत्रज्ञानाचं युग आहे. भाषेचा प्रसार करण्यासाठी मंडळाने स्वत:चे संकेतस्थळ तयार केले आहे. या संकेतस्थळावर महामंडळाचा इतिहास, आतापर्यंत झालेली संमेलने, वार्षिकांक, साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची भाषणे टाकण्यात आली आहेत. याचं काम चालू आहे. पुढच्या वर्षी ते निश्चित होईल.

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेनं अमराठी भाषिकांसाठी आणि मराठी भाषा व त्यातले उपक्रम अधिक लोकाभिमुख व्हावेत यासाठी उर्दू-मराठी महिला साहित्य संमेलन घेतले. विज्ञान परिषद, दलित साहित्य परिषद,

नाट्य परिषद, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, विविध महाविद्यालये आणि वसुंधरा महोत्सव यांच्याशी संलग्नता केली आहे.

**मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल काय वाटते ?**

मराठी भाषेचं भवितव्य खणखणीत आहे. गुगलवर मराठी भाषकांचा वाचक क्रमांक खूप वरचा आहे, प्रश्न आहे तो मराठीतून संकेतस्थळावर अधिक चांगलं, दर्जेदार लेखन करण्याचा. मराठी भाषकांनी स्वत:ची मानसिकता बदलली पाहिजे. पहिली चार वाक्ये मराठीत बोलून नंतर काही महत्त्वाचं बोलायचं तर ते इंग्रजीतून हे सोडून द्यायला हवं. यासाठी युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात हवा आणि ज्येष्ठ मंडळींनी तंत्रज्ञान शिकून, त्यांच्या अभ्यासविषयाचे महाजालावर वितरण करायला हवे. सर्वेक्षणावर अधिक भर दिला, तर प्रश्नाच्या मुळापर्यंत जाता येईल. मराठी भाषेकडे शासन लक्ष देत आहे. पण चळवळ उभी करणे आपल्या सर्वांच्या हातात आहे. ते करायला तत्पर असणे गरजेचे ठरेल.

☆☆☆

# किस्से साहित्यिकांचे

## प्रिया तेंडुलकर – विजय तेंडुलकर



प्रिया तेंडुलकर



विजय तेंडुलकर

*रोज सकाळी माझा फोन पहिल्यांदा त्यांच्याच फोननी वाजतो, आणि माझ्या नुसत्या 'हॅलो' वरून ते सगळं काही क्षणात जाणतात.*

*"काय गं ? बरं नाही ? रात्री जागलीस ?" नेमका वर्मावर बोट ठेवणारा प्रश्न येतो. कितीही अभिनय कौशल्य पणाला लावून 'हॅलो' म्हटलं तरी बाबांना सगळं समजतंच. मग बाबा भुवया उंचावत, चढ्या आवाजात म्हणतात, "प्रिया, झाड कितीही मोठं वाढलं तरी त्याच्या फांद्यांशी, पानांशी असलेलं त्याचं नातं तुटत नाही. फांद्याही त्याच्या, पानंही त्याची. ते फुलतं, फळतं ते त्यांच्यामुळंच. बाप आहे मी तुझा. माझ्यापासून कसं काही लपेल ?"*

*बाबांचं, विजय तेंडुलकरांचं 'सखाराम बाईंडर' नाटक अनेक अर्थांनी वादग्रस्त ठरलं. खूप वादळ उठलं या नाटकावर. तेव्हा एकदा रात्री आम्ही मुलं झोपायला जात असताना ते म्हणाले, "फार त्रास देतोय ना बाबा तुम्हाला? पण बाबांनी हे मुद्दाम केलेलं नाही. इथं तुमच्या समोर बसून मी आजवर जे लिहिलं त्यातलंच हे एक समजून लिहिले. जे होतं आहे त्याला माझा नाईलाज आहे." त्यावर राजू लगेच म्हणाला, "जाऊ दे बाबा. लोकं वेडी आहेत."*

*माझ्या वर्गातली एक मुलगी मला म्हणाली, "तुझे बाबा अश्लील नाटकं लिहितात, म्हणून माझ्या आईनं तुझ्याशी बोलायचं नाही असं सांगितलंय !" त्यावर मी उद्धटपणे म्हणाले, "बरं झालं ! माझे बाबा एवढे मोठे आहेत की ज्यांचे बाबा त्यांच्याएवढे मोठे नाहीत. अशा मुलांशी बोलायचंच नाही असं मीच ठरवलंच !"*

# कवितेतील सौंदर्यस्थळे

प्रा. नीला वि. कदम
संपर्क : ८०८७०९७०४०

कविता म्हणजे भावना, संवेदना, आंतरिक उर्मी यांचा शब्दांतून अभिव्यक्त होणारा, हृदयाला स्पर्श करणारा, अंत:करणाला भिडणारा नितांत सुंदर अर्क! कवितेच्या नेमक्या, मोजक्या शब्दात खूप मोठा आशय, अर्थ सामावलेला असतो. कवीपरत्वे कवितेचा परीघ, आवाका हा वेगवेगळा असतो.

कविता म्हणजे भावना, संवेदना, आंतरिक उर्मी यांचा शब्दांतून अभिव्यक्त होणारा, हृदयाला स्पर्श करणारा, अंत:करणाला भिडणारा नितांत सुंदर अर्क!

कवितेतून साकारलेले शब्द असे सोलीव, पारदर्शक, निखळ असतात की सहजतेने रसिकाच्या अंत:करणाला ते भिडतात, त्याच्या काळीजकुपीचा कब्जा घेतात. 'या हृदयीचे त्या हृदयी घातले', ही प्रक्रिया तेथे घडते. प्रत्येकाच्या मनात असतो एक कवी, एक कवित्व ! ते व्यक्त होतं, अव्यक्तही असतं. जसे वाऱ्याच्या लयीवर झुलणारे मनस्वी गवताचे तुरे तसे हे मनस्वी कवित्व ! आपलीच आपल्याला भुरळ पाडणारे ! आपल्याच नादात आपल्याला हरवून टाकणारे ! हे कवित्व खूप प्रांजळ असतं, अंतर्मनाचा शोध घेणारं असतं ! हरवून गुंगवून टाकणारं असतं. अंतर्मनातील काल्पप्रवृत्तीला जेव्हा फुलल्या प्रतिभेची जोड मिळते तेव्हा निर्माण होतं नितांत सुंदर काव्य !

जीवनानुभवांना सामोरे जात प्रत्येक व्यक्ती जगत असते. पण ज्यांना प्रतिभाशक्ती, कल्पनाशक्ती ही विशेषत्वाने लाभलेली आहे. अशा व्यक्तिमत्त्वांना आलेले अनुभव आंतरिक उमाळ्याने, झपाटलेल्या शब्दांच्या माध्यमातून लेखणीद्वारा पाझरत राहतात. अनुभव सौंदर्यरूप धारण करून व्यक्त करणारा सर्वात प्रभावी वाङ्मयप्रकार म्हणजे कविता ! प्रतिभावंत कवी हळूवार सौहार्दाने अनुभव घेतात आणि सुंदर शब्द घेऊन कवितेच्या माध्यमातून ते व्यक्त करतात. कवितेमध्ये भावसौंदर्य, भाषासौंदर्य, नादसौंदर्य, रचनासौंदर्य, रससौंदर्य, बोधसौंदर्य अशी विविधांगांनी बहरलेली सौंदर्यस्थळे आढळतात. म्हणतात ना, 'जे न देखे रवी, ते देखे कवी !'

भाषेच्या उगमापासून आजतागायत काव्याच्या ओघवत्या, खळखळत्या प्रवाहाने आपला सौंदर्य हा धर्म टिकवून ठेवला आहे, किंबहुना सौंदर्य हाच कवितेचा आत्मा असतो, याचे प्रत्यंतर दिले आहे. प्राचीन काव्याचा विचार करता महानुभाव पंथ, वारकरी संप्रदायाचे कवी यांनी निर्माण केलेले काव्य म्हणजे आनंदाचे निधान आहे. उदा. संत तुकारामांची अभंगरचना, त्यांच्या अनेक अभंगांना सुभाषितांचे स्थान प्राप्त झाले आहे.

*'महापुरे झाडे जाती । तेथ लव्हाळे वाचती ।।'*
*'सुख पाहता जवापाडे । दु:ख पर्वताएवढे ।।'*
*'जन हे सुखाचे, दिल्याघेतल्याचे । अंतकाळीचे कोणी नाही ।।'*
*'शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।'*

तुकारामांची अभंगवाणी अशी भाषासौंदर्याने, बोधसौंदर्याने नटलेली आहे. शब्दालंकार, अर्थालंकार, यांचा सहज, समर्पक वापर ते करतात. याबरोबरच त्यांची प्रतिमाने समर्थपणे भावनेची खोली प्रकट करतात.

*''कन्या सासुरासि जाये । मागे परतोनी पाहे ।।*
*तैसे झाले माझ्या जिवा । केव्हा भेटसी केशवा ।।*
*चुकलिया माये । बाळ हुरू हुरू पाहे ।।*
*जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ।।''*

यातील कन्या, बाळ, मासोळी ही प्रतिमाने उत्कट भाव व्यक्त करतात. दि. के. बेडेकरांनी 'सर्वात जुनी लघुकथा' असा जिचा उल्लेख केला आहे. (व्याले दोन्ही पक्षी एका वृक्षावरी । आला दुराचारी पारधी तो) या अभंगकथेतील रचनासौंदर्य आवाक करणारे आहे. पंडिती काव्याचे सौंदर्य हे त्याची अलंकारिक भाषा, प्रासादिक रचना, वृत्तांचा चपखल वापर यात सामावलेले आहे. उदा.

*''वनी खेळती बाळ ते बल्लवांचे । तुरे खोविती मस्तकी पल्लवांचे ।।*
*फुलांचे गळा घालिती दिव्य हार । स्व. नाथा. सवे ते करिती विहार ।।''*

वामन पंडितांच्या दिंडी वृत्तातील या रचनेत वरील गुणधर्म तर आहेतच, पण त्याबरोबरच एक लोभसवाणी चित्रमयता आहे.

तंत (शाहिरी) काव्याचा बाज आणखीच वेगळा ! वीररसाने ओथंबलेले, बहाद्दुरीची वर्णने करणारे पोवाडे ऐकताना धमन्यांतून रक्त सळसळू लागते, तर शृंगाररस प्राधान्याने असणाऱ्या लावण्या मनाला एक वेगळा आनंद देतात. सौंदर्याचे दर्शन आणि प्रदर्शन, जिच्यामध्ये सहजतेने घडते ती लावणी ! 'सुंदरा मनामधी भरली', 'लटपट लटपट तुझं चालणं' अशा लावण्यांची गोडी अवीट आहे.

*'हटातटाने पटा रंगवुनि, जटा धरिसी का शिरी ।*
*मठाची उठाठेव का तरी ।।'*

अशा अनुप्रासात्मक रचनांची खुमारी औरच !

आधुनिक कविता म्हणजे वाङ्मयवृक्षावरील सदाबहार बकुळफुलांची पखरण ! समजा, सर्वच हिरवीगार हिरवळ पसरली आहे, त्यावर एखादी मुग्ध कलिका डोलत आहे, असे दृश्य सर्वांना आवडते. 'व्वा ! छान ! सुंदर ! मस्त !' अशा शब्दात सर्वसामान्यपणे तिचे वर्णन केले जाते. पण बालकवीची प्रतिभा जेव्हा अभिव्यक्त होते, तेव्हा –

*'हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणांच्या मखमालीचे*
*त्या सुंदर मखमालीवरती फुलराणी ती खेळत होती'*

बालकवींची डोलणारी, झुलणारी, फुलणारी 'फुलराणी' मनाला भुरळ घालते. 'डोलत... डोलडोलवी... डुलता डुलता' यांसारख्या गतिसूचक आणि तितक्याच नादमधुर प्रतिमांचा वापर त्यांनी सहजतेने केला आहे. कवितेतून प्रकटणारा निसर्ग मानवी जीवनातील प्रेमभाव, विवाहसोहळा घेऊन येतो. या साध्याभोळ्या विवाहसोहळ्यात वाचक समरस होतो. त्या विवाहसोहळ्याचा तोही एक भाग बनतो.

सरदार प्रतापराव गुर्जर यांचा पराक्रम म्हणजे शिवकालीन इतिहासाचा एक अंश होय. कुसुमाग्रजांनी इतिहासातील या धाग्याचे एक अभिमानाने झळाळणारे काव्यवस्त्र विणले, ते

**''आई म्हणाली,**
**आपल्या आतून जे**
**उगवून येतात**
**तेच दागिने ल्यावे नि**
**सजावे.**
**दुसऱ्या झाडाची फुलं**
**माळून**
**एखादं झाड सजल्याचं**
**एकही उदाहरण**
**विश्वाचा इतिहासात**
**नाही !''**

म्हणजे, 'वेडात मराठे वीर दौडले सात...' अभिमान, आवेग, आंतरिक उमाळा, उर्मी, पराक्रम, झपाटलेपण, नाट्यमयता, गतिमानता हे सारे व्यक्त करणाऱ्या शब्दांचे सौंदर्य थक्क करणारे आहे. 'कोसळल्या उल्का जळत सात दर्यात' – या काव्यपंक्तीत पराक्रमाला एक वेदनेचा सूर लाभला आहे. 'खग सात जळाले अभिमानी वणव्यात' इथं अभिमानाला असलेली करुणरसाची डूब अंत:करण हेलावून टाकले. मराठवाड्यातील भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कवी लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'मी धात्री, मी धरित्री' ही कविता साकारली.

*'मी धात्री, मी धरित्री*
*मातृत्व माझा धर्म*
*रुजवणं आणि वाढवणं एवढंच कळतं मला*
................
*आकाशाने द्यावे तरच मी रुजवावे*
*आकाशानेच नाकारले पितृत्व तर मी काय करू*
*नाकारता येते पितृत्व*
*मातृत्व कसे नाकारू ?'*

कविता काळजाला भिडते. अंतर्मुख करते. या कवितेबाबत प्रा. अरविंद थिटे तथा कवी रवींद्र बोरगावकर यांनी म्हटले आहे. या कवितेच्या द्वारे प्रतिकांच्या द्वारे विस्तारत जाणारे आशयनाट्य विलक्षण उंची गाठते. चिंतनाच्या इंद्रधनुष्यातून सुटलेला भेदक शर रसिकांच्या अंत:करणात खोलवर घुसतो. तेव्हा होणारी अवीट माधुर्याची वेदना काव्याचे अस्सल सामर्थ्य प्रकट करते.

पुरुषोत्तम पाटील यांची 'पाहुणेर' ही कविता 'येणाऱ्यासाठी ..... थांबलेल्यासाठी..... जाणाऱ्यासाठी' अशा तीन घटनांचे वर्णन करणारी आहे. अवघ्या बारा ओळींच्या तसेच नेमक्या, मोजक्या आशयघन शब्दांच्या या कवितेत कमालीचा सूचक संयमित प्रेमभाव आहे. लक्षवेधक विशेषणे हा या कवितेचा खास विशेष. 'लगबग पहाट' 'दळदार सूर्य' 'एकुलता पाट', 'सुगरण ताट' इ. ही विशेषणे कवितेचा आशय समृद्ध करतात. त्यांच्यामुळे कवितेला लाभलेली लय मोहमयी आहे.

काही कवितांना बोधसौंदर्याची जोड मिळालेली असते. त्यामुळे कविता मन अंतर्मुख करते. अर्थातच हा बोध, उपदेश किंवा 'काहीतरी सांगणं' जे असतं ते प्रभावी काव्यगुणांच्या साथीनं आल्याने तो बोध हा बोध वाटत नाही. उदा. सरिता पदकी यांची 'मुक्ताई' कविता ! विषण्ण असणाऱ्या कवयित्रीला सातशे वर्षांपूर्वीची मुक्ताई जेव्हा भेटते तेव्हा कवयित्री तिला विचारते,

*''तीन भावांची परकरी आई झालीस*
*त्यांच्याबरोबर भिंतीवरनं सहल करून आलीस*
*त्यांना मांडे करून घातलेस*
*त्यांचे रुसवे सोडवलेस*
*आणि ताटीचे अभंगही रचलेस.'' इत्यादी*
*तू माझ्यासारखी खिन्न न होता हे कसं करू शकलीस ? मुक्ताई म्हणाली,*
*''पोरी, अगं जग वन्हीचं असतं*

*पण आपण–आपण पाणी असतो ना !*

*आपलं पाणीपण ओळखून*

*आपण वन्हीशी खेळायचं असतं,*

*असं केलं की जय आपला असतो*

*अन् आभाळातली वीजही आपलीच असते ? ''*

प्रतिमा प्रतिकांची भाषा कवितेला एक आगळेवेगळे परिमाण प्राप्त करून देते. उदा. 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली' या नारायण सुर्वे यांच्या काव्यपंक्तीतील 'भाकरीचा चंद्र' ही प्रतिमा लक्षवेधक आहे.

आईनं हिऱ्याची अंगठी घालावी, सोन्याची पिवळीधम्म माळ घालावी अशी बालसुलभ अपेक्षा आणि तिला दिलेलं स्वाभाविक उत्तर म्हणजे संजय चौधरी यांची 'दागिना' ही कविता खूप काही सांगून जाते.

*''आई म्हणाली,*

*आपल्या आतून जे उगवून येतात*

*तेच दागिने ल्यावे नि सजावे.*

*दुसऱ्या झाडाची फुलं माळून*

*एखादं झाड सजल्याचं एकही उदाहरण विश्वाचा इतिहासात नाही !''*

दागिन्याची व्याख्या इथं आगळ्यावेगळ्या रीतीने उलगडते. निरागस वात्सल्यदर्शन घडविणाऱ्या अशा कविता मनात रुंजी घालत राहतात.

हायकू हा मूळ जपानी काव्यप्रकार. तीन ओळींचा अल्पाक्षर आणि गतिमान रचनाबंध हा हायकूंचा विशेष ! शांता शेळके म्हणतात, 'रात्रीच्या नि:स्तब्ध शांततेत गवताच्या पात्यावर जमलेल्या विशिष्ट भावानुभवाचे चित्र म्हणजे हायकू. तिचे सारे सौंदर्य तिच्या चिमुकलेपणात आहे.' यादृष्टीने शिरीष पै यांच्या एका हायकूची आठवण येते.

*''नको रे धरूस चिमटीत*

*फुलपाखराचं नाजूक अंग*

*दुखतोय पंखावरला रंग''*

फुलपाखरू अन् त्याच्या देखण्या रंगांमध्ये असणारे अतिनाजूक सौंदर्य, त्या सौंदर्याला इजा पोहोचू नये म्हणून व्याकूळ झालेले कवयित्रीचे भावकोमल मन ! यातून काय सुचवायचंय कवयित्रीला ? हे रंगीबेरंगी फुलपाखरू म्हणजे कवितेनं काठोकाठ भरून ओसंडणारं कवीचं मन ? की गाढ प्रितीनं हळूवार झालेलं प्रेयसीचं हृदय ? हायकूमधील असा अलवार, मृदुकोमल भाव मनाला मोहून घेतो, हेच खरं !

शांताबाईंनी ज्ञानेश्वरांच्या काव्यात हायकूशी साधर्म्य असणाऱ्या चित्रदर्शी सुंदर दृष्टान्तांचा उल्लेख केला आहे. उदा.

*''कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळूवार ।*

*कुचंबेन केसर । इया शंका ।।''*

एकंदरीत १२व्या शतकापासून आजतागायत कवितेचा सौंदर्यझरा मराठी वाङ्मयात स्फटिकाप्रमाणे झुळझुळतो आहे. ही सौंदर्यस्थळे शोधण्यात मोठा आनंद आहे.

☆☆☆

# लोकसाहित्याची भाषा आणि स्त्रीगीते

**डॉ. सौ. मंगला भी. बाबर**
संपर्क : ९८५०९४७६४२

महाराष्ट्रात राहणारी मराठी माणसे जी भाषा बोलतात ती भाषा 'मराठी' या नावाने ओळखली जाते. सर्व जगभर ज्या भाषा बोलल्या जातात, त्यामध्ये १०व्या क्रमांकाची मराठी ही भाषा आहे. श्री. कृ. पां. कुलकर्णी यांनी 'मराठी भाषा उद्‌गम व विकास' या ग्रंथात मराठी ही भाषा निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या, विशेषत: माहाराष्ट्री व अपभ्रंश यांच्या मिश्रणाने बनली असे सांगितले आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा जर आपण विचार केला तर मराठी भाषेच्या स्वरूपात सातत्याने बदल जाणवतो. कोणत्याही भाषेत लिखित साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य अस्तित्वात असते. मराठी भाषेच्या माणदेशी, अहिराणी, वऱ्हाडी, नागपुरी, कोल्हापुरी इ. विविध बोली मानल्या जातात. या सर्व बोलीतील मराठीपण विसरता येत नाही. भाषिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या बोलीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. लोकसाहित्याची भाषा ही बोलीभाषा असते.

लोकसाहित्य हे भाषेच्या प्राचीन रूपापर्यंत जाण्यासाठी आधारभूत असते. लोकसाहित्य हे मराठी भाषेचे फार मोठे वैभव आहे. या साहित्यात शब्दवैभव, उच्चारवैभव व अर्थवैभव असते. तसेच लोकसाहित्य हे समाजाच्या जीवनाची गाथा असते. ती अनेक भावभावनांनी आणि अंतरीच्या उमाळ्याने ओथंबलेली असते. संकेतबोली आणि संकेतभाषा म्हणूनही ती उद्‌बोधक असते. म्हणून लोकसाहित्याची भाषा, भाषाशास्त्राची सामग्री म्हणून विशेष महत्त्वाची आहे. लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचाही परिचय भाषेद्‌वारा होत असतो.

**लोकसाहित्य संज्ञा** – लोकसाहित्य हा शब्द folklore या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द म्हणून मराठीत प्रचलित झाला आहे. folklore साठी मराठीत वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या आहेत. पण आज 'लोकसाहित्य' ही संज्ञा रूढ झालेली आहे. लोकसाहित्य या शब्दात लोक आणि साहित्य अशी दोन पदे आहेत. या दोन पदांपैकी folk साठी लोक आणि lore साठी साहित्य असे शब्द वापरलेले आढळतात.

लोक म्हणजे दोन किंवा दोनापेक्षा अधिक व्यक्तींचा समूह. ज्यात वंश, भाषा व्यवसाय, धर्म यापैकी एक किंवा अधिक समान तत्त्वे असतात. त्यांना या तत्त्वाच्या किंवा तत्त्वांच्या संदर्भात स्वत:ची अशी निराळी परंपरा असते. अशा शब्दात ॲलन डंडेसने 'लोक'ची संकल्पना स्पष्ट केली आहे. तर लोकसाहित्यातील लोक सामाजिक समूहापेक्षा वेगळा असतो. त्यांच्या एकत्र येण्यामागे समान सौंदर्यभावनेचे तत्त्व असते. याशिवाय नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषा ही महत्त्वाची तत्त्वेही विसरता येत नाहीत. लोकसाहित्यातील समूहमन तयार व्हायला प्रामुख्याने समान सौंदर्यभावना आवश्यक असते. असे मत गंगाधर

**लोकसाहित्य हा शब्द फारच व्यापक आहे. समूहजीवनातील म्हणजेच लोकजीवनातील कथा, गीते, उखाणे, म्हणी या शब्दसाहित्याबरोबरच त्यांच्या समजुती, चालीरीती, कला, व्रत-वैकल्ये, विधी-विधाने इ. सर्वांना मिळून लोकसाहित्य ही संज्ञा मराठीत रूढ झाली आहे.**

मोरजे यांनी नोंदवले आहे. आणि प्रभाकर मांडे यांनी लोक या शब्दात अशा जनसमूहाचा समावेश असतो, जे खेड्यात किंवा शहरात राहतात. ज्यांना स्वत:च्या सांस्कृतिक परंपरेचे व वैशिष्ट्यांचे भान असते. जे परंपरेने चालत आलेले जीवन जगतात. ही परंपरा मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते, त्यांचे जीवन सहज आणि स्वाभाविक असते. असे विस्तारपूर्वक मत नोंदवले आहे. तर डॉ. तारा भवाळकर यांनी लोक म्हणजे केवळ ग्रामीण किंवा शहरी किंवा एकाच पठडीतले नाहीत तर सांस्कृतिकदृष्ट्या विशिष्ट मानसिक जडणघडणीचा समावेश ज्या समाजात, समूहात आढळतो तो – मानवसमूह म्हणजे लोक असे म्हटले आहे. लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग. ही संस्कृती स्वाभाविकपणे जगते आणि निसर्गाला अधिक जवळची असते. महाराष्ट्र शब्दकोश आणि एन्सायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका तसेच एन्सायक्लोपिडीया ऑफ सोशल सायन्सेस या कोशात या शब्दाचे अर्थ दिले आहेत.

लोकसाहित्यात वापरल्या जाणाऱ्या 'लोक' या शब्दामध्ये जीवनप्रणालीसंबंधीची एकसंधता अपेक्षित आहे. 'लोक' म्हणजे तो विशिष्ट भूप्रदेशातील, विशिष्ट संस्कृतीने बांधलेला, आदिम संस्कृतीशी जवळीक असलेला आणि प्राचीन काळातील अनेक अवशेष आपल्या प्रगत अवस्थेतही त्याने टिकवून ठेवलेले असतात, असा समूह म्हणजे लोक. जसे 'लोक' या शब्दाबाबत घडले तसेच साहित्य या शब्दाबाबत घडले आहे. साहित्य म्हणजे वाङ्मय असा अर्थ मराठीत प्रथम रुळला. इंग्रजीमध्ये 'साहित्य' याअर्थी – literature असाच शब्द रूढ आहे. मराठीमध्ये जसे 'साहित्य' आणि 'वाङ्मय' असे दोन शब्द आहेत. तसे इंग्रजीत नाहीत. इंग्रजीतील folklore साठी आपण वाङ्मय आणि साहित्य असे दोनही शब्द वापरतो. पण या शब्दात फरक आहे. याचे कारण 'लोकगीतांवरच सर्वांनी अतिरिक्त भर दिला आणि इतर अंगांकडे दुर्लक्ष केले. दुर्गाबाई भागवतांनी 'लोकसाहित्य' हा शब्द वापरला. यासंदर्भात त्या लोकसाहित्याची रूपरेखा या ग्रंथात लिहितात, 'प्रा. द. वा. पोतदारांनी 'लोकविद्या' असा शब्द सुचविला होता. पण तो रुळला नाही. शिवाय साहित्यात वाङ्मय, ज्ञान आणि विधी यांची विविध अंगे प्रतीत होतात व विद्या या शब्दापेक्षा साहित्य या शब्दाची व्याप्ती जास्त असल्यामुळे हाच रूढ शब्द मी निवडला आणि आज हाच शब्द स्वीकारार्ह ठरला आहे.

लोकसाहित्य हा शब्द फारच व्यापक आहे. समूहजीवनातील म्हणजेच लोकजीवनातील कथा, गीते, उखाणे, म्हणी या शब्दसाहित्याबरोबरच त्यांच्या समजुती, चालीरिती, कला, व्रत-वैकल्ये, विधी-विधाने इ. सर्वांना मिळून लोकसाहित्य ही संज्ञा मराठीत रूढ झाली आहे. त्यात लोकगीतांचे दालन सर्वाधिक समृद्ध आहे.

**स्त्रीगीते आणि लोकसाहित्याची भाषा**

लोकसाहित्याची भाषा बोलीभाषा असते आणि ती काळमानानुसार बदलली तरी आपले वैशिष्ट्य भान अबाधित ठेवते. लोकसाहित्य म्हणजे लोकगीते असे वाटण्याइतपत लोकगीतांची संख्या विपुल आहे. पारंपरिक लोकजीवनाचे एकही अंग असे नाही की ज्यावर लोकगीत निर्माण झालेले नाही. काळाप्रमाणे त्याच्या मांडणीत, शब्दात बदल झाले. मात्र वैशिष्ट्यपूर्णता अबाधित राहिली. लोकमानसाच्या व्यक्तिगत, धार्मिक, सामाजिक गरजा लोकसाहित्यातून, लोकगीतातून पूर्ण केल्या आहेत. स्त्रियांना पूर्वी दळण-कांडण घरीच करावे लागे. ते श्रम सोपे, सहज व्हावेत या उर्मीतून जात्यावरच्या ओव्या निर्माण झाल्या. जात्याचा गौरव करताना ती म्हणते,

*'जाला तू ईश्वरा । कुण्या डोंगराचा ऋषी ।*
*बया मालनीसारखं । हुरद उकललं तुझ्यापाशी ।।'*
*आपलं हृदय मोकळं करण्याचं सासूरवाशिणीचं एक साधन म्हणजे जातं. ती पुढे म्हणते.*
*काममंदी काम । दळानं अवघड ।*
*गीताच्या तालामंदी । सईनं वडला दगड ।।*

अशा आत्माविष्काराच्या गरजेतून स्त्रीगीते निर्माण झाली.

प्रकाश, तेज आणि अग्नी यांचे श्रेष्ठतम प्रतीक म्हणजे सूर्य. सूर्यासंबंधी विज्ञानामुळे मात्र बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. पण सूर्यासंबंधी लोकमानसात अनेक संकल्पना, संकेत रूढ आहेत. सकाळी सूर्याला केलेला नमस्कार पुण्यफलदायी असतो असा एक संकेत. सूर्यदेवाला मराठी लोकसंस्कृतीने कसे स्वीकारले, लोकभाषेत त्याची पूजा कशी बांधली, हे पहाण्यासारखे आहे.

*उगवला नारायण । पाताळ फोडूयीनी ।*
*उभी दारात । हात मी जोडूयीनी ।*
*उगवला नारायण । उगवताना तान्हे बाळ ।*
*शिरी सोन्याचं जावळ ।*
*रत्न राजाच्या टोपीयीला ।।*

लालबुंद गोळा पाताळ फोडून वर येतो आहे, असे स्त्रीला दिसलेले सूर्यदर्शनाचे मनोहर दृश्य, तिने स्त्रीसुलभ अनुभवातून उगवणाऱ्या सूर्याला तान्ह्या बाळाची दिलेली उपमा, तो सूर्य जवळ असलेल्या मुलासारखा दिसणे हे सर्व पाहिले की, तिच्या भावविश्वातील रंगारूपाची विविध परिमाणे, तिची सूर्यविषयक जाण, प्रतिभा भाव आणि श्रद्धा याची कल्पना येते.

कृतीसंबंधता हा लोकसाहित्याचा – लोकभाषेचा एक प्रमुख विशेष. लोकपरंपरेत काम आणि कलानिर्मिती एकाच वेळी होत असते. प्रत्येक दिवशी उगवणारी सकाळ आणि संध्याकाळही कामाच्या अनुषंगाने साकार होते.

*दिवस मावळला । झाडाझुडपाच्या झाल्या इटी ।*
*भाऊ-बहिणीचं गाव गाठी ।।*
*दिवस मावळला । दिव्याला माझा हात ।*
*बंधूजीला बोलयते । कारं पावण्या केली रात ।*
*तिन्ही सांज झाली । दिवा लावावा जोडवाती ।*
*गुज बोलल्यात आज्यानाती ।*
*दिव्याला मरायन । मी का घालती आणिक ।।*
*बहिणाई माझा बंधू । आलं गुजाला माणिक ।।*

एखाद्या संध्याकाळी भाऊ आला तर त्या संध्याकाळी सासुरवाशिणीच्या जीवनात आनंद भरून जाई. भाऊ बहिणीच्या घरी आल्यावर भावा-बहिणींचे, सुख-दुःखाचे, घरप्रपंचाचे, जीवाभावाचे हितगुज बऱ्याच रात्रीपर्यंत

चालणारच ! अशा वेळेला दिव्याला भराण थोडं जादाच लागणार. जातिवंत सर्जनशील साहित्याची भाषा ही बोलीच असते. तो सहज उद्‌गार असतो.

लोकसाहित्यातील शब्दकळा तितकीच महत्त्वाची आहे. लोकसमूहातील लोकमन जेव्हा व्यक्त होते तेव्हा अवघड सौंद ही व्यक्त झाल्यावाचून राहत नाही. या साहित्यातून आज वापरात नसलेले पण जुने शब्द, वाक्‌प्रचार, व्याकरणविषयक पुरातन रूपे आढळतात. कृषिसंस्कृतीच्या प्रदीर्घ कालखंडात आजची विवाहसंस्था निर्माण झाली. मुलगी उपवर झाली की, आई-वडिलांना तिच्या लग्नाची चिंता.

***लग्न सराईत । जीव माझा घोराईत ।***
***सांगते सई तुला । नवनी उपवर घराईत ।***
***लगीन सराईत । झोप लागना नेतराला ।***
***सावळ्या मैनेला । कुठं द्यावी पातराला ।।***

***आणखीन एक दुसरे उदाहरण -***

***साळू निघाली सासऱ्याला ।***
***सारा संदूक केला नवा ।***
***बंधूगाडीची बैलं धुवा ।***

यावरील ओव्यांमध्ये आलेले पातराला, संदूक या जुन्या शब्दांप्रमाणेच दिटी, वैराळ, दिंडी, खनाळ, निघळू, असेही जुने शब्द लोकसाहित्यातून दिसतात. त्याला स्त्रीगीतेही अपवाद नाहीत. तसेच

नवरीबाईचं ग्वात भारी । आणि

गोरीचं गोरपण । दिसत इटाक । यासारख्या स्त्रीगीतातून ग्वात, इटाक, अंदुरू, आवुक, औंदा इ. प्रमाण शब्दांची बोलीची रूपेही दिसतात.

लोकसाहित्यातून मुक्त आणि स्वतंत्र भाषालालित्य व्यक्त होत असते. लोकसंस्कृतीत झिम्मा, फुगडी इ. खेळगीतांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. वेगवेगळ्या सणांच्या निमित्ताने सासुरवाशिणी एकत्र जमा होत आणि खेळगीतांचा आनंद लुटत. अशी एक सासुरवाशिण आपल्या सखीला फुगडी घालताना म्हणते -

***आपट्याचं झाड माझ्या झपाट्याखाली,***
***खेळशील खेळ नाही तर घेते लाथेखाली ।।***

असंच एक दुसरे स्त्रीगीत, त्यातून तिच्या मुलाचे बालपण मनोहर पद्‌धतीने व्यक्त झाले आहे. तिची मात्रा, अगतिकता, आणि तिचे भावविश्व कसे व्यक्त झाले आहे पहा -

***रागा वैतागानं । शिव्या देते मी वंगाळ ।***
***नेणता माझा बाळ । राग घडीचा संभाळ ।।***
***रागा वैतागानं । शिव्या देते मी भडाभडा ।***
***नेणता बाळ राजा । माझ्या काळजाचा घडा ।।***

लोकसाहित्यातून तर मानवी भावभावना आविष्कृत होणारच ! स्त्रिया जात्याच भावनाप्रधान असतात. भावनांच्या

कलात्मक आविष्कारातून साहित्यातील रसांची निर्मिती होते. लोकसाहित्यातही ही रसनिर्मिती आपल्याला दिसून येते. इतर रसांप्रमाणे शृंगाररस व्यक्त करणारं हे गीत –

*गोरीचं गोरंपण । हळदीला मागं सारी ।*

*गोऱ्यापणाला त्याज भारी ।।*

*पाण्याला गेली गोरी । अंधार करुयानी ।*

*दिली घागर भरुयानी । यातला शृंगारभाव किती हृदय आहे !*

रसात्मकतेबरोबरच सामाजिक संबंध, समाजाच्या जटिल आणि नियंत्रित स्वरूपाहून असलेला वेगळेपणाही लोकसाहित्यातून व्यक्त झाल्याशिवाय रहात नाही. एखादी तरुणी एखाद्याच्या प्रेमात पडली तर तिला तिची शेजारीण काय म्हणते –

*काय भाळलीस गोरे । त्याच्या नाजूक ओठाला ।*

*न्हाय भाकर पोटाला ।*

*काय भाळलीस गोरे । शेजारच्या फाकड्याला ।*

*पटनी मिळना तुकड्याला ।।*

असे सांगणारी ती स्त्री स्वत: प्रातिनिधिक स्वरूपात संस्कृतीची वाहक, तर आहेच पण संस्कृतीचे अंगही आहे हे निर्विवाद !

लोकसाहित्याचे महत्त्व – आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात लोकसाहित्याचा अभ्यास करणे कितपत योग्य आहे असा एक प्रश्न आपल्याकडे उपस्थित केला जातो आहे. पण अमेरिका, जर्मनी, रशिया या देशांनी विज्ञान, तंत्रज्ञान यामध्ये प्रगती केली आहे. तरीदेखील या देशांमध्ये – आजही लोकसाहित्याबद्दल आस्था आहे. तेथील विद्यापीठातून लोकसाहित्यविषयक स्वतंत्र अभ्यास विभाग सुरू आहेत. या विषयावरही ग्रंथनिर्मिती होत आहे.

भारतातील बहुसंख्य प्रांतातून विद्यापीठात लोकसाहित्याच्या स्वतंत्र अभ्यासशाखा सुरू आहेत. आपला महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. लोकसाहित्य हा विषय महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात आलेला आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाबरोबर संशोधनही चालू आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ही लोकसाहित्यविषयक संशोधन करणारी, संशोधनपर ग्रंथ प्रकाशित करणारी शासकीय संस्था फार चांगले काम करत आहे.

कला हे जीवनाचे एक अपरिहार्य अंग आहे. त्यामुळे आजही लोककला प्रभावी ठरल्या आहेत. नाट्य, चित्र, संगीत या क्षेत्रात लोकगीतांचे, लोककलांचे महत्त्व खूपच आहे. संतांनी लोकगीतांच्या, लोककलांच्या आश्रयाने समूहमनाशी नाते जोडले. उदाहरण म्हणून भारुडे, सत्यशोधक जलसे, आंबेडकरी जलसे, वगनाट्य, लावणी, पोवाडे, पथनाट्य इ. चे देता येईल. मिथकांनाही लोकसाहित्यात मानाचे स्थान आहे.

लोकसाहित्य आजही आपले वेगळेपण टिकवून आहे. लोकसाहित्याचा वर्तमानाशी अनुबंध आहे. सर्वसामान्य माणूसही आज लोकसाहित्याचा फार मोठा वाचक आहे. तोही आपले सांस्कृतिक जीवन समजून घेतो आहे हा बदल स्वागतार्ह असाच आहे.

☆☆☆

# ग्रामीण भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचार एक आस्वाद

श्री. सदानंद देशमुख
संपर्क : ९४२०५६४९८२

**मराठी भाषा ही एक अखंड वाहणारी सरिता आहे. तिच्या उगमस्थानानंतर अनेक ओढे आणि ओहळाने तिला समृद्ध केले आहे.**

कोणतीही भाषा त्या भाषेचा जो वाङ्मयीन उपयोग होतो. त्यामुळे अधिक शैलीदार आणि कलात्मक होत असते. मराठी भाषेत यादवकालखंडात जी महानुभाव वाङ्मयाची आणि ज्ञानेश्वरी सारख्या अभिजात ग्रंथाची निर्मिती झाली. त्या काळात या भाषेचा डौल वाङमयीन अंगाने अधिक समृद्ध झाला. नंतरच्या काळात वारकरी संप्रदायातील अनेक संत कवीनी आणि पेशवे कालखंडातील अनेक पंतकवींनी या भाषेला वाङ्मयनिर्मितीच्या माध्यमातून अधिक कलात्मक आणि शैलीदार बनवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. मात्र भारतात औद्योगिक क्रांतीला सुरुवात होण्यापूर्वी; महानगरांची निर्मिती होण्यापूर्वी, बलुतेदारीच्या आणि वस्तुविनिमय व्यावहारिक पद्धतीच्या काळात, जेव्हा खरा भारत खेड्यात होता; संपूर्ण समाजजीवन कृषिकेंद्रित होते. त्या काळात मराठी भाषेला समृद्ध करण्याचे काम तेथील कष्टकरी स्त्री पुरूषांनी आपल्या भाषिक व्यवहारातून केलेले दिसून येते. साहित्यनिर्मिती सामान्य लोकांसाठी छापील स्वरूपात उपलब्ध होणे खर्चिक आणि वेळखाऊ होते. मात्र अशावेळी साहित्यनिर्मिती होतच नव्हती असे नाही. उलटपक्षी आजच्या पेक्षा ती अधिक तीव्र; अधिक उत्कट अल्पाक्षरी आणि आशयगर्भी होती.

अल्पाक्षरत्व आणि आशयगर्भता हा ज्या ग्रामीण लोक साहित्याचा प्रधान गुणधर्म होता त्यासाठी अर्थातच माझ्या या विधानाच्या केंद्रस्थानी ग्रामीण म्हणी आणि वाक्प्रचार आहेत.

'म्हण' म्हणजे मी म्हणालो तेच तूही म्हण! सहाजिकच बोलणारा कडून जे वाक्य ऐकणारा ऐकतो. तेच वाक्य संमोहन झाल्यासारखा पुढच्या वेळी तो दुसऱ्यांशी बोलताना म्हणतो. इथेच 'म्हण' या शब्दाचे कार्य सफल संपूर्ण होते. आणि अशा प्रकारे भाषिक दळण वळणात ह्या म्हणी चैतन्याकळा लेऊन जिवंत राहतात. एकाकडून दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे असा त्यांचा प्रवास आणि प्रवाह अव्याहत खळखळत राहतो. त्यातूनच एकाच वेळी आपल्याला संजीवन रूप प्राप्त करून देण्याबरोबरच भाषेला कलात्मक चैतन्य देण्याचे काम ह्या ग्रामीण भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचार प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे करत राहतात. लोक भाषित ग्रामीण समाजात गावा शिवारात वावरताना ठायी-ठायी अशा म्हणी आपल्या कानावर येत राहतात.

'म्हण' म्हणजे अल्पाक्षरी प्रकारात मोडला जाणारा अस्सल वाङ्मय प्रकार आहे. इतर वाङ्मय प्रकारात निर्मात्याचे म्हणजे लेखक/कवीचे नाव असते. तसे म्हणीच्या कर्त्याचे नाव तिला लगडून नसते. हे तिचे आणखी थोरपण आहे. सृजन

आहे; निर्मिती आहे, पण अनामिक या नि:स्पृह अंगभूत वैशिष्ट्यांमुळे म्हणीच्या थोरवीत आणखी भरच पडते. कितीतरी वर्षांपासून म्हणीच्या थोरवीत आणखी भरच पडते. कितीतरी वर्षांपासून या ओठावरून त्या ओठावर असा प्रवास करीत ती जिवंत असते. असे जिवंत राहण्यातच तिचा चिवट जीवटपणा दिसून येतो. भाषेच्या प्रादेशिक स्तर भेदानुसार लवचीक होऊन आपल्याला बदल घडवून आणण्याचा नवसर्जनाचा गुणधर्मही तिच्यात अनुभवाला येतो आणि त्याही महत्त्वाचे असते आशयाचा समृध्दपणा न घालवण्याचे तिचे कसब अतिशय कमी शब्दांचा वापर करनू फार मोठा, जवनाा वेढून टाकणारा आशय व्यक्त करण्याची अंगभूत शक्ती !

ग्रामीण भाषेत अशा हजारो म्हणी आहेत की त्यांचा वापर प्रयोजनसिद्ध असतो. आशयाची अनेक वलये जशी म्हणीत असतात तशीच अर्थगर्भता आणि अर्थविस्ताराची अंगभूत शक्ती हे त्यांचे प्रधान वैशिष्ट्य असते.

**उदाहरणार्थ –**

त्याची नियतच तशी हाये, घराते खायाचं अन् दाराले हात पुसायचे;
अघोरी बसला जेवायले अन् हिमटी बसली वाढायले;
ढकल-मकल अन् आयतं पिकंल;
संधत्मं कांडलं शिजवून ठेवलं;
गेलं इझत. आत्मा मुसळ्या बसला गिळत;
पाळायले नो पोसायले अन् फुकट डोळे वासायले;
वाकळीतले पाय साखलीत आले त लय गुण सुचले;
आंधळ डोळा काजळानं साजरा;
आयत्या पत्रावळीवर द्रोण टेकवते;
सांगलं तेवढं पांगलं म्हणून नाई. सांगतलं तेच चांगलं;
एक हात लाकूड नऊ हात झिलपी;
शेराचा भंडारा अन् गावभर दिंडोरा,
आगाजा गावाले अन् शेंगुळं देवाले;
मानानं खाये ना तूप रोटी अन् निजल्या निजल्या उखळ चाटी,
मन केलं मोठं अन् चोळी शिवली दोन बोटं,
ज्याचा त्याले चोप नाई अन् शेजाऱ्याले झोप नाई;
लोकायचं लेणं अन् सवच वापस देणं;
हिडग्याले देली गाय अन् चारदा देऊने पाह्य;
चाटी बाबा लुगडं दे पालामांगं नेसून घे;
घरची करती देवा देवा, अन बाहीचीले चोळी शिवा;
हालव पालव मालव अन् दिव्यातलं तेल घालव;
काय धुणं धुतलं व नुस्तंच मोरीवरचं दोरीवर केलं; फ
निर्मळ चांगुना अन् कुत्रं हुंगेना;
ढवळा मणी अन् म्हातारपणी

अशा म्हणींच्या आशय अभिव्यक्तीमधून एक बाब सहजपणे लक्षात येते की ह्या म्हणींची निर्माती निश्चितपणे ग्रामीण स्त्री आहे. आपल्या अनुभव आणि निष्ठा यांच्याशी प्रामाणिक राहून प्रसंगपरत्वे उत्कट भावनावेगातून तिने या म्हणींची निर्मिती केली आहे. खरं म्हणजे निर्मिती केली आहे असंही म्हणता येणार नाही. तिला अवगत असणाऱ्या भाषिक ज्ञान-आकलनातून आपसूकच तिच्याकडून हे भाषिक उपयोजन झाले आहे. फांदीवर पान यावे तशी सहजतेने ओठावर म्हण आली आहे.

प्रसंगानिष्ठता, लिंगनिष्ठता ही जशी म्हणीच्या निर्मितीच्या मुळाशी दिसून येते. त्याचप्रमाणे व्यवसायनिष्ठता हा सुद्धा तिचा महत्त्वाचा गुणधर्म सांगता येतो. प्रत्येक व्यवसायात कृतीशी आणि उपकरणाशी निगडित काही विशिष्ट शब्द असतात. त्या शब्दांचा उपयोग केवळ त्या व्यवसायाच्या भाषिक क्षेत्रता केला जाता; त्याचप्रमाणे अनेक म्हणींची निर्मिती त्या व्यवसायाशी निगडित असलेली दिसून येते. उदाहरणादाखल कृषी क्षेत्राशी निगडीत काही म्हणींचा उल्लेख येथे करता येईल.

पाटील घोड्यावर अन् कडबा डोक्यावर, बैल गेला अन् झोपा केला;
बेवारस पल्डं मढं अन् पाटलाले पल्ड कोडं; ज्याचे शिंगं त्यालेच भारी झाले,
शेण पल्डं की माती घेऊन उठतेच; एक औताले अन् दहा भौताले, शेती म्हणजे काय ?
चोर नेईना अन् धनी टाकेना; वरलीवाला एका दाण्यानं अन शेतकरी एका पाण्यानं मार खाते.

अशा कितीतरी म्हणींमधून कृषी जीवनाचे हर्षामर्ष, सुखदु:ख, वेदना-संवेदना अतिशय उत्कटपणे व्यक्त होताना दिसतात.

म्हणींचे वर्गीकरण अनेक पातळ्यांवर करता येते. त्या अर्थाने त्यांचा वावर सार्वत्रिक सर्वव्यापी आणि सर्वकालिक असलेला दिसून येतो. व्यवसायनिष्ठते प्रमाणेच विधिनिष्ठता हे सुद्‌धा म्हणींचे वैशिष्ट्य दिसून येते. 'गंज तुम्ही लग्न कलं असांल पण आम्हीही तोरणाखालून जायेल असू.' 'उतावळा नवरा गुडघ्याले बाशिंग;' ह्या म्हणींमधून लग्न विधी समारंभ सूचित होतो. त्याचप्रमाणे कौटुंबिक आणि सामाजिक अंगाने होणारा म्हणींचा वापर हा अधिक लक्ष्यवेधी असलेला दिसून येतो. 'इच्चू व्याला अन् टोकर झाला;' शेंबूड आपल्या नाकाले अन् ग्यान शिकवी लोकाले; ज्याचा इट त्याचाच भांग करा लागते नीट; मोठ्या घरी लेक द्या अन् शिराणीची वाट पहा' पिठात मीठ संपादते, मिठात पीठ नाही संपादत. आपल्याच ताकाले कोणी गोड म्हणते; निंग-निंग दिवसा अन् खायाचा व्यवसा... अशा म्हणी आणि वाक्यप्रचारांचा वापर कुटुंब संस्थेत स्त्री-पुरूषांकडून होताना दिसतो.

मराठीत खेड्या पाड्यात राहून लेखन करणाऱ्या अनेक ग्रामीण साहित्यिकांनी आपल्या कथा-कांदबऱ्यातून या म्हणींचा समर्पक उपयोग केलेला दिसून येतो. कथा-कांदबऱ्यात वातावरण निर्मितीसाठी आणि भाषिक अंगाने कलाकृती समृद्‌ध; कलात्मक आणि वास्तववादर्शी करण्याचे काम ह्या म्हणी वाक्‌प्रचारातून होत असते. लोकचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा आणि बखर वाङ्‌मयातूनही या भाषिक लोकधनाचा खूपच चांगला उपयोग झाल्याचे प्रत्ययाला येते.

म्हणींचा वापर सर्वच लिपीबद्‌ध भाषेतून झालेला आहे. इंग्रजी, हिंदी, अरबी, उर्दू आणि सर्वच राज्य भाषेप्रमाणे ज्या लोकसमूहात जाती पोटजातीत (उदा. बंजारा, वडरी) भाषेला लिपी नाही पण भाषा अस्तित्वात आहे. अशा भाषेतूनही म्हणी आणि वाक्‌प्रचार वापरले जातच असतात. आजही त्यात खंड पडलेला नाही. कारण आजही शेतारानाच्या मुक्त अवकाशात वावरणारे स्त्री-पुरुष श्रमाच्या किंवा श्रमपरिहाराच्या वेळी अगदी उत्कटपणे आपल्या आत्मविष्काराच्या प्रकटीकरणासाठी ''म्हणगूतच हाये''.. अशी सुरूवात करून 'सासू तशी सून अन् उंबरठ्याचा गुण....' या पद्‌धतीने बोलतच असतात.

एखादी घटना किंवा प्रसंग म्हण उन्मळून येण्यास कारणीभूत ठरत असते अशा म्हणीतून कधी जीवनविषयक भाष्य केले जाते, कधी संदेश दिला जातो. कधी उपरोध व्यक्त होतो. कधी विनोद निर्मिती होते तर कधी व्यक्तिचित्रण केले जाते. म्हणूनच गाव-खेड्यात आणि वस्त्या वाड्यावर तिचे साजिवंत अस्तित्व असते. त्या अर्थाने विचार केल्यास म्हणींचा उपयोग करणाऱ्या स्त्री-पुरूषांचे कार्य म्हणजे 'न लिहिणाऱ्या लेखक कवींचे' मौखिक परंपरेतील महत्त्वाचे कार्य आहे. म्हणीच्या आशयविश्वात जेवढे आपण गुंतत जाऊ तेवढी त्या उक्ती विधानातील अर्थघन परिपक्वता आस्वाद पातळीवर आपल्याला आनंद देत असते. प्राचार्य पदावर असणाऱ्या व्यक्तीपासून तर शेतात कष्ट करणाऱ्या स्त्रियांपर्यंत म्हणींचा उपयोग होतो. सुशिक्षित अशिक्षित असा भेदभाव न करता लवचीकपणे त्यांचा वावर भाषेच्या व्यवहारात दिसून येतो. अशा या आपल्या भोवती असणाऱ्या लोकधनाचे संगोपन प्रत्येकाने डोळसपणे केल्यास, त्यांचा आस्वाद घेऊन वापर केला तर भाषेच्या वापराचे एक मनभावी समाधान प्रत्येकाला मिळेल. यात संशय नाही.

☆☆☆

# प्रसारमाध्यमांची भाषा

श्री. संतोष शेणई
संपर्क : ९८८१०९९०१६

आपल्या केवळ सांस्कृतिक जीवनातच नव्हे, तर राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनातही माध्यमे आता मध्यवर्ती भूमिकेत येत आहेत. वेळेशी स्पर्धा करत आणि स्वत:च्या क्षमता वाढवत स्वत:ला सतत अपडेट करणारा पत्रकार नव्या ज्ञानयुगाच्या आघाडीवरचा शिलेदार आहे. पत्रकारिता म्हणजे जगात जे जे काही महत्त्वाचे घडते आहे, त्याची माहिती संकलित करायची, त्यावर प्रक्रिया करायची आणि ती सर्वसामान्य वाचक-श्रोते-प्रेक्षक यांच्यासमोर नेटक्या रूपात सादर करायची. तंत्रज्ञानातील प्रगतीनुसार त्याची साधने विकसित होत गेली आहेत. पण लोकांसमोर माहितीचा प्रवाह आणून पोहोचवण्याचे पत्रकारितेचे मूळ तत्त्व कायम राहिले आहे. भविष्यातही ते तसेच राहील. आतापर्यंतची पत्रकारिता ही प्रामुख्याने वृत्तपत्रांची होती. पण त्यात नभोवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट या माध्यमांची भर पडली. अलीकडच्या काळात संगणक, इंटरनेट आणि आता मोबाईल-टॅबलेट आदी नवमाध्यमे आली आहेत. माहिती देणे, रंजन करणे आणि शिक्षित करणे हे पत्रकारितेचे मुख्य काम. हे काम करताना अनेकानेक व्यक्तींशी सतत संवाद साधावा लागतो. त्यांचे म्हणणे समजून घ्यावे लागते आणि ते साध्या-सोप्या शब्दात मांडावे लागते. आता यासाठी भाषेवर पकड हवीच.

**वृत्तपत्रातील भाषेचा विचार करताना केवळ शब्दांचा विचार करता येत नाही. त्या शब्दांची जागा व आकार यांचाही विचार करावा लागतो.**

माध्यमानुसार भाषेचा बाज बदलतो. कारण माहितीच्या सादरीकरणाचा बाज बदललेला असतो. वृत्तपत्रातील भाषा लिखित असते. नभोवाणीत ती ध्वनिरूप असते, तर दूरचित्रवाणीत ती दृक्-श्राव्य स्वरूपात असते. आता इंटरनेट व मोबाईलवर तिचे डिजिटल स्वरूपात बहुढंगी सादरीकरण होते. त्यामुळे माध्यमाची भाषा समजणे आणि त्याच्याशी संबंधित तंत्रज्ञानावर स्वार होणे हे आव्हान पत्रकारांपुढे असते. या माध्यमांची भाषा एकच (म्हणजे मराठी) असली, तरी या प्रत्येक प्रसारमाध्यमाची स्वत:ची अशी भाषा असते. म्हणून वृत्तपत्रांसाठी मराठी वेगळी, दूरचित्रवाणीची मराठी वेगळी आणि नभोवाणीचीही मराठी वेगळी असते. नभोवाणीची व दूरचित्रवाणीची भाषा शारीर असते. ती कानांनी अनुभवता येते. वृत्तपत्रांची भाषा तशी नसते. वृत्तपत्रे निघाल्यापासून मराठीत भाषाविषयक मोठी घडामोड सुरू झाली. या घडामोडीची भाषाशुद्धी व नवीन शब्दांच्या निर्मितीच्या अनुषंगाने काही वेळा विचारही झाला आहे. मात्र अजूनही प्रसारमाध्यमे ही भाषाप्रदूषक आहेत की भाषासंवर्धक आहेत याचा पूर्ण समाधानकारक निर्णय झालेला नाही. तो होणारही नाही. कारण प्रसारमाध्यमातील भाषाव्यवहाराचे स्वरूप दुहेरी राहते. एकाच वृत्तपत्राची भाषाही एकसंध, एकसूत्री नसते. वृत्तपत्राची भाषा ही बातम्या, लेख, स्तंभलेख, छायाचित्राखालील ओळी, अग्रलेख, भाष्ये अशा विविध घटकांतून आपल्यापुढे येते. या प्रत्येक लेखनप्रकाराचे स्वरूप वेगवेगळे असते. ते त्या त्या पातळीवर स्वयंपूर्ण असते. कमीत कमी शब्दात एखादी घटना नेमकेपणाने वाचकांपर्यंत पोहोचवायची असते. अशावेळी एखाद्या बातमीचे शीर्षक 'रैना बरसे' असे असेल तर आपल्याला हिंदी गाणे आठवत नाही, तर सुरेश रैना याची फलंदाजी आठवते. त्याने समोरच्या गोलंदाजांची काय स्थिती केली असेल हे लगेच लक्षात येते.

वृत्तपत्रातील भाषेचा विचार करताना केवळ शब्दांचा विचार करता येत नाही. त्या शब्दांची जागा व आकार यांचाही विचार करावा लागतो. बातमीचे शीर्षक ज्या पद्धतीने छापलेले असते, त्याने व्यापलेली जागा त्या बातमीचे महत्त्व वाचकांना

सांगत असते. वृत्तपत्र आसपासच्या घटना-घडामोडीतील जिवंतपणा व्यक्त करीत असते. त्यासाठी भाषिक प्रयोगही केले जातात. सर्फ एक्सेलच्या जाहिरातीची टॅग लाईन आहे. 'धो डाला'. ज्यावेळी महेंद्रसिंग धोनी याच्या नेतृत्त्वाखालील क्रिकेट संघाने पाकिस्तानच्या संघाचा पराभव केला, त्यावेळी हे टॅगलाईनचे शब्द बातमीच्या शीर्षस्थानी आले होते. अशा विचलनाने झालेला अर्थविस्तार वृत्तपत्रात अलीकडे अधिक पहायला मिळतो.

अग्रेलेखाची भाषा बातमीतील भाषेपेक्षा वेगळी असते. बातमीतील तात्कालिकतेला बाजूला करून त्यामागचे जे संग्राह्य असेल ते अधोरेखित करण्याचे, त्यावर भाष्य करण्याचे व त्या समकालीन इतिहासाचे भान समाजाला आणून देण्याचे काम अग्रलेख करीत असतो. त्यामुळे अग्रलेखाची भाषा जोरकस, परिणाम साधणारी व जबाबदार असावी लागते. एकीकडे प्रौढ असा त्या भाषेचा बाज असतो, पण त्याचवेळी ती वाचकांशी संवादी राहण्यासाठी व्यावहारिक भाषेला जवळ जाणारी असते. लोकमान्य टिळक, आचार्य अत्रे, नीलकंठ खाडिलकर यांचे अग्रलेख या दृष्टीने अभ्यासता येतील.

कोणतेही लेखन हे करणारी व्यक्ती असते. त्यामुळे त्या व्यक्तीचे भाषेचे ज्ञान, त्याची भाषा वापरण्याची शैली आणि ज्या घटनेचे वर्णन करायचे आहे. त्याविषयीची समज यांचा लेखनावर परिणाम होतोच, त्यामुळे वृत्तपत्रांची म्हणून एक शैली सांगितली जात असली तरी व्यक्तीगणिक शैली बदललेली असतेच. त्या सर्वांच्या मिश्रणातून वृत्तपत्राची भाषा घडते हेही लक्षात घ्यावे लागेल.

आणखी एक गोष्ट म्हणजे आपला समाज आता एकभाषी राहिलेला नाही. त्यामुळे इंग्रजी, हिंदी शब्दही मराठी वाक्यरचनेत घुसलेले दिसतात. जे समाजात तेच वृत्तपत्रात. त्यामुळे एखाद्या मराठी वृत्तपत्राच्या स्थानिक पुरवणीचे नाव 'पुणे टुडे' असले तरी ते कुणाला खटकत नाही. संकरित रूपातील मराठीतून या समाजाची रचना, या समाजाची मानसिकता आणि सामाजिक स्थित्यंतर याचेच दर्शन होते. याबरोबरच महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या बोलीभाषांच्या आवाजाचे सूक्ष्म ध्वनीही वृत्तपत्रांमधून ऐकू येऊ लागले आहेत. वैदर्भी, मराठवाडी, खानदेशी बोलींमधील शब्द बातम्यांमधून, लेखांमधून येत आहेत. त्यामुळे प्रमाणभाषाच अधिक बळकट होते. अर्थात जे प्रसिद्ध होते, ते सगळेच योग्य असते असे नाही. अनेक भाषिक चुकांनी वृत्तपत्रे भरलेली असतात. हा भाषाव्यवहार अशुद्ध होण्याला पत्रकारांचे भाषेविषयीचे अज्ञान व बेफिकिरी कारणीभूत आहे. याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. यामुळे येणारी भाषा अशुद्धी गैरच मानली पाहिजे.

नभोवाणी व दूरचित्रवाणी यांची भाषा ही वृत्तपत्रांच्या भाषेहून वेगळी असते. 'लेखी' भाषेला 'बोली' करणे हे या दोन्ही माध्यमात आवश्यक असते. पण केवळ उपांत्य अक्षरांवरच्या वेलांट्या आणि अंत्य अक्षरांवरच्या मात्रा काढून टाकल्या म्हणजे हा बदल होतो, असा समज झालेला आढळतो. या समजातून अनेक घोटाळे झालेले आपल्याला पहायला मिळतात. (मुळं, विद्यमानं, कडं असे शब्द काही वेळा निवेदकाकडून ऐकायला मिळतात ते याचमुळे). आपण बोलतो तसे लिहिताना द्व्यर्थी शब्द वापरले जाणार नाहीत हे लक्षात घ्यावे लागेल. एकाच अर्थाचे एकाहून अधिक शब्द असतील तर त्यातीलही सर्वांना सहज समजणारा शब्द योजला पाहिजे. आपण नेमका एखादा शब्द का वापरतो आहोत, याचा त्यासाठी विचार करावा लागतो. छोटी वाक्ये ही या माध्यमाची एक गरज आहे. बोजड व अनाकलनीय वाक्यरचना या माध्यमांसाठी मारक ठरते. भाषेचा फुलोरा व चित्रमयी भाषा नभोवाणीसाठी अतिशय उपयुक्त ठरते. मात्र दृकश्राव्य माध्यमात वर्णनात्मक मजकूर मारक ठरतो. तेथे चित्रांना बोलू द्यायचे असते आणि त्या चित्रांना पूरक एवढेच माफक आपण बोलायचे असते.

इंटरनेट, सोशल नेटवर्क, मोबाईल ही प्रसारमाध्यमे यापुढच्या काळात अधिक जोर धरतील हे नक्की. त्यावरची भाषाही बहुढंगाने घडते आहे, तिचा विचार स्वतंत्ररीत्या करण्याची आवश्यकता आहे. एकूणच प्रसारमाध्यमांमधून भाषा विस्तारते आहे, अर्थबहुलता वाढते आहे. त्यावेळीच भाषेचा अयोग्य रीतीने वापरही वाढतो आहे. तेवढी बेफिकिरी सोडायची हे प्रत्येकाने स्वत:च ठरवले पाहिजे.

☆☆☆

# मराठी पाट्या व मराठी लेखन

प्रा. विश्वनाथ बाहेकर
संपर्क : ७५८८५२०६१२

पहिली व दुसरी इयत्ता भाषेची धारणा पक्की करण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात विद्यार्थी भाषा शिकताना शब्दांचे संबोध व्यवहारातील वस्तूंशी पडताळून पाहत असतो. 'कमळ' हा शब्द शाळेत शिकल्यानंतर एखाद्या तलावात त्याला पाठ्यपुस्तकातील चित्रात पाहिलेले कमळाचे फुल दिसले तर त्याला खूप आनंद होतो. 'आई कमळ बघ' असे तो सोबत असलेल्या आईला मोठ्याने ओरडून सांगतो. आपल्या पुस्तकातील कमळाच्या फुलाच्या चित्राविषयी सांगतो. त्याच्या पुढच्या टप्प्यावर म्हणजे विद्यार्थी तिसऱ्या व चौथ्या इयत्तेत असताना आपण शिकलेले काना, मात्रा, वेलांटी उकार विद्यार्थी रस्त्यावरील जाहिरातीचे फलक, दुकानाच्या पाट्या, मार्गदर्शक फलक यामध्ये शोधत असतो. बसमधून प्रवास करताना किंवा रस्त्यावरून पायी चालताना आपण लहान मुलांचे विशेषत: १० वर्षे वय असणाऱ्या विद्यार्थ्यांचे निरीक्षण केले तर हे सर्व विद्यार्थी रत्यावरील फलक वाचत असल्याचे आपल्या सहज लक्षात येते.

रस्त्यालगत दुकानांवरील ह्या पाट्या वाचता-वाचता मुलांचे भाषेचे कौशल्य विकसित होत असते. शाळेत जाताना, येताना, इतरवेळी आई-वडिलांसोबत असतानाही मुले सतत दुकानांच्या पाट्यांवर किंवा जाहिरातींच्या फलकावर लिहिलेली माहिती त्यांना जमेल तशी, झेपेल तशी वाचत असतात. ते ही माहिती बरोबर वाचतात का ? यावर कुणाचेही नियंत्रण नसते. 'दवाखाना' हा शब्द ते 'दवारवाना' असाही वाचतात. हा त्यांच्या वाचनातला दोष जर विद्यार्थी मोठ्या आवाजात वाचत असेल तर शेजारचा सुजाण नागरिक सहज दूर करू शकतो. परंतु 'मला काय त्याचे' या वृत्तीमुळे ते तसेच दोषासकट त्याचे वाचन, स्वयंअध्ययन पुढे अनेक वर्ष तसेच सुरू रहाते. यथावकाश जेव्हा-केव्हा त्याची ही 'संकल्पना' स्पष्ट होते तेव्हा त्याच्या वाचनातील ती चूक दुरूस्त होते.

बरोबर लिहिलेल्या पाट्या वाचताना विद्यार्थी चुकीचे वाचतात हा त्यांच्या अध्ययनातील दोष किंवा त्रुटी असेच आपण मानतो. परंतु रस्त्यावरून जाताना अनेक पाट्यांवरील 'ढोबळ' चुका लक्ष वेधून घेतात. नव्हे त्या पाट्या वारंवार दृष्टीस पडत असल्यामुळे त्या पाटीवर लिहिलेलेच बरोबर व शिक्षकांनी वर्गात शिकविलेले चूक असेही विद्यार्थी समजतात.

आमच्या नात्यातील तिसरीमध्ये शिकणारी गायत्री नावाची मुलगी आपले नाव 'श्री गायत्री' असे लिहित असल्याचे तिची वही पाहिल्यानंतर मला कळले. मी तिला विचारले, ''कोणत्या सरांनी/मॅमनी तुला तुझे नाव असे लिहायला शिकविले?'' गायत्रीने पहिलीच्या शिक्षकांनी शिकविलेल्या नावात जी सुधारणा केली त्याचा संदर्भ मला जेव्हा

**रस्त्यालगत दुकानांवरील पाट्या वाचता-वाचता मुलांचे भाषेचे कौशल्य विकसित होत असते.**

कळला तेव्हा मला आश्चर्याचा धक्का बसला. शाळेसमोर असलेल्या गायत्री हॉटेलच्या पाटीवरील नाव येताना जाताना वाचून तिने आपल्या नावात सुधारणा केली होती व कु. गायत्री ऐवजी सगळ्या वह्या-पुस्तकांवर ती आपले नाव 'श्री गायत्री' असे लिहित होती. कोणी आपल्या हॉटेल, दुकानांना काय नावे द्यावीत याचे त्यांना स्वातंत्र्य असले तरी किमान लिंगवचनाचा विचार व्हायला नको का ?

वर्गात शिकविलेल्या शिक्षकापेक्षा बाहेरचे निरीक्षण विद्यार्थ्यांवर अधिक प्रभाव दर्शविते. हेच या प्रत्यक्ष घडलेल्या उदाहरणावरून सहज लक्षात येते. वर्गात एक गोष्ट एकदाच शिकविली जाते परंतु बाहेरचे निरीक्षण पुन्हा पुन्हा सातत्याने घडत असते.

सरकारकडून, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लावलेल्या अनेक फलकांवरसुद्धा अशा 'ढोबळ' चुका असतात. ज्यामुळे शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लिखाणावर त्याचा परिणाम होतो. वारंवार जी गोष्ट नजरेला पडते त्याची प्रतिमा मेंदूवर कायम कोरली जाते. वारंवार भेटणारा माणूस मुलांच्या ओळखीचा होतो. त्याचे नाव स्मरणात राहते. इतरही माहिती किंवा गुण-दोष विद्यार्थी त्या व्यक्तीविषयी सांगू शकतात. त्याचप्रमाणे वारंवार नजरेला पडणाऱ्या पाट्या व त्यावरील मजकूर विद्यार्थ्यांच्या कायम जसा लिहिला आहे तसा लक्षात राहतो व तो चुकीचा असेल तर तो तसाच चुकीचा अनेक वेळा दुरूस्त करूनही दुरूस्त होत नाही.

पैनगंगा नदीच्या 'एकेरी' पुलावर जास्त वेळ एस.टी. बस थांबत असल्यामुळे त्या ठिकाणी ये-जा करणारे अनेक विद्यार्थी एक - (१) ऐक असा लिहित असतील तर त्यात नवल वाटू नये. मेहकर शहरासारखी अनेक शहरे महाराष्ट्रात आहेत व अनेक चुकीचे विशेषत: ढोबळ चुका असलेले अनेक फलक महाराष्ट्रात असतील ज्यांचा मराठी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लिखाणावर निश्चितच दुष्परिणाम होत आहे. ते सर्व फलक दुरूस्त व्हावेत हीच लेखामागील भूमिका आहे.

☆☆☆

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

*माहे मार्च २०१५ अखेर मंडळ सेवेतील खालील अधिकारी/कर्मचारी नियत वयोमानानुसार/स्वेच्छेने सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या प्रदीर्घ अशा सेवाकालाचा लाभ मंडळाच्या कामकाजामध्ये झाला आहे. त्यांचे अनुभव व कार्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन लाभलेले आहे. या सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आयुरारोग्य आणि संपन्न जीवन लाभो अशी मंडळाकडून शुभकामना !*

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | पद | मंडळ | निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| *नियत वयोमानानुसार -* | | | | |
| १) | श्रीमती एस. सी. मेश्राम | पर्यवेक्षक लिपिक | नागपूर | ३१/०३/२०१५ |
| २) | श्री. एस. एस. खोत | कनिष्ठ लिपिक | कोल्हापूर | ३१/०३/२०१५ |

# व्यावहारिक मराठी व करिअर संधी

**प्रा. सुजाता शेणई**
संपर्क : ९०११०१७९१६

**व्यवहारक्षेत्रात प्रचलित असणारी व उपयोगी पडणारी जी प्रमाण–बोलभाषा तिला व्यावहारिक मराठी असे म्हणतात.**

भाषा हे संवादाचे अविभाज्य अंग आहे. संवादातून, संभाषणातून एक व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती आपल्या मनातील विचार दुसऱ्यापर्यंत पोचवू शकतात. कधी ही भाषा औपचारिक स्वरूपात असते तर कधी अनौपचारिक स्वरूपात असते. कधी ती प्रमाण भाषा असते तर कधी बोली भाषा म्हणून त्याचा वापर होत असतो. घरातील व्यवहार ज्या भाषेतून होत असतात ती त्या समाजाची व्यावहारिक भाषा असते. आपण 'व्यावहारिक मराठी' या भाषेबद्दल विचार करू.

**व्यावहारिक मराठी म्हणजे काय ?**

घरातील मराठी जेव्हा सार्वजनिक ठिकाणी म्हणजे रस्ता, बाजार, दुकाने, मेळावे इत्यादी ठिकाणी आणि खाजगी स्वरूपात जेव्हा कार्यालये, संस्था, आस्थापनांमध्ये वापरली जाते तेव्हा ती माहिती, ज्ञान, सूचना, आज्ञा इत्यादी विविध रूपात वापरली जाते. ती काही अंशी संस्कारित, रूपांतरित आणि संक्रमित झालेली असते. अशी व्यवहारक्षेत्रात प्रचलित असणारी व उपयोगी पडणारी जी प्रमाण–बोलभाषा तिला व्यावहारिक मराठी असे म्हणतात.

**भाषेचे मुख्य प्रकार दोन असतात – १) मौखिक २) लिखित**

या दोन्ही प्रकारात व्यावहारिक मराठीची व्याप्ती भरपूर असून, त्यात करिअर करण्याची संधीही आहे. भाषेत करिअर करण्यासाठी सर्वप्रथम भाषेवर प्रभुत्व हवे. भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी काही मूलभूत गोष्टी आत्मसात करायला हव्यात, त्यातील काहींची प्रातिनिधिक स्वरूपात खाली नोंद करीत आहे –

- भरपूर वाचन, वाचन केलेल्या पुस्तकावर स्वत:चा अभिप्राय, त्यातील महत्त्वाच्या गोष्टींची नोंद.
- शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी शब्दार्थ कोश, वाक्प्रचार कोश व इतर कोश वाङ्मयाचे वारंवार वाचन.
- किमान मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्राचे नियमित वाचन, ज्यामुळे भाषांतर आणि रूपांतर दोन्ही गोष्टींचे अवलोकन होईल. मराठी भाषेतील किमान दोन वृत्तपत्रांचे तुलनात्मक वाचन.
- उत्तम वक्त्यांची भाषणे प्रत्यक्ष ऐकणे व बाजारात अभिजात साहित्यावर आधारित सी.डी. उपलब्ध आहेत त्या ऐकणे.
- निबंध लेखन, कल्पनाविस्तार, सारांशलेखन, आकलन, रसग्रहण, ग्रंथपरीक्षण इ. लेखनकौशल्ये पुन्हा पुन्हा वापरून पाहणे.
- भाषेच्या व्याकरणाचा सखोलतेने विचार करणे.

- विविध वाङ्मयीन नियतकालिके, दिवाळी अंक, मासिके इत्यादींचे अवलोकन करणे, यातून अद्ययावत राहता येते.
- एखाद्या घटकावर आधारित संगणकावर 'पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन' तयार करून, त्याचे सादरीकरण करणे.
- लहान, लहन कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात करावी, म्हणजे मोठ्या कार्यक्रमात सूत्रसंचालन करण्याची संधी मिळेल.
- प्रकट वाचनाचा सराव करावा. या प्रकट वाचनातील साहित्याच्या विविध वाङ्मयप्रकारांचा समावेश असावा. वर प्रातिनिधिक स्वरूपात उल्लेख केलेल्या घटकांचा जाणीवपूर्वक, अभ्यासूवृत्तीने विचार केला तर खालील संधी उपलब्ध होऊ शकतात.

### 'मौखिक' भाषेतील करिअर संधी

मौखिक भाषेचा विचार करता त्यात संवाद, भाषण, संभाषण, गटचर्चा यांसारख्या वैयक्तिक आणि सामूहिक दोन्ही प्रकारांचा विचार करावा लागतो. एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाबरोबरच प्रसार माध्यमांचेही शतक आहे. लिखित, श्राव्य, दृक्श्राव्य आणि इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध माध्यमातून भरपूर संधी उपलब्ध आहेत. वारकरी संप्रदायापासून चालत आलेली कीर्तन परंपरा अजूनही चालू आहे. उत्तम कीर्तनकारांच्या प्रवचनाला आजही मोठा श्रोतृवर्ग आहे.

आजच्या काळात मार्केटिंगला (विपणन) खूप महत्त्व आहे. कोणत्याही छोट्या अथवा मोठ्या वस्तूच्या विक्रीसाठी वेगवेगळे उपाय योजले जातात. यात प्रामुख्याने संभाषण आणि संवादकौशल्ये यावर भर असतो. कधी कधी सामूहिकरीत्या शिबिरे, मेळावे, प्रदर्शने भरवली जातात. यात सादरीकरणासह ग्राहकांशी संवाद यावर भर असतो. ज्याचे भाषेवर प्रभुत्व आहे, तो या दोन्ही गोष्टी करून स्वत:ची छाप पाडू शकतो. 'बोलणाऱ्याची बोरंही विकली जातात' या म्हणीचा प्रत्यय येऊ शकतो.

व्यावसायिकता आणि प्रोफेशनालिझम या आजच्या काळात महत्त्वाच्या गोष्टी ठरत आहेत. पुस्तक प्रकाशन, कवितांचे किंवा इतर साहित्यप्रकारातील अभिवाचनाचे कार्यक्रम, विविध कार्यक्रमांसाठी निवेदन सूत्रसंचालन या सर्वांमध्ये आता प्रोफेशनालिझम आला आहे. या कार्यक्रमातील सहभाग आणि चांगले सादरीकरण यामुळे प्रसिद्धी, पैसा आणि समाधान या तिन्ही गोष्टी मिळतात. विशेष म्हणजे ज्यांना स्वत:ची नोकरी किंवा व्यवसाय असेल ते सांभाळूनही हे करता येते किंवा पूर्णत: यातही करिअर करता येते. प्रसारमाध्यमांसाठी 'मुलाखत' घेणे ही वारंवार निर्माण होणारी गरज आहे. मुलाखत ज्या माध्यमासाठी घ्यायची त्याचा विचार करून उत्तम मुलाखतीची तंत्रे अवगत आणि विकसित करता येतात. चांगला मुलाखतकार म्हणून नाव कमावता येते. दूरचित्रवाणीवरील विविध वाहिन्यांवर एकाच वेळी अनेकांशी संवाद आणि मुलाखत दोन्ही पहायला मिळते.

आकाशवाणीवरील एफ. एम. वाहिन्या म्हणजे ज्ञान आणि मनोरंजन यांचे मिश्रण असते. आजच्या तरुणाईला रेडिओ सिटी, रेडिओ मिर्ची, रेड एफ. एम. या वाहिन्यांनी आकर्षित केलंय. या वाहिन्यांवरील आर. जे. (रेडिओ

जॉकी) खूप प्रसिद्ध आहेत. मराठी, हिंदी, इंग्लिश या भाषेच्या साहाय्याने ते लोकांचे मनोरंजन करत आहेत. आर.जे. म्हणून काम करत असताना इतरही आवडीच्या क्षेत्रात काम करता येते.

'सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' किंवा 'व्यक्तिमत्त्व विकास शिबिर' हे आजचे महत्त्वाचे कार्यक्रम झाले आहेत. जो या कार्यक्रमात व्याख्याता म्हणून सहभागी होतो त्याला तज्ज्ञ मार्गदर्शक (रिसोर्स पर्सन) म्हणून मान मिळतो. मानधन मिळते आणि पुढच्या कार्यक्रमाचे आमंत्रणही दिले जाते. हे तज्ज्ञ मार्गदर्शक भाषा आणि अभ्यासाच्या जोरावर 'कॉर्पोरेट' क्षेत्रातही कार्यशाळा घेतात. पूर्णवेळ हेच काम करणारे या क्षेत्रात आहेत.

हे शतक संगणकाचं शतक आहे. निरनिराळ्या प्रयोजनांवर आधारित सी.डी. किंवा डी.व्ही.डी. तयार केल्या जातात. (पेन ड्राइव्ह हा सुद्धा पर्याय आहे) या सी.डी./डी.व्ही.डी. मध्ये निवेदन करणे किंवा 'व्हॉईस ओव्हर' देणे हे करिअर होऊ शकते. अमराठी भाषकांसाठी मराठी कार्यशाळा, यु.पी.एस.सी. किंवा एम.पी.एस.सी. मध्ये ज्यांनी मराठी विषय घेतला त्यांच्यासाठी मराठी शिकविणे, दुभाषक म्हणून काम करणे, जनसंपर्क अधिकारी या सर्व क्षेत्रात उत्तम संधी आहेत, गरज आहे ती मौखिक भाषा प्रभुत्त्वाची !

**'लिखित' भाषेतील करिअर संधी**

लिखित भाषेत 'प्रशासनिक' भाषा आणि 'व्यावसायिक' भाषा असे भाग पडू शकतात. प्रशासनिक भाषेत अर्जलेखन, इतिवृत्त, अहवाल, टिपणीलेखन, करारपत्र, अधिसूचना, परिपत्रक इत्यादी भाग येतात. या प्रकारच्या भाषेला विशिष्ट रचनेचा बाज असतो. त्याच शासकीय परिभाषिक संज्ञा येणे गरजेचे असते.

'व्यावसायिक' लेखनात संहितालेखन, संवादलेखन, माहितीपत्रक, जाहिरातलेखन, शुभेच्छापत्र, मानपत्रलेखन, दिनदर्शिका तयार करणे, उत्तम अनुवाद करणे, भाषांतर करणे, संपादन करणे अशी कितीतरी व्यावसायिक क्षेत्रे उपलब्ध आहेत. प्रकाशन व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्तारित आहे. प्रकाशकांना मुद्रित शोधन करणारे हवे असतात. घरी बसून (आजच्या वर्क ॲट होम (Work at Home) या संकल्पनेशी संबंधित) अगदी ऑन लाईन पद्धतीने हे काम होऊ शकते.

महाजाल (इंटरनेट) हे आता गरजेचे झाले आहे. या महाजालावर विविध संकेतस्थळे दिसतील. उदा. मायबोली.कॉम, गदिमा.कॉम वगैरे अशी संकेतस्थळांची निर्मिती आणि काही संकेतस्थळांवर अद्ययावत माहिती पुरवत राहणं ही सुद्धा आजची कार्यक्षेत्रं झाली आहेत.

पत्रकार आणि लेखणी यांचं नातं अतूट आहे. बातमी लिहिण्यापासून ते या क्षेत्राशी संबंधित (तिन्ही माध्यमांसाठी) सर्व गोष्टी या भाषेशी निगडित असतात. काळाच्या रेट्यात 'जर्नालिझम' हे क्षेत्र आव्हानात्मक आणि विस्तारणारं ठरत आहे.

कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्याची आणि करिअर करण्याची संधी असते, परंतु यासाठी भाषा हे संवादाचे मूलद्रव्य चांगले आत्मसात करणे गरजेचे असते. आपल्या मातृभाषेत आपण विचार करू शकतो, त्या विचारांचे खंडन-मंडन करू शकतो, सर्जनशील लेखन-संशोधन करू शकतो आणि आपल्या भाषेद्वारे 'धन, मान आणि ज्ञान' प्राप्त करू शकतो.

☆☆☆

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचे अध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १८७८ | पुणे | न्या. महादेव गोविंद रानडे |
| २. | १८८५ | पुणे | कृष्णशास्त्री राजवाडे |
| ३. | १९०५ | सातारा | रघुनाथ पांडुरंग करंदीकर |
| ४. | १९०६ | पुणे | गोविंद वासुदेव कानिटकर |
| ५. | १९०७ | पुणे | विष्णू मोरेश्वर महाजनी |
| ६. | १९०८ | पुणे | चिंतामण विनायक वैद्य |
| ७. | १९०९ | बडोदे | कान्होबा रामछोडदास कीर्तिकर |
| ८. | १९१२ | अकोला | हरी नारायण आपटे |
| ९. | १९१५ | मुंबई | गंगाधर पटवर्धन |
| १०. | १९१७ | इंदूर | गणेश जनार्दन आगाशे |
| ११. | १९२१ | बडोदे | नरसिंह चिंतामण केळकर |
| १२. | १९२६ | मुंबई | माधव विनायक किबे |
| १३. | १९२७ | पुणे | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर |
| १४. | १९२८ | ग्वाल्हेर | माधव श्रीहरी अणे |
| १५. | १९२९ | बेळगाव | शिवराम महादेव परांजपे |
| १६. | १९३० | मडगाव | वामन मल्हार जोशी |
| १७. | १९३१ | हैदराबाद | श्रीधर वेंकटेश केतकर |
| १८. | १९३२ | कोल्हापूर | सयाजीराव गायकवाड |
| १९. | १९३३ | नागपूर | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर |
| २०. | १९३४ | बडोदे | नारायण गोविंद चापेकर |
| २१. | १९३५ | इंदूर | भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी |
| २२. | १९३६ | जळगाव | माधव जुलियन |
| २३. | १९३८ | मुंबई | विनायक दामोदर सावरकर |
| २४. | १९३९ | अहमदनगर | दत्तो वामन पोतदार |
| २५. | १९४० | रत्नागिरी | नारायण सिताराम फडके |
| २६. | १९४१ | सोलापूर | विष्णू सखाराम खांडेकर |
| २७. | १९४२ | नाशिक | प्रल्हाद केशव अत्रे |
| २८. | १९४३ | सांगली | श्रीपाद महादेव माटे |
| २९. | १९४४ | धुळे | भार्गवराव विठ्ठल वरेरकर |
| ३०. | १९४६ | बेळगाव | गजानन त्र्यंबक माडखोलकर |
| ३१. | १९४७ | हैदराबाद | नरहर रघुनाथ फाटक |
| ३२. | १९४९ | पुणे | शंकर दत्तात्रय जावडेकर |
| ३३. | १९५० | मुंबई | यशवंत दिनकर पेंढारकर |
| ३४. | १९५१ | कारवार | अनंत काकबा प्रियोळकर |
| ३५. | १९५२ | अमळनेर | कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी |
| ३६. | १९५३ | अहमदाबाद | विठ्ठल दत्तात्रय घाटे. |
| ३७. | १९५४ | दिल्ली | लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी |
| ३८. | १९५५ | पंढरपूर | शंकर दामोदर पेंडसे |
| ३९. | १९५७ | औरंगाबाद | अनंत काणेकर |
| ४०. | १९५८ | मालवण | अनिल |
| ४१. | १९५९ | मिरज | श्रीकृष्ण केशव क्षीरसागर |
| ४२. | १९६्र | ठाणे | रामचंद्र श्रीपाद जोग |
| ४३. | १९६१ | ग्वाल्हेर | कुसुमावती देशपांडे |
| ४४. | १९६२ | सातारा | नरहर विष्णू गाडगीळ |
| ४५. | १९६४ | मडगाव | वि. वा. शिरवाडकर |
| ४६. | १९६५ | हैदराबाद | वामन लक्ष्मण कुलकर्णी |
| ४७. | १९६७ | भोपाळ | विष्णू भिकाजी कोलते |
| ४८. | १९६९ | वर्धा | पु. शि. रेगे |
| ४९. | १९७३ | यवतमाळ | गजानन दिगंबर माडगूळकर |
| ५०. | १९७४ | इचलकरंजी | पु. ल. देशपांडे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१. | १९७५ | कराड | दुर्गा भागवत | ७०. | १९९७ | अहमदनगर | ना. सं. इनामदार |
| ५२. | १९७७ | पुणे | पु. भा. भावे | ७१. | १९९८ | परळी वैजनाथ | द. मा. मिरासदार |
| ५३. | १९७९ | चंद्रपूर | वामन कृष्ण चोरघडे | ७२. | १९९ | मुंबई | वसंत बापट |
| ५४. | १९८० | बार्शी | गं. बा. सरदार | ७३. | २००० | बेळगाव | य. दि. फडके |
| ५५. | १९८१ | अकोला | गो. नि. दांडेकर | ७४. | २००१ | इंदूर | विजया राजाध्यक्ष |
| ५६. | १९८१ | रायपूर | गंगाधर गाडगीळ | ७५. | २००२ | पुणे | राजेन्द्र बनहट्टी |
| ५७. | १९८३ | अंबेजोगाई | व्यंकटेश दिगंबर माडगूळकर | ७६. | २००३ | कराड | सुभाष भेंडे |
| ५८. | १९८४ | जळगाव | शंकर रामचंद्र खरात | ७७. | २००४ | औरंगाबाद | रा. ग. जाधव |
| ५९. | १९८५ | नांदेड | शंकर बाबाजी पाटील | ७८. | २००५ | नाशिक | केशव मेश्राम |
| ६०. | १९८६ | मुंबई | विश्राम बेडेकर | ७९. | २००६ | सोलापूर | मारुती चितमपल्ली |
| ६१. | १९८६ | ठाणे | वसंत कानेटकर | ८०. | २००७ | नागपूर | अरूण साधू |
| ६२. | १९८९ | अमरावती | केशव जगन्नाथ पुरोहित | ८१. | २००८ | सांगली | म. द. हातकणंगलेकर |
| ६३. | १९९० | पुणे | यु.म. पठाण | ८२. | २००९ | महाबळेश्वर | आनंद यादव |
| ६४. | १९९० | रत्नागिरी | मधू मंगेश कर्णिक | ८३. | २०१० | पुणे | द. भि. कुलकर्णी |
| ६५. | १९९२ | कोल्हापूर | रमेश मंत्री | ८४. | २०१० | ठाणे | उत्तम कांबळे |
| ६६. | १९९३ | सातारा | विद्याधर गोखले | ८५. | २०१२ | चंद्रपूर | वसंत आबाजी डहाके |
| ५६. | १९९४ | पणजी | राम शेवाळकर | ८६. | २०१३ | चिपळूण | नागनाथ कोत्तापल्ले |
| ६८. | १९९५ | परभणी | नारायण सुर्वे | ८७. | २०१४ | सासवड | फ. मुं. शिंदे |
| ६९. | १९९६ | आळंदी | शांता शेळके | ८८. | २०१५ | घुमान | डॉ. सदानंद मोरे |

☆☆☆

## निवेदन

सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी, विषयतज्ज्ञ, शिक्षण प्रेमी यांना आवाहन करण्यात येते की, मंडळाकडून 'शिक्षण संक्रमण' हा अंक दरमहा प्रकाशित केला जातो. शिक्षण संक्रमण मासिकाच्या सर्व वाचकांनी अंकाबाबतची आपली **प्रतिक्रिया** मंडळाकडे मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२-ए, फायनल प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ येथे पाठवाव्यात. प्राप्त झालेल्या प्रतिक्रियांना या मासिकातून प्रसिद्धी देण्यात येईल.

# साहित्य अकादमी पुरस्कारांचे मानकरी

| | | | |
|---|---|---|---|
| १९५५ | वैदिक संस्कृतीचा इतिहास | लक्ष्मणशास्त्री जोशी | ललित |
| १९५६ | सौंदर्य आणि साहित्य | बा. सी. मर्ढेकर | समीक्षा |
| १९५८ | बहुरूपी | चिंतामणराव कोल्हटकर | आत्मचरित्र |
| १९६० | ययाती | वि. स. खांडेकर | कादंबरी |
| १९६१ | भारतीय साहित्यशास्त्र | ग. त्र्यं. देशपांडे | समीक्षा |
| १९६३ | रथचक्र | श्री. ना. पेंडसे | कादंबरी |
| १९६४ | अनामिकाची चिंतनिका | पु. ल. देशपांडे | आत्मचरित्र |
| १९६५ | डॉक्टर केतकर | द. न. गोखले | ललित |
| १९६७ | भाषा : इतिहास आणि भूगोल | ना. गो. कालेलकर | समीक्षा |
| १८६८ | श्री शिवछत्रपती | शेजवलकर | समीक्षा |
| १९६९ | नाट्याचार्य देवल | श्री. ना. बनहट्टी | चरित्र |
| १९६९ | व्यक्ती आणि वल्ली | पु. ल. देशपांडे | ललित |
| १९७० | आदर्श भारत सेवक | न. र. फाटक | चरित्र |
| १९७० | स्वामी | रणजित देसाई | कादंबरी |
| १९७१ | पैस | दुर्गा भागवत | ललित |
| १९७३ | काजळमाया | जी. ए. कुलकर्णी | कथा |
| १९७४ | जेवहा माणूस जागा होतो | गोदावरी परुळेकर | आत्मचरित्र |
| १९७६ | स्मरण गाथा | गो. नी. दांडेकर | कादंबरी |
| १९७७ | सौंदर्यमीमांसा | रा. भा. पाटणकर | समीक्षा |
| १९७८ | नटसम्राट | वि. वा. शिरवाडकर | नाटक |
| १९८० | सलाम | मंगेश पाडगावकर | कविता |
| १९८१ | सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य | शरत्चंद्र मुक्तीबोध | समीक्षा |
| १९८२ | नक्षत्रांचे देणे | आरती प्रभू | कविता |
| १९८३ | सत्तांतर | व्यंकटेश माडगुळकर | कादंबरी |
| १९८४ | सौंदर्यानुभव | प्रभाकर पाध्ये | समीक्षा |
| १९८५ | उपरा | लक्ष्मण माने | आत्मचरित्र |

| | | | |
|---|---|---|---|
| १९८६ | खूणगाठी | ना. घ. देशपांडे | कविता |
| १९८७ | एक झाड दोन पक्षी | विश्राम बेडेकर | आत्मचरित्र |
| १९८८ | उचल्या | लक्ष्मण गायकवाड | आत्मचरित्र |
| १९८८ | गर्भरेशीम | इंदिरा संत | कविता |
| १९८९ | श्री विठ्ठल - एक महासमन्वय | रा. चिं. ढेरे | समीक्षा |
| १९९० | झोंबी | आनंद यादव | कादंबरी |
| १९९१ | हरवलेले दिवस | प्रभाकर उर्ध्वरेषे | आत्मचरित्र |
| १९९४ | एकूण कविता | दिलीप चित्रे | कविता |
| १९९५ | मर्ढेकरांची कविता | विजया राजाध्यक्ष | समीक्षा |
| १९९५ | झाडाझडती | विश्वास पाटील | कादंबरी |
| १९९६ | टीकास्वयंवर | भालचंद्र नेमाडे | समीक्षा |
| १९९९ | ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी | म. बा. धोंड | समीक्षा |
| १९९८ | तुकाराम दर्शन | सदानंद मोरे | समीक्षा |
| १९९९ | ताम्रपट | रंगनाथ पठारे | कादंबरी |
| १९९९ | राघववेळ | नामदेव कांबळे | कादंबरी |
| २००० | पानझड | ना. धों. महानोर | कविता |
| २००१ | तणकट | राजन गवस | कादंबरी |
| २००२ | युगांत | महेश एलकुंचवार | नाटक |
| २००३ | डांगोरा - एका नगरीचा | त्र्यं. वि. सरदेशमुख | कादंबरी |
| २००४ | बारोमास | सदानंद देशमुख | कादंबरी |
| २००५ | भिजकी वही | अरुण कोलटकर | कविता |
| २००६ | भूमी | आशा बगे | कादंबरी |
| २००७ | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | गो. म. पवार | चरित्र |
| २००८ | उत्सुकतेने मी झोपलो | श्याम मनोहर | कादंबरी |
| २००९ | चित्रलीपी | वसंत आबाजी डहाके | कविता |
| २०११ | वाऱ्याने हलते रान | ग्रेस | ललित |
| २०१२ | फिनिक्सच्या राखेतून उठला मोर | जयंत पवार | कथा |
| २०१३ | चार नगरांतले माझे विश्व | जयंत नारळीकर | आत्मकथन |

☆☆☆

# मराठी भाषेच्या अध्यापनाची अनौपचारिक पद्धत

प्रा. उत्कर्षा मल्ल्या
संपर्क : ९८२१३१२४७६

भाषा आणि मानव यांचा संबंध अतूट आहे. भाषेमुळे मनुष्य आपले विचार व्यक्त करू शकतो. 'भाष्' या संस्कृत धातूपासून भाषा हा शब्द झाला आहे. 'भाष्' म्हणजे बोलणे, सांगणे, आपल्या मनातील विचार, भाव-भावना, कल्पना अत्यंत प्रभावीपणे मांडणे ! म्हणूनच विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय.

**पाठ्यपुस्तकातला घटक कोणताही असो, पाठ्यपुस्तकाद्वारे भूतकाळातील घटना, त्यांची वर्तमानाशी तुलना करून भविष्याचा वेध घ्यायला शिक्षण देणे, हेच आनंददायी शिक्षणप्रक्रियेचे मूळ उद्दिष्ट आहे.**

मराठी भाषेचे अध्ययन-अध्यापन ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत आनंद देणारा अध्यापक असतो. तर आनंद घेणारा विद्यार्थी. ही आनंददायी प्रक्रिया अव्याहत सुरू राहण्यासाठी आपण पाठ्यपुस्तकाच्या जोडीने वाचन, चिंतन करणे आवश्यक आहे. जेवढे आपले वाचन अधिक तेवढा अध्यापनाचा आनंद अधिक. ११वी, १२वी चे पाठ्यपुस्तक नीट वाचून आपण तासिकेप्रमाणे योग्य नियोजन केले तर विद्यार्थ्याला 'अधिक' चे ज्ञान सहज देता येते.

सध्याचे युग हे ज्ञानप्रसार व ज्ञानस्फोटाचे युग मानले जाते. या युगात मानवी जीवनाशी संबंधित अशा पद्धतीचे साधे-सोपे, सुटसुटीत व आशयघन अध्यापन आपल्याला करावे लागते. यासाठी साधन म्हणून वापरत असलेली पाठ्यपुस्तके कशी असावीत ? यावर वेळ न दवडता उपलब्ध चाकोरीत विद्यार्थ्याला अधिकाधिक कसे देता येईल, यासाठी वेळ द्यायचा आहे. आपण भाषा शिकवतो, म्हणजे काय करतो ? याची समज मनाशी घट्ट ठरविली तर पुढचा भाग अगदी लीलया आनंददायी होईल. पाठाचे, कवितेचे अध्यापन करीत असताना सांघिक अध्यापन, सहकार्यात्मक अध्ययन, स्वयंअध्ययन, आंतरक्रियात्मक अध्यापन आदी पद्धतींचा अवलंब अध्यापक करीत असतो. यामुळे वाचन, श्रवण, लेखन आणि संभाषण ही जी भाषिक कौशल्ये आहेत, त्यांचा विकास होऊ शकतो.

### 'चक्रवाकाचे आगमन' : एक अनौपचारिक प्रयोग

अशाप्रकारे ११वी, १२वी च्या पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांचे अध्यापन करीत असताना मी स्वत: काही प्रयोग केले. त्यातील उदाहरणादाखल हा भाग. 'चक्रवाकाचे आगमन' हा ११वी च्या पाठ्यपुस्तकातील पाठ शिकवत असताना, तो रंजक वाटावा म्हणून डॉ. सलीम अली यांचा पक्षीकोश विद्यार्थ्यांना बघायला दिला. चक्रवाक पक्ष्याचे विविध फोटो मोबाईलवर सेव्ह करायला सांगितले. काही विद्यार्थ्यांनी चक्रवाक पक्ष्यांचे फोटो प्रिंट करून आणले. सर्व वर्गात ते फोटो दाखविले. त्यानंतर आम्ही महाविद्यालयातील प्रोजेक्टरच्या साहाय्याने 'पक्ष्यांचे स्थलांतर' याविषयीची फिल्म दाखविली. पुढे विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना अशा प्रकारचे पक्षीनिरीक्षण आपल्या अवतीभवती अगदी शहरातूनही करता येते असे विद्यार्थ्यांना सांगितले.

माझे मुंबईतील, जे महाविद्यालय आहे ते त्याच्या रम्य परिसराबद्दल प्रसिद्ध आहे. २५ एकरच्या त्या जागेत एक नैसर्गिक तळेही आहे. त्या तळ्यावर अनेक पक्षी येतात. आपल्याच महाविद्यालयाच्या परिसरात किती प्रकारची झाडे व पक्षी आहेत, त्याचे निरीक्षण आपण करूया का ? असा प्रश्न मी विद्यार्थ्यांना विचारला, मराठीच्या माझ्या सहअध्यापिकेने आपल्या महाविद्यालयातील बोटॅनिकल गार्डनमधील व परिसरातील, प्रत्येक विद्यार्थ्याने, निदान १० झाडांची नावे, इतर कोणाही व्यक्तीची मदत घेऊन लिहून आणून दाखवावी, असे सुचविले. पुढल्या काही दिवसात विद्यार्थ्यांनी परिसरातील १५० झाडांची नावे व फोटो, वनस्पतीशास्त्राच्या शिक्षकांच्या मदतीने लिहून आणली. त्याचप्रमाणे १० ते १५ प्रकारचे पक्षी परिसरात झाडांवर असतात, त्यांची यादी आणली. तसेच एका विद्यार्थ्याने महाविद्यालयातील विशाल अशा वडाच्या झाडांवर शेकडोंनी बसलेल्या पांढऱ्या शुभ्र लिटील इग्रेटचा (बगळ्यांची एक जात) मोबाईलवर काढलेला फोटो दाखविला तेव्हा त्याच्या फोटोग्राफीलाही मनापासून दाद दिल्याशिवाय राहवले नाही. या प्रयोगामुळे 'महाविद्यालयात फिरता फिरता' असा वर्णनपर निबंधाचा विषयही अनुभवासहित विद्यार्थ्यांना सादर करता आला. अशा पद्धतीने 'चक्रवाकाचे आगमन' आमच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत जवळपास दोन महिने राहिले.

### आणि कैदेत..... 'वालाँग' आत्मकथनाचे अभिवाचन

वालाँग आत्मकथनाचे अभिवाचन असाच एक अनौपचारिक प्रयोग १२वी च्या पाठ्यपुस्तकातील 'आणि कैदेत.....' हा पाठ शिकवताना केला. या पाठाच्या निमित्ताने ट्युटोरियलच्या तासिकेला संपूर्ण 'वॉलाँग' या आत्मकथनाचे वाचन केले. याचे वैशिष्ट्य असे की, काही पाने वाचून झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये 'आज पुढे मी वाचणार....' अशी चढाओढ सुरू झाली. या पाठांवरून विद्यार्थ्यांना देशप्रेम, देशसेवा म्हणजे काय हे कळण्यासाठी आमचा 'माजी विद्यार्थी' जो आता लेफ्टनंट कर्नल आहे, त्याला 'मराठी सांस्कृतिक मंडळा'तर्फे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले. कार्यक्रमाची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपविली. त्याचे चित्तथरारक अनुभव विद्यार्थ्यांनी ऐकले, तसेच त्याचे कर्तृत्व व यश पाहून अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. यासाठी एन.सी.सी. त प्रवेश घ्या, असेही त्याने सुचविले. या कार्यक्रमामुळे एकाचवेळी मुलाखत, संवादलेखन व सूत्रसंचालन या घटकांचा अभ्यासही अप्रत्यक्षरीत्या विद्यार्थ्यांचा घेता आला.

या पाठाच्या संदर्भात प्रभाकर पेंढारकर यांची 'रारंगढांग' ही कादंबरी अशीच विद्यार्थ्यांकडून वाचून घेतली. नंतर त्या कादंबरीवर प्रतिक्रिया लिहावयास सांगितल्या.

भाषा हा असा एकमेव विषय आहे की ज्याच्याद्वारे आपण मूल्यशिक्षण, पर्यावरण शिक्षण, ताण-तणाव व्यवस्थापन, सर्वंकष गुणवत्ता व्यवस्थापन अशा वेगवेगळ्या विद्याशाखांचे परस्पर किंवा आंतरशाखीय उपयोजन करीत, नावीन्यपूर्ण विचार विद्यार्थ्यांपुढे ठेवू शकतो. यासाठी अधिकाधिक अनौपचारिक पद्धतींचा अवलंब करण्याचे धाडस शिक्षकाने केले पाहिजे म्हणजे मराठीचा तास कधी संपतो, असे विद्यार्थ्याला वाटणार नाही.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, पाठ्यपुस्तकातला घटक कोणताही असो, पाठ्यपुस्तकाद्वारे भूतकाळातील घटना, त्यांची वर्तमानाशी तुलना करून भविष्याचा वेध घ्यायला शिक्षण देणे, हेच आनंददायी शिक्षणप्रक्रियेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्यासाठी शिक्षकाची मराठी भाषेविषयी निष्ठा, बांधिलकी हवी. तसेच आपल्या कर्तव्यात प्रामाणिकपणा हवा. असे अध्यापन करताना अधिक श्रम घ्यावे लागतील. पण त्या श्रमांचे फलितही आपणास मिळेल ! आपण प्रयत्नपूर्वक जे जे चांगले देण्याचा प्रयत्न करतो ते ते कुठे ना कुठे रुजतेच ! कालांतराने आपणास त्याचा प्रत्ययही येतो. तेव्हा आपला विद्यार्थी ११वी व १२वी ची परीक्षा उत्तीर्ण झाला यातच समाधान न मानता त्या विद्यार्थ्याला एक चांगला माणूस घडविणं, हेही भाषाविषय शिक्षकाचं कर्तव्य आहे, हे विसरून चालणार नाही.

☆☆☆

# माझे मराठी अध्यापन आणि गमती जमती

प्रा. संजीवनी बोकील
संपर्क : ९८५०६६०६००

काही वर्षांपूर्वी आपटे प्रशालेत माझी मुलाखत घेताना कै. पु. ग. वैद्य सरांनी माझ्या दिशेने एक 'बाऊन्सर' टाकला होता. 'एका वाक्यात तुमची ओळख करून द्या.' आणि मी म्हटलं होतं – ''मी संजीवनी बोकील, वृत्तीनं कवी आहे आणि धर्मानं शिक्षक आहे.

गेली पंचवीस वर्षे अतिशय मनापासून हा धर्म पाळत आले आहे. माझं कवयित्री असणं माझ्यातल्या शिक्षकाला संप्रेरक ठरलं आणि माझं शिक्षक असणं माझ्यातल्या कवयित्रीला संजीवक ठरलं.

प्रत्येक धार्मिक माणसाचा एक प्रिय असा धर्मग्रंथ असतो आणि त्याचं तो नित्यनियमानं पारायण करती असतो. माझाही असा धर्मग्रंथ आहे जो रोज माझ्यासमोर असतो फरक एवढाच की तो सजीव आहे. ७७/७८ पानांचा आणि तो दरवर्षी बदलत असतो. दरवर्षी मी त्यातून खूप काही शिकत असते. नव्यानं समृद्ध होत असते. अनेकदा शिकायचं ठरवूनही त्यातल्या खूप गोष्टी मला अजूनही तितक्याश्या आत्मसात करता आलेल्या नाही. क्षमाशीलत, दिलदारी, श्रद्धाभाव, नि:स्वाथर्यभाव या गुणांची अनंद उदाहरणं यांच्या पानापानांवर विखुरलेली असतानाही माझ्या ते तितके अंगवळणी पडू का शकत नाहीत हा प्रश्न माझ्यापुढे कधी कधी उभा राहतोच! हे खरं.

मला आयुष्यात फक्त आणि फक्त शिक्षकच व्हायचं होतं माझं भाग्य की मी शिक्षक झाले आणि त्यातूनही भाग्य थोर की मराठी-हिंदी या भाषांची शिक्षक झाले. मला असं वाटतं की भाषेच्या शिक्षकावर दुहेरी जबाबदारी असते. विद्यार्थ्यांचा ज्ञानकोष घट्ट विषयाचाच पण त्याबरोबर त्याचा भावनिक, सांवेदनिक कोषही भरीवपणे विणत न्यायचा! आणि त्यामुळेच त्याच्या हृदयापर्यंत जाणारी वाट सापडणं फारसं अवघड राहात नाही.

पण त्यासाठी अर्थातच आपल्या हृदयाची दारं सताड खुली करून ठेवावी लागतात आणि दारातच थंडशीतळ प्रेमाचा माठ भरून ठेवायला लागतो. ज्या शिक्षकाला मुलं आवडतात तो मुलांना आवडतो हे माझं फार आवडतं अनुभवसिद्ध समीकरण आहे. मग ही मुलं तुमच्या आयुष्याच्या सिलेंडरमध्ये भरपूर प्राणवायू भरून ठेवतात. तुम्हाला शिकवतात, दाखवतात, व्याकुळही करतात आणि पोटभर हसायलाही शिकवतात.

**तापलेल्या जमिनीवर पावसाची सर शिंपडल्यावर जसा मृदगंध दरवळतो तशा संसाराच्या व्यापतापानंतर मनावर सुगंध शिंपडणाऱ्या अस्फुट हास्याचे उत्तर शिंपडणाऱ्या !**

मी बी. एड. झाल्यावर पुण्यातल्या एका प्रतिष्ठित अशा शाळेत प्रथम नोकरीला लागले. हवेवाला, अत्तरवाला, कापूरवाला अशी गोड गोड मंडळी समोर बसलेली. वर्ग पाचवीचा ! शिकवायचा होता मराठी निबंध. नवीन लग्न होऊन घरात आलेली मुलगी जशी थोरल्या जाऊबाईंना विचारूनच सगळं करते

तसं दुसऱ्या तुकडीच्या सीनियर मराठी विषय शिक्षिकेला विचारलं त्या ठसक्यात म्हणाल्या पहिला निबंध घ्या - माझा आवडता प्राणी. लगेचच पुढे त्यांनी हा प्राणी कोण असणार तेही सांगून टाकलं. ''कुत्रा या विषयावर दहा वाक्यं फळ्यावर लिवून द्या. वह्या तपासायला सोपं पडतं.''

निबंध लेखनाच्या मागे 'स्वनिर्मिती' हे उद्दिष्ट असतं हे ताजंताजं ज्ञान फळीवर ठेवून देत मी आज्ञाधारकपणे वर्गाच्या फळ्यावर लिहिलं. माझा आवडता प्राणी कुत्रा - लिहा असं म्हणून फळ्याकहे तोंड आणि वर्गाकडे पाठ केली. इतक्यात कोपऱ्यातून एक गोड कोवळा आवाज आला - पन माला नाय कुत्रा आवडत... मी आवाजाच्या दिशेनं पाहिलं. ताज्या गुलाबाच्या ताटव्याच्या कोपऱ्यातून एका गोजिरवाण्या गोबऱ्या गालांची ती नाराजी होती. मी तिला उभं केलं. ती घाबरत उभी राहिली. मी हसून म्हटलं मग तुला काय आवडतं गं ? उत्तर आलं - मला ना स्क्विरल आवडते. माज्या घरी हाये ना!

मग धाकट्या जाऊबाईंचा रोल आणि फळा दोन्ही पुसून टाकला आणि म्हटलं लिहा तुम्हाला कोण आवडतं ते. आणि मग तपासायला वह्या आल्या तेव्हा प्रथम खचलेच. 'माझी कुत्राला हाडे आवडतीत' अशा निबंधांतून चुकांऐवजी बरोबर शब्द काढणंच जास्त सोपं होतं. पण त्याहीपेक्षा त्या निबंधातून त्यांच्या खऱ्या खुऱ्या 'पेट्स' बद्दलची जी आत्मीयता ओतप्रोत उचंबळत होती त्यात मी जास्त बुडून गेले. मज्जेमज्जेत !

एका वर्गात एका मुलीने हात वर केला. 'मिस व्हॉट इझ दुम डलेला? मी चक्रावलेच. असा काही शब्द मराठी भाषेत नाही असं ठणकावून सांगितलं. तशी तिच्या टोपाऱ्या डोळ्यांत असे भाव तरळून आले की उगाचच या टीचरला आपण मराठीच्या तज्ज्ञ मानत आलो. मग ती सरसावून पुढे आली आणि पुस्तकातल्या एका शब्दावर बोट ठेवून म्हणाली - लुक. मी पण लुकलुकलेच. तो शब्द होता - दुमडलेला.

हमखास होणाऱ्या चुकांच्यातली पहिली चूक म्हणजे रफाराची ! एखाद्या उडाणटप्पू मुलासारखा तो नेमका आपली जागा सोडून दुसरी जागा बळकावणार! मग लिहिलं जाणार - निर्भय, दुर्गम, निसर्ग इ. आशीर्वाद शब्दाचं शुद्धलेखन सांगताना मी सांगते की हा शब्द अनेक प्रकारे लिहिला जातो पण त्यातला एकच प्रकार बरोबर आहे. सुदैवाने मी अजून 'आ' वर रफार दिलेला काही पाहिला नाही ! हे ही नसे थोडकं ! एकदा ठरवलं मुलींची ही चूक आत्ताच काढून टाकायला हवी. मग फळ्यावर रफाराचे चार पाच शब्द सुटे करून लिहिले -

१) नि + र् + म + य     २) नि + र् + मि + ती - असे '

मग र् च्या खाली रेघ मारून म्हटलं - हा र् आहे ना तो खेळता खेळता पडला आणि त्याचा पाय मोडलाय्. मग तो काय करतो ? उडी मारून दुसऱ्या अक्षराच्या खांद्यावर बसतो. एका मुलीला पुढे बोलवून म्हटलं - मार बरं उडी. एकदा पुढे एकदा मागे. कुठे सोप्पं आहे ग उडी मारणं ? म्हणाली पुढे. मग बिचारा पण पुढेच उडी मारेल की नाही ? मग काय बिचारा फार आवडताच झाला सगळ्यांचा !

त्यानंतरच्या एका उ. पत्रिकेमध्ये वाक्य होतं - विमला आणि सर्लाने सगळा खेळ टोपलीत भर्ला. जून महिना ! एका मराठी माध्यमाच्या शाळेतला वरचा मराठीचा तास. शाळेचा वेळ आणि मुला-मुलींचा उत्साह सारख्याच गतीने संपत आलेला. त्यात आभाळही भरून आलेलं. मुलं म्हणाली बाई आज कंऽटाळा आलाय. म्हटलं बरं. पण मी घरी तर नाही सोडू शकत तुम्हाला. आपण असं करूया, एकेकानं उभं राह्यचं आणि आपापल्या नावाचा अर्थ सांगायचा. (कारण मला कळलं होतं की अनेकांना आपल्या नावाचा अर्थच माहिती नाहीये) तळागाळातली मुलं त्या शाळेत !

एकेक उभा / उभी राहायला लागली. मनीषा – अर्थ काय ? माहीत नाही. अंजली – अर्थ काय ? माहीत नाही म्हटलं अरे, जे नाव कृष्णाच्या मुकुटातल्या मोरपिसासारखं आपण आयुष्यभर मिरवतो, त्याचा अर्थ जाणून घ्यावासा वाटत नाही तुम्हाला ?

एवढ्यात एका मुलीनं ताडकन् हात वर केला. मी प्रश्नार्थक चेहरा करताच म्हणाली – मला माहीत्येय माझ्या नावाचा अर्थ ! आणि ७७ मुले आदराने तिच्याकडे पाहू लागली. कारण तिच्या नावाचा अर्थ तिला माहीत होता. म्हटलं काय तुझं नाव ? म्हणाली – संपदा. म्हटलं – सांग बरं अर्थ. ती अतीव अभिमानानं म्हणाली – 'मी संपात जन्मलेले ना म्हणून माझं नाव ठेवलयं संपदा !' संपाने दिलेली – असा नञ तत्पुरूष समास तिने सोडवला होता.

इंग्रजी माध्यमाची मुले इंग्रजीत विचार करून त्याचा मराठीत अनुवाद करतात हे सर्वविवाद आहे. मग ती निबंधात लिहितात – आपण निसर्गाप्रती प्रेम करायला हवे किंवा त्याने माझी खूप मदत केली किंवा तो लहान मुलाला फार प्रेरक करतो. अनेकदा शब्दांची जोडणी विचित्रपणे होते. म्हणजे नदी वळवळत पुढे चालली होती. किंवा कृष्णाचे केस पुरळे पुरळे होते. एका हिंदी भाषी मुलाने आपल्या मित्राला वाढदिवसासाठी निमंत्रित करणाऱ्या मराठी पत्रात लिहिले होते – तू आलास तर आनंद-विनोदाची सरिता वाटात राहील (हिंदीच्या गाईडमधल्या वाक्याचा अनुवाद!)

एकदा दहावीच्या इंग्रजी माध्यमाच्या मुलांना पत्र लिहायचे होते. तुमच्या मित्राला कमी गुण मिळाले आहेत. त्याला धीर देणारे पत्र लिहा. एका मुलीने (मराठी मातृभाषी) आपल्या पत्रात लिहिले हाते – तू सारखा रडू नकोस. तूच धीर सोडलास तर काकूंना खांदा कोण देणार ? (To give sholder) चा जसाच्या तसा अनुवाद ! आणि मी हे वर्गात वाचून दाखवले तर मुले ढिम्म! मग म्हटलं की याचं तरी काय चूक आहे. यांना स्ट्रेचरवरून ॲम्ब्युलन्स एवढाच प्रवास माहीत ! खांदा देणं पाहिलंच नाही तर....

माझ्या वर्गात एक मुलगी होती. कायम अनुस्वार खाऊन टाकायची. आणि तिचं नाव होतं निशिगंधा म्हटलं खाऊन टाकू का तुझ्यातल्या अनुस्वार ! निशिगधा चालेल का ? हे म्हणत असतानाच सुप्रसिद्ध गायिका अनुराधा मराठे यांनी त्यांच्या कॉलेजजीवनात घडलेला एक विनोद सांगितला होता त्याची आठवण झाली.

सडासंमार्जन असा शब्द एका मुलाने आपल्या लिखाणात वापरला होता. फक्त अनुस्वाराने गफलत केली. दुसऱ्या 'स' च्या ऐवजी तो पहिल्या 'स'वर स्वार झाला. त्या मुलाला जवळ बोलावून मिस्किलपणे सर म्हणाले 'लेका, तशी फार मोठी चूक नाही रे ! फक्त अंगणात व्हायचा विधी परसात झाला.'

हा विनोद माझ्या वर्गात सांगितल्यावर एका मख्ख चेहऱ्याच्या मुलाने हात प्रश्नार्थक वर केला – मिस, परसात म्हणजे काय? मला फारसे आश्चर्य वाटले नाही, कारण साधू सुपासारखे असावेत त्यांनी सुपाप्रमाणे सार ठेवावे आणि बिनमहत्त्वाचे असे सर्व कचऱ्याप्रमाणे उडवून द्यावे असा कबीराचा हा मराठीत अनुवादित केला जात असताना कोणाला अर्थ कळला हे विचारल्यावर यानेच सांगितले होते की जसं सूप बनवताना भाजीचा एक्स्ट्रॅक्ट घेतात व चोथा टाकून देतात. आता सूप, निरांजन, कल्हईचे भांडे अशा गोष्टी बी.एड.च्या मुली शैक्षणिक साधने म्हणून वापरतात असे समजते. आता अंगण सडा यांचे मीही फोटो काढून ठेवायचे असे म्हणते. योग्य वेळी दाखवता येतील.

तर अशा अनेक गमती-जमती ! तापलेल्या जमिनीवर पावसाची सर शिंपडल्यावर जसा मृद्‌गंध दरवळतो तशा संसाराच्या व्यापतापानंतर मनावर सुगंध शिंपडणाऱ्या अस्फुट हास्याचे उत्तर शिंपडणाऱ्या !

☆☆☆

# मराठी अभंग

प्राचार्य नि. ना. रेळेकर
संपर्क : (०२०) २५४११२१७

> **अभंग-काव्याला संत नामदेवांनी एका लक्षणीय परिमाणाची जोड देऊन, संत आणि त्यांचे अभंग यांचे अतूट नाते निर्माण केले.**

प्राचीन मराठी वाङ्मयाचा युगारंभ ओवी आणि अभंग या दोन देशी म्हणजेच मराठमोळ्या अक्षर-छंदांनी झाला आहे. मराठी ओवी ही अभंगाच्या आधी जन्माला आली. प्रारंभी दळण-कांडण करणाऱ्या स्त्रियांच्या मुखांनी, लोकबोलीतील लोकगीते ती सुरावर म्हणू लागली. फिरणाऱ्या जात्याच्या लयीवर आणि कांडणाऱ्या मुसळाच्या तालावर, देवादिकांची, सणा-उत्सवांची, कुटुंबातील नात्यागोत्यांची आणि तत्कालीन लोकजीवनाची गीते ती गाऊ लागली. सुरुवातीला लोकवाणीत वावरणारी ही ओवी, कालांतराने ज्ञानीजनांच्या सहवासात आली आणि ज्ञानसंपन्न होऊन ग्रांथिक झाली. पारमार्थिक तत्त्वचिंतन करण्याइतपत ती प्रगल्भही झाली. पोथीनिष्ठ झालेली विचारशील ओवी, गद्यपद्याच्या सीमेवर विहरू लागली आणि व्यासपीठावर बसून, समोरच्या श्रोत्यांना ती ज्ञानदान करू लागली. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी कवित्वाने आणि रसिकत्वाने सुसंस्कारित झालेल्या या ज्ञानशील ओवीला 'तेणे आबालसुबोधें । वोवीयेचेनि प्रबंधें । ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें गुंथिली।।' असा परतत्त्वस्पर्श केला आणि 'ओवी ज्ञानेशाची' या नाभाभिधानाने ती कृतार्थ झाली.

मराठी भाषेच्या पूर्वकालातील या वाङ्मयीन पार्श्वभूमीवर, भगवद्भक्तीत तल्लीन झालेला आणि गेयतेचे जन्मदत्त वरदान लाभलेला मराठी अभंग, संतशिरोमणी नामदेवांच्या मुखातून, प्रथमतःच अवतरला आणि वारकरी संस्कृतीत भजना-कीर्तनाच्या नव्या प्रबोधन युगाचा शुभारंभ झाली. 'शतकोटी तुझे करीन अभंग ।' अशी प्रतिज्ञाच संत नामदेवांनी विठ्ठलासमोर केली आणि लोकोद्धारक संतकार्याचा/सत्कार्याचा वसा मराठी-हिंदी या उभय भाषांत, अभंगरचना करून त्यांनी आयुष्यभर सांभाळला.

### 'अभंगा'चे संत नामदेवकृत नामकरण

स्वतः संत नामदेवांनीच आपल्याला स्फुरलेल्या वेगळ्या आणि वैशिट्यपूर्ण काव्यरचनेला, प्रथमतः 'अभंग' या नावाने संबोधले आणि मराठी संतवाङ्मयात/एकूण मराठी वाङ्मयात 'अभंग' ही संज्ञा रूढ झाली. संत नामदेवांनी नामकरण केलेल्या आणि संतकाव्यात प्रचलित असलेल्या विशेष अर्थाने, अभंग या संज्ञेचा संत नामदेवांपूर्वी कुठेही उल्लेख नाही. आपल्या या नव्या काव्यरचनेला 'अभंग' हे नाव देण्याचे कसे स्फुरण झाले तेही त्यांनी, आपल्या एका अभंगाद्वारे प्रकटपणे सांगिते आहे. तो अभंग पुढीलप्रमाणे -

*मुख्य भातृकांची संख्या । सोळा अक्षरें नेटक्या ।।१।।*
*समचरणी अभंग । नव्हे ताळ छंदोभंग ।।२।।*
*चौक पुलिता विसर्ग । गण यति लघु दीर्घ ।।३।।*
*जाणे एखादा निराळा । नामा म्हणे तो विरळा ।।४।।*

या अभंगाचा भावार्थ : ‘(संत नामदेव सांगतात –) मुख्यत: वर्णमालेच्या दृष्टीने पाहिले तर (अभंगाच्या प्रत्येक कडव्याची) अक्षरसंख्या नेमकी सोळा असते. हा अभंग (विठ्ठलासारखाच) समान-चरणांचा असून, त्यात तालाचा आणि छंदाचा कुठेही भंग नसतो. तसेच तो चौक, पुलिता (पुरस्ता-ज्जोती), विसर्ग, गण, यती, लघु, दीर्घ (इत्यादी पूर्वील संस्कृत-प्राकृत छंद:शास्त्रीय बंदिस्त) रचनानियमांनी बांधलेला नसतो. हे सर्व काव्यरचनेचे पूर्वील छंद:शास्त्रीय नियम जाणणारा (आणि त्याप्रमाणे काव्यरचना करणारा) एखादाच कुणी विरळा जाणकार असतो, असे संत नामदेव सांगतात. (असे विरळा जाणकार स्वत: संत नामदेवच होते. म्हणून त्यांनी हा छंद:शास्त्रीय परिभाषेचा एवढा तपशील दिला आहे.

या अभंगाचा अर्थविस्तार केला की, त्याचे दुविदल वैशिष्ट्य स्पष्ट होते. या अभंगाच्या पहिल्या आणि दुसऱ्या कडव्याचा आंतरिक अनुबंध लक्षात घेतला की, एकूण सोळा अक्षरे असलेल्या कडव्याचे, समान दोन चरण असतात, हे सहज उमगते. म्हणजे ८+८ अक्षरांचे हे दोन सम-चरण होतात. यावरून संत नामदेवांनी पुन्हा एक नवा अष्टाक्षरी अभंग-छंद, त्याच छंदात अभंग लिहून, सोदाहरण प्रकट केल्याचे कळून येते. (त्यामुळे डॉ. ना. ग. जोशी आदी छंद:शास्त्रकारांनी दिलेले ‘ओवीचे मालात्मक रूप म्हणजे अभंग’ हे अभंग-लक्षण इथे आपोआप निरस्त होते.) संत नामदेवांच्या ‘अपूर्व वस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञे’ चा साक्षात्कार घडविणारे या अभंगाचे दुसरे वैशिष्ट्य आपल्याला अचंबित करणारे आहे. तसेच अंतर्मुखही करणारे आहे. ते पुढीलप्रमाणे आहे.

प्रस्तुत अभंगातील दुसऱ्या कडव्याचा ‘समचरणी अभंग ।’ हा पहिला चरण, विशेष अर्थबोधक आहे. या समचरणांमुळेच विठ्ठल ‘अभंग’पणे ‘युगें अठ्ठाविस विटेवरी उभा ।’ असल्याचे संत नामदेवांच्या अंत:करणात पूर्णत: बिंबले आहे. त्यामुळेच ‘तें हें समचरण उभें विटेवरी । हा भीमातीरी विठ्ठल रूप ।।’ असे आणखी उल्लेख त्यांनी केले आहेत. म्हणूनच त्यांनी या समचरणी काव्यरचनेचे ‘अभंग’ असे नामकरण उत्स्फूर्तपणे केले आहे. त्यांच्या या सार्थ नामकरणामुळे, सर्व संतांच्या अशा स्वरूपाच्या भक्तिकाव्याला सरसकट ‘अभंग’ या नावानेच संबोधण्याचा प्रघात पडला.

या अभंग-काव्याला संत नामदेवांनी आणखी एका लक्षणीय परिमाणाची जोड देऊन, संत आणि त्यांचे अभंग यांचे अतूट नाते निर्माण केले. आपल्या अभंगाच्या शेवटच्या कडव्यात ‘नामा म्हणे’ अशी स्वत:ची नाममुद्रा उमटवून, त्या अभंगाला आपली एक खास अशी ‘निजखूण’च त्यांनी प्राप्त करून दिली. अभंग आणि त्या अभंगकर्त्याचे नाव, या एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्यामुळे, कोणते नाणे कुणाचे आहे, याची पाहता क्षणी ओळख पटणे सहज सुलभ झाले. संत नामदेवांनी घडविलेली ही ‘नाममुद्रा’ अभंगकाव्याचे व्यवच्छेदक लक्षण झाली. अर्थात ही नाममुद्रा कधी त्या संतांच्या प्रचलित नावांची, तर कधी अभंगरचनेसाठी त्यांनी धारण केलेल्या पर्यायी (टोपण) नावांचीही आढळून येते. संत नामदेवांच्या नामा, नामया, नामदेव, विष्णुदास नामा इत्यादी नाममुद्रा दिसून येतात. संत ज्ञानदेवांच्या ज्ञानदेव, ज्ञाना, निवृत्तिदास, बापरखुमादेविवर, इत्यादी नाममुद्रा त्यांच्या अभंगांत वाचावयास मिळतात. संत एकनाथांनी तर आपली नाममुद्रा म्हणून, आपल्या एकनाथ या नावापेक्षा सद्‌गुरुस्मरण करणाऱ्या ‘एका जनार्दनी’ या पर्यायी नाममुद्रेचा सर्वाधिक उल्लेख केला आहे. वारकरी संतांच्या अभंगातील या ‘नाममुद्रा’ म्हणजे, त्यांचा ‘कॉपीराइट’चा (साहित्यनिर्मिती-प्रकाशनाचा) अधिकारच दर्शविणाऱ्या आहेत, असे आजच्या ग्रंथप्रकाशनाच्या परिभाषेत म्हणता येईल.

☆☆☆

# भारूड - एक अनोखा मराठी वाङ्मयप्रकार

श्री. अविनाश बळवंत हळबे
संपर्क : ९०११०६८४७२

भारूड हा शब्द उच्चारला की मराठी माणसाच्या मनात उपहास, अज्ञान, उत्सुकता अशा अनेक संमिश्र भावना निर्माण होतात. अवास्तव पाल्हाळ लावून बोलणाऱ्याच्या संदर्भात 'भारूड लावणे' हा उपहासपर वाक्प्रचार आपण ऐकलेला असतो, तर काहींना हा काय प्रकार आहे हे माहिती नसल्याने त्यांच्यासमोर एक प्रश्नचिन्ह उभे राहते. एकंदरीत भारूड या वाङ्मयप्रकाराबद्दल साशंकता आढळून येते. यासाठी आपण प्रथम भारूड या शब्दाची व्युत्पत्ती पाहू.

**भारूड हा केवळ वाङ्मयप्रकार नसून समाज-प्रबोधनाचे उत्कृष्ट माध्यम आहे.**

**१. बहुरूढ म्हणून भारूड**

जी गोष्ट समाजमनाला चटकन समजते, पचनी पडते आणि इतरांना सहजपणे सांगता येते तिचा समाजात बहु म्हणजे जास्त प्रमाणात रूढ होते. तशीच लोकप्रियता मिळाल्यामुळे या वाङ्मयप्रकाराला बहु-रूढ म्हणून भारूड असे नाव दिले गेले असावे.

**२. भारूड - पक्ष्याचे नाव**

पक्षी, गरूड पक्ष्यासारखा भारूड नावाचा एक पक्षी आहे व त्याला दोन तोंडे असतात अशी एक दंतकथा आहे. तो दोन तोंडांनी दोन वेगवेगळे आवाजही काढू शकतो. त्यामुळे ज्यातून प्रापंचिक आणि पारमार्थिक असे दोन अर्थ निघू शकतात त्या वाङ्मयप्रकाराला भारूड नाव पडले असावे.

**भारूडाची पार्श्वभूमी**

महाराष्ट्रातील सर्व संतांनी समाजप्रबोधन आणि जगदोद्धारासाठी अनेक प्रकारचे वाङ्मय निर्माण केले. ओवी, अभंग, पदे, गौळणी, विराणी, संवाद, ग्रंथ, चरित्राख्याने असे प्रकार त्यात प्रामुख्याने आहेत. कीर्तन, भजन, प्रवचन, कथा यांद्वारे त्यांचा प्रचार आणि प्रसारही होत होता. हे वाङ्मय प्रासादिक असल्याने त्याचा परिणामही चांगला दिसत होता. परंतु समाजबंधने, धार्मिक नीतिनियम, शिक्षणाचा अभाव यासारख्या कारणांनी स्त्रीवर्ग, गाववाड्यातील सेवक, बलुतेदार, अस्पृश्य आणि तळागाळातला वर्ग यापासून काहीसा वंचितच राहत होता. म्हणून संतांनी त्यांनाही मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्यातीलच अनेक पात्रांची रूपके बनवून त्यांच्या मुखातून समाजप्रबोधन करण्यास सुरुवात केली. या रूपकांना भारूड असे म्हटले जाते. रूपक सादर करताना ते कलाकार पात्रानुसार वेशभूषाही करत/करतात. त्यामुळे त्याला सोंगी भारूड असेही म्हणतात. या पार्श्वभूमीवर भारूडाचा उगम श्रीज्ञानदेव कालापर्यंत जातो. त्यानंतर प्रत्येक संतांनी यात भरच घातली. अगदी अलीकडच्या काळातले संतकवी दासगणु महाराजही यात आले. परंतु भारूड या वाङ्मयप्रकारात संत एकनाथांनी सर्वात जास्त भर टाकली असल्यामुळे 'एकनाथी भारूड' हा शब्द आपल्या जास्त परिचयाचा झाला.

एकनाथांच्या भारूडातून समाजप्रबोधन होते ते बघण्यासाठी नाथांची पुढील रचना बघू.

१. **पत्रव्यवहार**

यात पोशाख पंडितासारखा असतो. नाथांची पात्रे बहुतांशी जिवाशिवाचा पत्रव्यवहार या स्वरूपात आहेत. भाषा तत्कालीन राजकीय थाटाची आहे. त्यातली काही वाक्ये अशी –

चिरंजीव जिवाजीपंत ठाणेदार, वास्तव्य देहपूर यांसी, आत्मारामपंत कमाविसदार यांचा आशीर्वाद. पत्रास कारण की तुम्हास देहगावची सनद शंभर वर्षांची देऊन पाठविले आहे. तरी –

गावची आबादी करावी – कलम एक.

काम क्रोध रयत यांचे ऐकू नये – कलम दोन.

आशा मनिषा यांची संगत धरू नये – कलम तीन.

सदा स्वधर्म वागणूक ठेवणे – कलम चार

शांती क्षमा दया असू देणे – कलम पाच.

ज्ञान वैराग्य भजन पूजनी आदर ठेवणे – कलम सहा. (पुढे चालू)

अशा रीतीने एक पिता आपल्या पुत्रास ज्या तळमळीने सांगेल तसा शिवाचा जीवाला उपदेश आहे.

२. **नंदीबैल**

यात नंदीबैलाच्या मुखवट्यासह दोघेजण अंगावर झूल चढवून नंदीबैल बनतात व नंदीचा खेळ करणारा त्यांना प्रेक्षकातून नाचवत स्टेजवर आणून, प्रेक्षकांना सहभागी करून खेळ करतो. ''नंदी आला नंदी आला, स्वर्गपाताळाहुनी नंदी आला, कैलासाहुनी नंदी आला, गुबु गुबु गुबु गुबु''

हिरण्यकश्यपूच्या द्वारी, महाभयंकर फुसफुस करी, डोंबारीरूपी शिंगे रोविली उरी, प्रल्हादाकारणे । गुबु गुबु गुबु गुबु (पुढे चालू)

हा नंदी म्हणजे साक्षात भगवंत असून त्याने प्रत्येक अवतारात त्याने दुष्टांचे निर्दालन आणि भक्तांचे रक्षण कसे केले ते सांगतो.

३. **डोंबारी**

यात सादरकर्ता डोंबाऱ्याच्या वेशात नाच येतो आणि प्रत्येक कडवे म्हटल्यावर डोंबाऱ्याच्या कसरतीही करतो. या रूपकात भगवंताचा प्रत्येक अवतार म्हणजे विश्वाच्या रंगमंचावर त्याने केलेला डोंबाऱ्याच खेळ आहे असे दर्शविले जाते.

४. **कडकलक्ष्मी**

यात सादरकर्ता कडकलक्ष्मीचा पोशाखात अंगावर असुडाचे फटके मारत 'दार उघड बया आता दार उघड बया' असे म्हणत नाचत येतो आणि दुष्टांचा नाश करण्यासाठी हे महालक्ष्मी तू आता दार उघडून प्रगट हो अशी आळवण करतो.

५. **गोंधळी, भुत्या, वाघ्या–मुरूळी** – यातही सोंगाप्रमाणे पेहराव असतात. तेही देव/देवीची स्तुती करतात.

एकंदरीत भारूड हा केवळ वाङ्मयप्रकार नसून समाजप्रबोधनाचे उत्कृष्ट माध्यम आहे. अज्ञानामुळे काही मंडळी त्याला तमाशासदृश्य रूप देऊन त्याचा वापर केवळ पोट भरण्याची कला म्हणून करत असली, तरी तिचे महत्त्व कमी होत नाही. आज महाराष्ट्रातील अनेक सांप्रदायिक फडावर आणि पंढरीच्या वारीत एक दिवस खास भारूडासाठी दिलेला असतो. नाथांनी लिहिलेल्या प्रासादिक स्वरूपात जर सादर केली गेली तर भारूडास उज्ज्वल भवितव्य आहे असे खात्रीपूर्वक सांगता येईल.

☆☆☆

# मानवी जीवनमूल्ये रुजवण्याचे साधन

डॉ. स्नेहा जोशी
संपर्क : ९४२३५६८५८८

**महाविद्यालयातील G.S. च्या निवडणुका शेवटच्या रणधुमाळीत एकाचा खून – अटक सत्र सुरू**

**संवेदनशीलता, नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा, श्रमप्रतिष्ठा, स्त्री–पुरुष समानता ही विद्यार्थी जीवनात अग्रक्रमाने रुजविली जावीत अशी नैतिकमूल्ये आहेत.**

अरे बापरे ! कुठल्या कॉलेजची ही बातमी ?

घाबरू नका ! ही बातमी खरी नाही. हे आहे टीव्हीवरील मालिकेतील एक दृश्य.

अशा खोट्या बातमीनेही मन हादरायला होतं. खरं ना ? मग शुभम शिर्के या अल्पवयीन मुलाचा खंडणीसाठी खून. जवळपास त्याच्याच वयाच्या मुलांकडून. समाजाची पाळमुळं हलतील आणि संवेदनशील मने बधीर होतील अशी ही बातमी. बातमी नव्हे सत्य !

का घडले हे सर्व ? प्रश्न आज अनुत्तरित करणारे आहेत पण भीषण आहेत.

मूल्यहीनता ही अण्वस्त्रांपेक्षाही भयंकर असते. कारण अण्वस्त्र त्याच काळातील तेवढ्याच घटकांवर परिणाम करते. मूल्यहीनता संपूर्ण पिढीवर आणि भविष्यावर परिणाम करते.

समाजातील हे अध:पतन थांबवायचे असेल तर पुढील पिढीवर सुयोग्य मूल्यसंस्कार व्हायला हवेत. देशाचे भवितव्य शाळेच्या वर्गात घडते या कोठारी आयोगाच्या विश्वासानुसार हे घडू शकते ते फक्त आणि फक्त शाळेतच.

इतिहास साक्ष आहे. शिक्षक हे मूल्यक्रांतीचा अग्रदूत आणि शिक्षण तमोयुगासाठी प्रकाशदूत ठरलेले आहेत. मुलांवर मूल्यसंस्कार करण्याचे सर्वात उत्तम व प्रभावी साधन पाठ्यपुस्तकेच आहेत. वय वर्षे १४ पर्यंत मुलांचे मन सर्वात अधिक संस्कारक्षम असते. या वयात मूल शाळेत असते. आणि याच कालखंडात मुलांसाठी ज्ञानप्राप्तीची समर्थ व प्रभावी साधने म्हणजे शिक्षक व पाठ्यपुस्तके.

पाठ्यपुस्तक ही विद्यार्थ्यांना जग दाखवणारी खिडकी आहे. पाठ्यपुस्तके तयार करताना जीवनकौशल्यांची रुजवणूक, गाभाघटक, नैतिकमूल्य पर्यायाने जीवनमूल्ये यांचा विचार केलेला असतोच. पाठाची निवड करताना वरील सर्व बाबी आणि मूल्य रुजवणे हे मूळ उद्दिष्ट समोर असतेच. प्रत्येक पाठातील अशी विशिष्ट जागा/अवकाश शोधणे, अधोरेखित करणे व ते आपल्या अध्यापनातून रुजवले जाणे यासाठी शिक्षकांना निराळा, जाणीवपूर्वक अभ्यास करण्याची गरज आहे. जीवनकौशल्ये व जीवनमूल्ये दोन भिन्न संकल्पना आहेत. कौशल्ये म्हणजे गुणवत्तापूर्ण कृती. कौशल्याचा संदर्भ कृतीशी आहे आणि मूल्यांचा संदर्भ वृत्तीशी आहे. (संवेदना/भावनांशी आहे)

कौशल्य निर्माण करावे लागते. अभ्यासाने ते शक्य होते. मूल्य रुजवावे लागते. मूल्य रुजवणे म्हणजे वृत्तीतील परिवर्तन. सद्गुण शिकवता येत नाही ते संक्रमित करावे लागतात. मूल्ये कोणती सांगताना त्याचे वैयक्तिक व्यक्तिगत, सामाजिक, राष्ट्रीय असे ढोबळ मानाने वर्गीकरण केले जाईल. जरी ही प्रत्येक मूल्य हे जीवनमूल्य असते. मानवी जीवनाला आदर्शाप्रत नेणारे प्रत्येक मूल्य मानवी जीवनमूल्यच असते.

पूर्वी गुरुकुलामधून शिक्षण संपवून शिष्य बाहेर पडत तेव्हा गुरू त्यांना तैतरीय उपनिषदातील मंत्र -

*सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायात मा प्रमद ।*

*मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव ।।* हा मंत्र जीवनमंत्र म्हणून सांगत.

शीर्षस्थानी मानलेले मूल्य होते सत्य. महात्मा फुले यांनीही अग्रक्रमाने सत्य आणि मानवता पुरस्कृत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय, समता, बंधुता, स्वातंत्र्य ही सर्व मानवतेला व्यापणारी मूल्ये मानली. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, सहिष्णुता, निर्मलता, मनोजय, दया क्षमा आणि करुणा ही सर्व मानवी मूल्ये आहेत.

संवेदनशीलता, नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा, श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता ही विद्यार्थी जीवनात अग्रक्रमाने रुजविली जावीत अशी नैतिकमूल्ये आहेत. येथे मूल्यांची यादी नमूद करणे आवश्यक नाही. कोणतेही मूल्य हे मूल्य असते. ते कमी-अधिक महत्त्वाचे नसते. मूल्य किती प्रमाणात रुजवले गेले ह्याची टक्केवारी नसते. माणूस प्रामाणिक असतो किंवा अप्रामाणिक.

वर नमूद केल्याप्रमाणे पाठ्यपुस्तके तयार करताना मूल्यसंस्कार हे मूळ उद्दिष्ट समोर असतेच. त्यामुळे शालेय कालखंडात मूल्य रुजवल्याचे सर्वात समर्थ साधन असते ते म्हणजे पाठ्यपुस्तकाचे अध्यापन.

विद्यार्थ्यांच्या वयोगट, अनुभवविश्व व क्षमता यांचा विचार करून त्यांच्यावर त्या त्या वयात ती ती मूल्ये रुजवली जावीत हा विचार प्रामुख्याने पाठ्यपुस्तकात केलेला असतो.

विद्यार्थ्यांच्या प्राथमिक माध्यमिक स्तरावर त्यांची मानसिकता लक्षात घेता असे गट.

१. पहिली ते चौथी - भावनांचे प्राबल्य

२. पाचवी ते सातवी - भावनेला बुद्धीची जोड

३. आठवी ते दहावी - भावना, बुद्धीला सकारणता / विवेक (पटले तरच करीन ही भावना)

पाठ्यपुस्तकांमधून मूल्यांची रुजवणूक यासाठी अमूक विषय अमूक घटक असे बंधन नसते. सार्वत्रिक, सार्वकालिक गरज असलेल्या मूल्यशिक्षणासाठी स्वतंत्र विषय, स्वतंत्र तास अशी चौकट असू नये.

सर्वच विषयाच्या पाठ्यपुस्तकांमधून सर्वच विषयाच्या शिक्षकांकडून मूल्यसंस्कार व्हायला हवेत. विद्यार्थी शिक्षकाकडे Roll Model म्हणून पाहतात. तेव्हा माझ्या विषयाच्या माध्यमातून, घटकांमधून, प्रश्नपत्रिकेतून, साध्या-सुध्या सूचनांमधून, विवेकपूर्ण व न्याय्य अशा माझ्या वागण्यातून आणि विद्यार्थ्यांशी होणाऱ्या संवादाच्या प्रत्येक क्षणातून मूल्यशिक्षणाचे संक्रमण व्हावे याचे भान सर्व शिक्षकांना असावे.

साने गुरुजी, कर्मवीर भाऊराव पाटील, पूर्वीचे ऋषीमुनी हे अष्टौप्रहर शिक्षकच होते. ते मूल्यशिक्षणाचे विचारवंत कृतिवीर शिक्षक होते. आजही प्रत्येक शिक्षकाने आपल्यातील साने गुरुजी जपायला हवेत. कारण या बाबतीत समाजाचे/देशाचे भवितव्य घडविण्यात शिक्षकाची जबाबदारी सर्वात मोठी असते.

एक इंजिनियर चुकला तर एक पूल पडेल.

एक डॉक्टर चुकला तर एक रोगी मृत्यू पावेल.

पण एक शिक्षक चुकला तर संपूर्ण पिढीचे नुकसान होते.

याचे भान प्रत्येक शिक्षकाला असावेच. तेच आपले आद्यकर्तव्यही आहे.

आपल्यातील विचारवंत व कृतिवंत शिक्षकाला मन:पूर्वक अभिवादन !

☆☆☆

# शिक्षणाचे माध्यम
## वास्तव व उपायांची गरज

प्रा. राजकुँवर गं. सोनवणे
संपर्क : ७७७४०४०४९४

"महाराष्ट्रात गेल्या सहा वर्षांत मराठी माध्यमाच्या शालेय विद्यार्थीसंख्येत तब्बल १८ टक्के घट झाली आहे. याच दरम्यान इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांची संख्या ८.४ टक्के इतकी वाढली आहे. मात्र आजही मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांची संख्या इंग्रजी माध्यमापेक्षा अधिक आहे.'' (महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणविभागाचा अहवाल दि. २१/११/२०१३ ची बातमी)

वरील बातमीच्या आधारे आपण किमान महाराष्ट्रातील शिक्षणाच्या माध्यमाचा विचार करू. त्यात भारतीय शिक्षणाचा उल्लेख येईलच.

**वास्तव :**

आज भारतातील श्रीमंत, नवमध्यमवर्गीय व सर्वसामान्य लोकांनीही आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केलेला आहे.

मात्र, बालमानसशास्त्रज्ञ व भाषातज्ज्ञ मातृभाषेचा पुरस्कार करतात. शिक्षणशास्त्र सांगते की, बालवाडीचे शिक्षण महत्त्वाचे, कारण बालवाडी शिक्षण हा शिक्षणाचा पाया असतो. तो मजबूत पाहिजे. या वयात मुलांच्या मेंदूची वाढ झपाट्याने होते व त्यांची ग्रहणक्षमताही चांगली असते. घरात पालक व बाहेरच्या परिसरात जी भाषा बोलली जाते, ती बालकांना सहज समजते, त्यामुळे मातृभाषेतून 'शिक्षणप्रक्रिया' स्वाभाविकपणे सोपी होते. मातृभाषा ही 'जीवनशिक्षण' देणारी भाषा आहे. ती मुलांवर चांगले संस्कार करते. म्हणजेच मातृभाषा शिक्षण देण्यास समर्थ असते. मातृभाषेच्या शिक्षणातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

काहीजण म्हणतात, 'भारतात प्रचंड भाषिक विविधता आहे. त्यामुळे मातृभाषा किंवा परिसरभाषेतून शिक्षण देणे अयोग्य आहे. त्यातही मातृभाषा व परिसरभाषा वेगवेगळी असेल तर मुलांची पंचाईतच होणार. मात्र, शिक्षणतज्ज्ञ म्हणतात, 'इंग्रजी या परकीय भाषेपेक्षा परिसरभाषा मुलांना जवळचीच वाटणार, कारण मातृभाषा किंवा परिसरभाषा मुलं सहज आत्मसात करतात म्हणून मातृभाषा किंवा परिसर भाषेतून शिक्षण द्यावे.'

आज बालविकास मंत्रालयाने बालवाडी शिक्षणाच्या माध्यमासंदर्भात विशिष्ट भूमिका

**नवीन अभ्यासक्रमातील मराठीची पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांचे भावविश्व समृद्ध करणारी, उत्तम संस्कार करणारी, भाषेविषयी आवड उत्पन्न करणारी, कृतिशीलतेला व उपक्रमशीलतेला वाव देणारी, पाठ्यपुस्तकातील ज्ञानाची दैनंदिन व्यवहाराशी सांगड घालणारी आहेत.**

घेतली आहे. त्यांच्या मते बालवाडी, केजी पासून पीजी पर्यंतचे शिक्षणाचे माध्यम मातृभाषा किंवा परिसर भाषेत असावे.

''वास्तविक पाहता शासनाने भाषावार प्रांतरचना केल्यानंतर प्रत्येक राज्याला आपल्या विविध व्यवहारात प्रादेशिक भाषा 'अनिवार्य' करण्याचा 'अधिकार' दिलेला आहे. मात्र, बहुतेक राज्यांनी तो अधिकार राजभाषाऐवजी इंग्रजी भाषेला अप्रत्यक्ष दिलेला दिसतो. महाराष्ट्राचेच उदाहरण घ्यावयाचे झाले तर, शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी राजभाषेला प्रथम क्रमांक व इंग्रजीला दुसरा क्रमांक दिलेला आहे. प्रत्यक्षात मात्र, इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढत आहेत.''

**असे का घडते ?**

प्राचीन काळात भारतीयांनी विज्ञानात प्रगती केलेली होती. तत्कालीन भाषा समृद्ध होत्या. आपापल्या भाषांमधून दैनंदिन व्यवहार चालत. परंतु जेव्हा जेव्हा परकीय आक्रमणं झाली, परकीय राजसत्ता स्थिरावल्या त्या त्या वेळी त्यांच्या भाषांचे आघात आपल्या भाषांवर झाले. भाषेला नदीची उपमा दिली जाते. तिचा प्रवाह अखंड चालू असताना अनेक भाषांतील शब्द त्यात येऊन मिसळतात. भाषा प्रदूषित होऊ शकते. तिला पुन्हा पुन्हा प्रमाणित करावी लागते. दैनंदिन व्यवहारात आपल्या भाषेचा जास्तीत जास्त वापर करावा लागतो. पारतंत्र्याच्या काळात ब्रिटिश साम्राज्याच्या राजकीय, आर्थिक व भाषिक वर्चस्वाखाली आपण दबले गेलो, त्यामुळे आपल्या भाषेकडे आपले दुर्लक्ष झाले व इंग्रज आणि इंग्रजी भाषा यांचे वर्चस्व आपण स्वीकारले. स्वातंत्र्यानंतरसुद्धा इंग्रजी भाषा आपल्या मानगुटीवर जी बसलेली आहे. तिचा प्रभाव आजही कमी होत नाही, उलट तो वाढत आहे.

त्याचा परिणाम असा झालेला आहे, की विज्ञान शिक्षणात आपण इंग्लिश माध्यम कायम ठेवून बहुसंख्य तळागाळातील मुलांना आधुनिक विज्ञानापासून वंचित ठेवत आहोत. मराठी माध्यमातील विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात काही संकल्पना विनाकारण अवघड शब्दात दिलेल्या असतात. उदा. कशेरू स्तंभ (पाठीचा कणा), कुरव (आवाज), मस्तिष्क (मेंदू), उत्सृष्ट पदार्थ (उत्सर्जित पदार्थ), संपीडन (Compression), जंबुलातित किरण (Ultravolet rays) वरील अवघड शब्द वापरण्याऐवजी सोपे मराठी शब्द वापरायला काय हरकत आहे ? आपण इंग्रजी शब्दांसाठी पारिभाषिक शब्द वापरतोच ना ! मराठी भाषा मुळात सोपी आहे. याशिवाय तिला अनेक रसरशीत बोलीभाषा लाभलेल्या आहेत, ती विज्ञान व तंत्रज्ञान पेलू शकते, पण लक्षात कोण घेतो ? **वास्तव हे आहे, की मातृभाषेला समृद्ध, सक्षम करण्याऐवजी आपला स्वत:चा 'विकास' कसा होईल याची काळजी लोकांना असते.**

भाषेच्या समृद्धीऐवजी भाषा किती उपयुक्त आहे हे बघून तिच्यावर लोक अधिक प्रेम करतात. आर्थिक विकासाला संधी देणारी व जगात प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी फक्त इंग्रजी भाषा आहे, असा अनेकांचा समज आहे आणि तो काही अंशी 'सत्य' आहे. कारण स्वभाषेकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष हे होय. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, देशांतर्गत परकीय गुंतवणूक, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन व महाजाल यामुळे शिक्षणाचे बाजारीकरण झालेच, पण त्यामुळे इंग्रजी भाषेचे महत्त्वही वाढलेले आहे. बहुसंख्य लोकांना इंग्रजी भाषेचे प्रचंड आकर्षण आहे. मातृभाषेच्या संवर्धनाबाबत शासकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे व समाजातही मातृभाषेविषयी अनास्था दिसून येते.

**मातृभाषा माध्यमासाठी प्रयत्न करण्याची गरज :**

**उपायांच्या दिशेने वाटचाल :**

भारतात स्वातंत्र्यानंतर साक्षरता मुंगीच्या गतीने पुढे पुढे सरकत आहे. पिढ्यान्‌पिढ्या जे शिक्षणातून वंचित

राहिलेले, असे तळागाळातील मुले व मुली, आदिवासी, अल्पसंख्याक, ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्या वाड्यावस्त्यांपर्यंत अद्यापही शिक्षक पोहोचलेले नाहीत अशांसाठी 'मातृभाषा' हे माध्यम अधिक स्वाभाविक व उपयुक्त आहे. निदान अशांसाठी 'मातृभाषा' हेच माध्यम अधिक स्वाभाविक व उपयुक्त आहे. निदान केजी ते पीजी पर्यंत म्हणजे शालेय स्तरावर सोईस्कर आहे. पहिलीपासून इंग्रजी हा 'एक विषय' म्हणून शिकवावा.

- विज्ञान व गणित हे विषय मातृभाषेतूनच शिकवावेत तरच विद्यार्थ्यांना त्या विषयांचे आकलन होईल.
- शालेय स्तरावर मराठी माध्यम असावेच, त्याबरोबर महाविद्यालयीन स्तरावर मराठी हा एक विषय म्हणून अनिवार्य असावा. इंग्रजी माध्यमातील शाळांत मराठी विषय अनिवार्य असावाच, पण तो उत्तमरीत्या शिकविला जावा.
- मराठी भाषेतून विज्ञान पदवीधर व्हावयाचे असेल तर विज्ञानाची पाठ्यपुस्तके व संदर्भाची पुस्तकेही मराठीतून उपलब्ध करून द्यावीत. केवळ कथा, कादंबऱ्या, चरित्रे, आत्मचरित्रे मराठी भाषेत भाषांतरित करण्याबरोबर विज्ञानाची पुस्तकेही भाषांतरित करावीत. मुलांना मराठीतून शिक्षण घेण्याचा हक्क मिळालाच पाहिजे. आज शास्त्रीय परिभाषाकोश मोठ्या प्रमाणात तयार केले जात आहेत. विद्यार्थ्यांना त्यातील पारिभाषिक शब्द सहज समजावेत म्हणून ते सोपे व सुटसुटीत करावेत.
- तळागाळातल्या लोकांपर्यंत विकास पोहोचण्यासाठी 'लोकविज्ञान' हे पायाभूत मानले पाहिजे, कारण लोकविज्ञान मातृभाषेतूनच बहरू शकते. आज आघाडीवर असलेल्या प्रगत राष्ट्रांनी अशाच मार्गांनी प्रगती केली आहे.

''जागतिकीकरणाच्या रेट्यातही आज परिस्थिती बदलत आहे. आजचे तरुण व्यवहारापुरते इंग्रजी व अभिव्यक्तीसाठी मराठीचा वापर करून परस्परांत संवाद साधत आहेत. जागतिक स्तरावरच्या माध्यमामध्ये मराठी लिहिण्याची सुविधा निर्माण करून ब्लॉगिंग, फेसबुकमध्ये व व्हाट्सअपवरही मराठीतून चॅटिंग (संवाद) केले जातात. मराठीच्या संवर्धनासाठी हा महत्त्वाचा संदेश आहे.''

मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये जर मराठी लोक असतील तर मराठीतून संवाद सोपा होतो. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी मराठीत परिपूर्ण शब्द आहेत, असे सॉफ्टवेअर इंजिनियर सांगतात.

- ई-बुकच्या माध्यमातून मराठी वाङ्मयातील उत्तम साहित्य इंटरनेटवर उपलब्ध झाले आहे. कविता, ललित, सामाजिक, राजकीय, प्रवास, कला, समीक्षा इत्यादी विषयावर मराठीत ब्लॉग लिहिले जात आहेत.
- मराठी हितवर्धिनी सभा ही तरुणांची संस्था मराठीचा प्रसार व संवर्धनासाठी काम करते.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेच्या नव्या अभ्यासक्रमात मराठी व इंग्रजी दोन्ही भाषा विषय वर्णनात्मक स्वरूपाचे आहेत. त्यामुळे गुण मिळविण्याची सर्वोत्तम संधी म्हणून मराठीकडे पहावे. मराठी अनिवार्याचा अभ्यासक्रम ठरविताना विद्यार्थ्याकडे मराठीच्या उपयोजनाची क्षमता आहे की नाही हे तपासण्यासाठी व्यावहारिक मराठीचा त्यात अंतर्भाव केलेला आहे.
- प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील नवीन अभ्यासक्रमातील मराठीची पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांचे भावविश्व समृद्ध करणारी, उत्तम संस्कार करणारी, भाषेविषयी आवड उत्पन्न करणारी, कृतिशीलतेला व उपक्रमशीलतेला वाव देणारी, पाठ्यपुस्तकातील ज्ञानाची दैनंदिन व्यवहाराशी सांगड घालणारी आहेत. त्यातील संपन्न विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत ही अपेक्षा आहे.

- मराठी ही एक समर्थ व समृद्ध भाषा आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात तिचा वापर वाढत आहे. न्यायक्षेत्र, बँकिंग क्षेत्र व कृषिक्षेत्रात तिचा संचार विस्तारत आहे.
- महाराष्ट्र शासनाने अमराठी नोकरदारांसाठी राजभाषा परिचय, प्रशासन वाक्यप्रयोग, प्रशासकीय शब्दकोश मराठी इंग्रजीतून उपलब्ध करून दिले आहेत. त्या पुस्तकांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.
- समारोप : महाराष्ट्रात प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचे माध्यम मराठीच असावे.
- समाजात शिक्षणाची दोन माध्यमे असू शकतात. पण दोन्ही माध्यमांना 'समान मूल्ये' असावीत.
- बालवयात मातृभाषेतून शिक्षणाचा पाया भक्कम व्हावा. नंतर इंग्रजी भाषेवरही प्रभुत्व मिळवावे.
- व्यक्तिमत्त्व विकासासाठी व करिअरसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा उत्तम यायलाच हव्यात.
- एखाद्या माध्यमाला नावे ठेवण्यापेक्षा त्या माध्यमातून शिक्षण कसे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देता येईल, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

☆☆☆

# किस्से साहित्यिकांचे

## ना. धो. महानोर – पु. ल. देशपांडे

### ना. धो. महानोर यांचा 'रानातल्या कविता' हा कवितासंग्रह वाचल्यावर पु. ल. देशपांडे यांची पत्ररूपी प्रतिक्रिया



ना. धो. महानोर



पु. ल. देशपांडे

प्रिय महानोर,

शेवटी राम पटवर्धनाकडून पत्ता मिळवला. रानातल्या कवितांनी माझी दिवाळीच काय पण हे साल साजरे झाले. फार वर्षापूर्वी मी एका व्याख्यानात म्हटले होते. (ही शिंपी साहित्यिक सवय!) की उद्याच्या कवींचे माझे चित्र शेतात राबता राबता बालकवींची कविता गुणगुणणारा कवी असे आहे. तुम्ही पळस खेड्यास कवितेच्या जोडीला खरीखुरी हिरवळ उगवीत असता असे रामच म्हणाला. धन्य वाटले. म्हणजे मी देखील एक आपला त्यातला त्यात प्रॉफेट.

काय सुरेख लिहिता !

पुढे मागे मी औरंगाबादला आलो तर आधी तुम्हाला कळवीन. मग भेटू आणि बोल बोल बोलू ! दुर्दैवाने मी फारच पब्लिक झाल्यामुळे – अखंड रात्री जागवण्याच्या माझ्या लाडक्या चैनीलाही पारखा झाला आहे. तुमच्या शेतात भरपूर पाऊस पडो आणि जे काही पिकवीत असाल त्यांच्या संगतीत कविताही खूप फुलो हा आशीर्वाद !

आपला,

– पु. ल. देशपांडे

# महिला सक्षमीकरणाची वाटचाल

सौ. निर्मला ल. बऱ्हाटे

## महिला दिनानिमित्त...

आदिशक्तीचे रूप म्हणजे स्त्री ! फार पूर्वी वेद अध्ययनात गार्गी-मैत्रेयी अग्रेसर होत्या. मध्यंतरीच्या काळात स्त्रीचा प्रवास क्षीण झाला. स्त्री म्हणजे फक्त सेवा करणारी राहिली. घरात व शेतात राबताना ज्ञानाचे भांडार तिच्यापासून दूर राहिले. ब्रिटिशांच्या काळापासून स्त्रियांच्या स्थितीत हळूहळू सुधारणा होत गेली. याचे कारण याच काळात स्त्रीला शिक्षणाच्या प्रकाशवाटा दाखविणारे अनेक महात्मे येथे जन्मले. उदा. स्त्री-शिक्षण पुरस्कर्ते स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्त्री-शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले व इतर अनेक व्यक्ती की, ज्यांनी 'अबला' समजल्या गेलेल्या स्त्रीला 'सबला' बनविण्यासाठी अथक प्रयत्न केले.

समाजरूपी रथ विकासाकडे दौडवायचा असेल तर 'पुरुष'रूपी चाकासोबत 'स्त्री'रूपी चाकालाही विकासाची तेवढीच चालना मिळणे गरजेचे आहे, एवढेच नव्हे तर -

*'सुशिक्षित आई, पूर्ण कुटुंबाला पुढे नेई'*

जिजाबाईंनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले म्हणून महाराष्ट्राला स्वराज्याचे कोंदणे मिळाले. हाच जिजामाता पुरस्कार मिळविणाऱ्या श्रीमती माशेलकर यांनी आपल्या मुलाला (डॉ. रघुनाथ माशेलकर) 'आंतरराष्ट्रीय जागतिक कीर्तीचा एक शास्त्रज्ञ' म्हणून घडविताना अतोनात कष्ट घेतले.

आपण भारतीय संस्कृतीत महिलांना 'लक्ष्मी' मानतो, पण तिच्या हातात आर्थिक सत्ता देत नाही. महिलांना आपण सरस्वती मानतो, पण मुलींच्या शिक्षणावर खर्च करणे आपल्याला भविष्याची गुंतवणूक वाटत नाही. महिलांना आपण 'रणरागिणी' म्हणतो, पण तिला व्यक्त होण्याचे, स्वत:चे मत मांडण्याचे स्वातंत्र्य आपण देत नाही. तिच्या श्रमाची गणना अनुत्पादक श्रमांमध्ये होते.

*'समान मानव माना, स्त्रीला,*
*तिची अस्मिता खुडू नका.*
*दासी म्हणून पिटू नका.*
*वा देवी म्हणूनी भजू नका.'*

कविवर्य कुसुमाग्रजांच्या या काव्यपंक्तींमधून स्त्रियांबाबत समाजात व्यक्त होत असलेल्या वर्तणुकीची अपेक्षा स्पष्ट होते. भारतीय स्वातंत्र्याला ६० वर्षे उलटून गेल्यावरही समाजात स्त्रीच्या बाबतीत समानतेचा दृष्टिकोन अपेक्षेप्रमाणे विकसित होऊ शकला नाही ही खेदाची बाब आहे

८ मार्चला आपण सर्व जण दरवर्षी 'जागतिक महिला दिन' मोठ्या उत्साहात साजरा करतो. निरनिराळे कार्यक्रम आयोजित केले जातात, भाषणं होतात, पण खरंच महिलांचा विकास, महिलांचं सक्षमीकरण होत आहे का ? या

प्रश्नांचं उत्तर शोधलं तर असं दिसून येतं की, शासन, निमशासकीय स्तरावर, स्वयंसेवी संस्थांमार्फत महिलांच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले जाताना दिसत आहेत. त्या उपक्रमांबरोबर समाजाची मानसिकता बदलणे ही काळाची गरज असून त्या दृष्टीने प्रामाणिक व सामूहिक प्रयत्नांची नितांत गरज आहे.

आंतरराष्ट्रीय महिलादिनाची सुरुवात स्त्रियांच्या सामूहिक प्रयत्नांनी १८०८ साली अमेरिकेत झाली. ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्क येथे महिलांनी कापड कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रिया व मुले यांच्या कामांचे तास कमी करावेत व मजुरी वाढवावी म्हणून संघटित होऊन लढा पुकारला होता. स्त्रियांनी संघटित होऊन स्वत:चे अधिकार मागण्यासाठी केलेला जगातील हा पहिला संघर्ष होता. १९१० साली विविध देशातील महिला प्रतिनिधींची आंतरराष्ट्रीय परिषद कोपनहेगन येथे झाली. त्यामध्ये जर्मनीतील कार्यकर्ती क्लारा झेटकी हिने सुचविल्याप्रमाणे ८ मार्च या दिवसाला 'जागतिक महिलादिन' म्हणून मान्यता मिळाली. ८ मार्च १९१४ मध्ये जर्मनीतील महिलांनी युद्धखोरीविरुद्ध आवाज उठविला. ९ मार्च १९१७ साली रशियातील कापड कामगार महिलांनी निदर्शने केली. १९७५ हे वर्ष राष्ट्रसंघाने 'महिला वर्ष' म्हणून जाहीर केले होते. विकसनशील राष्ट्रांत स्त्रियांची परिस्थिती निकृष्ट असल्याचे लक्षात आल्याने राष्ट्रसंघाने १९७५-१९८५ हे दशक स्त्री-विकास दशक म्हणून पाळण्याचे ठरविले. त्यानंतर नैरोबी व बीजिंग येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषदा पार पडल्या. त्यातही स्त्रियांच्या प्रश्नांचा साकल्याने विचार झाला.

भारत सरकारनेदेखील स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी १९९० साली स्त्री-हक्क आयोगाची स्थापना केली. महाराष्ट्र सरकारने १९९३ साली राज्य महिला आयोगाची स्थापना केली. महिला सक्षमीकरणाचा एक निर्देशक म्हणजे स्थावर मालमत्तेवर तिचं नाव असणं आणि ती आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असणं होय. हे लक्षात आल्याने पतीच्या घरातील पत्नीचा हक्क, मुलींचा वारसा हक्क कायद्याने मान्य करण्यात आला आहे. १९९४ मध्ये महिला धोरण करून त्याची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य ठरलं आहे. इ.स. २००० साली क्रांतिकारी निर्णय घेऊन महाराष्ट्र शासनाने शाळेच्या दाखल्यावर विद्यार्थ्यांच्या वडिलांच्या नावाबरोबर आईचेही नाव लावण्याची सक्ती केली.

महिलांवरील अत्याचारांचे निराकरण करणं, महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणं, स्त्री-संवेदनशील धोरणांना प्रोत्साहन देणं, प्रसारमाध्यमांचा वापर करून महिलांच्या हक्कांप्रति जनमागृती करणं, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच समाजातील अन्य क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी भारत सरकारने ७३ आणि ७४व्या कलमांमध्ये घटनादुरुस्ती करून नागरी आणि ग्रामीण संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्राने या संदर्भात केलेली कार्यवाही अतिशय भूषणावह आहे. शासकीय नोकरीमध्येही महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला पदाधिकाऱ्यांना शासकीय कामासाठी एस.टी. ने मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. एके काळी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा असलेल्या श्रीमती प्रतिभाताई पाटील देशाच्या सर्वोच्च पदावर कार्यरत होत्या. स्व. इंदिरा गांधी यांच्यासारख्या कर्तृत्ववान महिलेने या देशाचं पंतप्रधानप्रद भूषविले आहे. आताच्या संगणक युगात सर्वच क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत. ही महिलांच्या प्रगतीची पदचिन्हंच नाहीत काय ? जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या महिलांची संख्याही लक्षणीय आहे.

महिलांना केंद्रस्थानी ठेवून नियोजन करताना जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वउत्पन्नाच्या १० टक्के निधी महिला व बालकांसाठी खर्च करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. इ. पहिली ते दहावीपर्यंत शिकणाऱ्या आणि शाळा लांब असलेल्या मुलींना मोफत सायकल देणं, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांना मोफत शिलाई मशीन उपलब्ध करून देणं, ग्रामीण भागात महिलांसाठी रोगनिदान शिबिराचं आयोजन, आदर्श अंगणवाडी, बालवाडी सेविकांना पुरस्कार, अंगणवाड्या/बालवाड्यांना साहित्य पुरवणं, महिलांसाठी समुपदेशन, सामूहिक विवाह, महिला प्रतिनिधींची अभ्याससहल, गणवेशवाटप, महिलांना-मुलींना व्यवसाय व तंत्र प्रशिक्षण, महिलांना कायदेशीर सल्ला, महिलांसाठी हेल्पलाईन, स्वर्णजयंती, स्वयंरोजगार योजनेअंतर्गत महिला बचतगटाची स्थापना, इ. अनेक योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येतात. आरोग्य विभागाची जीवनदायी आरोग्य योजना, आदिवासी भागात अमलात असलेली नवसंजीवन योजना आणि ग्रामविकास विभागाची इंदिरा आवास योजना यांसारख्या योजनांमध्ये पुरुषांमध्ये बरोबरीने महिलांनाही लाभ देण्यात येतो.

महिलांसाठी सनद, महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुरेसा निधी, कृषी आणि ग्रामीण विकासात महिलांचं वाढतं योगदान, १२वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण, महिलांसाठी व्यवसाय शिक्षणाचे प्रशिक्षण या योजनेअंतर्गत एकूण उपलब्ध जागेच्या २५ टक्के जागा महिला प्रशिक्षणार्थ्यांसाठी राखीव, महिलांसाठी अनुदानित महाविद्यालये, मुलींसाठी सैनिकी शाळा यांसारख्या योजना महिलांसाठी राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर गावातील ५०% किंवा त्यापेक्षा अधिक महिलांनी मागणी केल्यास व ते सिद्ध झाल्यास गावातील दारूचं दुकान बंद करण्याचा निर्णय, काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे यांसारखे महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतलेले आहेत.

संयुक्त राष्ट्र महिला कोष (युनिफेम) आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सच्या सहकार्याने राज्यातील काही पोलीस ठाण्यांमध्ये महिला व बालकक्ष सुरू करण्यात आले आहेत. हे कक्ष तक्रार नोंदणीचं काम करतानाच पीडित महिला आणि बालकांना आश्रय मिळवून देणे, कौटुंबिक समस्यांचे निराकरण करणं यांसारखी कामं करत आहेत. महिलांवरील अत्याचारांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी अकोला, अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, बुलडाणा, बीड, जळगाव, नागपूर, यवतमाळ, कोल्हापूर, रायगड आणि ठाणे येथे प्रत्येकी एक अशी १२ विशेष न्यायालयं सुरू करण्यात आली आहेत. विकासाबाबत एवढे असले तरी महिलांच्या संदर्भात लिंगभेद, मुलींचे, महिलांचे पालन-पोषण, तिच्या समान हक्कांचं रक्षण याबाबतीत बरंच काही करण्यास वाव आहे.

मुलींच्या आरोग्य संदर्भात पोषण आहाराच्या कमतरतेमुळे निर्माण होणारे आजार, रक्तक्षय, बालविवाह व लगेच प्राप्त होणारे मातृत्व, सततची गर्भारपणे हे लक्षात घेऊन शासनाने 'मातृत्व अनुदान योजना, 'जननी सुरक्षा योजना, 'सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना', यांसारख्या योजना राबवून महिलांच्या आरोग्यरक्षणासाठी पावलं उचलली आहेत. बालविवाह, त्यानंतर येणारे मातृत्व व त्यातून निर्माण होणारं माता-बालकांमधील कुपोषण हे एक दुष्टचक्र आहे. बालकांमधील कुपोषण दूर करण्यासाठी राज्यात 'राजमाता-जिजाऊमाता-बाल आरोग्य आणि पोषण मिशन' खूप चांगलं काम करीत आहे. 'चला मुलींचे स्वागत करू या' यासारखी किंवा 'पहिले ताट मुलीला' यासारखी नावीन्यपूर्ण कल्पना राबवून आज राज्यात मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. 'किशोरी शक्ती' या योजनेअंतर्गत ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींना पोषण, आरोग्यविषयक दर्जा, स्वच्छता, अनौपचारिक शिक्षण, घरगुती व व्यावसायाभिमुख प्रशिक्षण दिलं जात आहे.

अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषणआहार वितरणाचे सुमारे ९० टक्के काम महिला बचत गटांना दिल्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने शासनाने आणखी एक महत्त्वाकांक्षी पाऊल टाकलं आहे. राज्यात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'महिला आरोग्य विकास महामंडळा' द्वारे भरीव कार्य केलं जात आहे. माविममार्फत तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम, माविम महिला प्रांगण, कृषिसप्तक योजना, स्वयंसिद्धा राष्ट्रीय सम विकास योजना, आदिवासी विकास प्रकल्प, महिला स्वावलंबन निधी, रमाई महिला सक्षमीकरण योजना राबविल्या जात असून यांबरोबर 'महिला बचत गटांना ४ टक्के दराने व्याज' दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था शासनानं केली आहे. राज्यात २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदीदिन म्हणून साजरा केला जात असून हुंडा देणं व घेणं हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक' कायद्याची राज्यात अंमलबजावणी सुरू आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होऊ नये म्हणून 'विशाखा गार्डन लाईन्स'ची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे. यासाठी राज्यभर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली असून महिला, मुली आणि बालकांचा अवैध मानवी व्यापार रोखण्यासाठी 'राज्य कृतिदला' ची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात 'देवदासी प्रतिबंधक कायदा' मंजूर करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी चालू आहे. शेतकरी आणि शेतमजुरांच्या मुलींच्या विवाहासाठी 'शुभमंगल सामूहिक विवाह' योजनेसारखी उपयुक्त योजना राज्यभर राबविली जात असून त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

अलीकडच्या काळात 'महिला समुपदेशन केंद्रे' नावाची खूप चांगली योजना शासनाने राबविण्यास सुरुवात केली आहे. राज्यात गृहविभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली हे कृतिदल स्थापन झाले असून मुंबईत टाटा समाजविज्ञान संस्थेच्या मदतीने महिलांसाठी समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. 'जिजामाता महिला आधार विमा' योजनेअंतर्गत केशरी आणि पिवळ्या शिधापत्रिकाधारक कुटुंबातील २१ ते ७० वयोगटातील कुटुंबप्रमुखाचं अपघात निधन झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा मुली-मुलांस २५ हजार रुपयांचं एकरकमी अर्थसाहाय्य 'नॅशनल विमा कंपनी' कडून देण्यात येते. उदा. अपघातात व्यक्तीला कायमस्वरूपी अपंगत्व आलं असेल तर २५ हजार रुपयांचं अर्थसाहाय्य विमा कंपनीकडून देण्यात येतं. महिला विकासाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, स्वयंसेवी संस्थांना 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' तर कृषिक्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या महिला शेतकऱ्यांना 'जिजामाता कृषिभूषण' पुरस्काराने गौरविण्यात येते. 'महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या या विविध योजनांचा लाभ महिलांना मिळाला तर त्या खऱ्या अर्थाने सक्षम होतील व प्रत्येक महिला - 'नव्या युगाची महिला मी, आहे समर्थ मी, जगेन माणूस म्हणूनी' असे आत्मविश्वासपूर्वक म्हणू शकेल. आज सर्वच क्षेत्रे पादाक्रांत केलेल्या महिलांकडे पाहिलं तर महिला पुरुषांपेक्षा कुठेही मागे नाहीत. खचितच त्या त्यांच्यापेक्षा काकणभर सरसच आहेत असं आपल्याला दिसून येतं. 'वंशासाठी दिवा' म्हणून मुलाचा आग्रह धरणाऱ्या कुटुंबात मुलीच आई-वडिलांचा मोठा आधार होताना दिसत आहेत. परिवर्तनाचं हे सगळं वारं वाहत असताना आणि शासन मुलींच्या-महिलांच्या विकासासाठी कटिबद्ध असताना कोवळ्या कळ्यांना उमलू देणं आणि त्यांची जपणूक करून त्यांना सक्षम बनविणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य ठरतं. महिलादिनानिमित्ताने आपण सर्वजण यासाठी वचनबद्ध होऊ या !

☆☆☆

# पहिल्या भारतीय महिला

श्री. विवेक चव्हाण
ता. शहापूर, जि. ठाणे

१. दिल्लीच्या तख्तावरील राज्यकर्ती – **रझिया सुलताना**

२. राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेस) अध्यक्षा – **ॲनी बेझंट**

३. राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेस) भारतीय अध्यक्षा – **सरोजिनी नायडू**

४. क्रांतिकारक / राष्ट्रध्वज सर्वप्रथम फडकविणारी – **भिकाई कामा**

५. मेयर – **अरुणा असफ अली**

६. मुख्यमंत्री – **सुचेता कृपलानी (उत्तरप्रदेश)**

७. राज्यपाल / कुलपती – **सरोजिनी नायडू (उत्तरप्रदेश)**

८. केंद्रीय कॅबिनेट मंत्री – **राजकुमारी अमृत कौर (आरोग्यमंत्री)**

९. पंतप्रधान – **इंदिरा गांधी**

१०. लोकसभा अध्यक्ष – **मीरा कुमार**

११. राष्ट्रपती – **प्रतिभा पाटील–शेखावत**

१२. संयुक्त राष्ट्रसंघ (यूनो) आमसभा अध्यक्ष तसेच रशियातील राजदूत – **विजयालक्ष्मी पंडित**

१३. परदेशातील राजदूत – **सी. ब. मुखाम्मा**

१४. प्रशासकीय अधिकारी – **पद्मा रामचंद्रन**

१५. आय.ए.एस. अधिकारी – **अन्ना राजम जॉर्ज**

१६. आय.पी.एस. अधिकारी – **डॉ. किरण बेदी**

१७. परराष्ट्र सचिव – **चोकिला अय्यर**

१८. लेफ्टनंट जनरल – **पुनिता अरोरा**

१९. वायुदल अधिकारी / एअर कमोडर / एअर व्हाईस मार्शल – **पद्मावती बंदोपाध्याय**

२०. केंद्रीय लोकसेवा आयोग अध्यक्ष – **रोझ विल्यम बॅथ्यू**

२१. स्टॉक एक्स्चेंज अध्यक्ष – **ओमाना अब्राहम**

२२. नोबेल पुरस्कार मानकरी – **मदर तेरेसा**

२३. मॅगसेसे पुरस्कार मानकरी – **कमलादेवी चटोपाध्याय**

२४. भारतरत्न पुरस्कार मानकरी – **इंदिरा गांधी**

२५. शिक्षिका / मुख्याध्यापिका – **सावित्रीबाई फुले**

२६. मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण / पहिली पदवीधर (बी.ए.) – **कॉर्नेलिआ सोराबजी**

२७. मॅट्रिक परीक्षेत प्रथम येणारी – **रिबेका रूबन**

२८. एम. ए. पदवीधर – **चंद्रमखी बोस**

२९. परदेशी शिक्षणासाठी जाणारी तसेच आंतरराष्ट्रीय विवाह करणारी – **अन्नपूर्णा (ॲना) तर्खडकर**

३०. केंब्रिजमधून डॉक्टरेट मिळविणारी – **डॉ. कमला सोहोनी**

३१. बॅरिस्टर (कायद्याची पदवीधर) – **कॉर्नेलिआ सोराबजी**

३२. वकिलीची प्रॅक्टिस करणारी – **मिठां टाटा–लाम**

३३. उच्च न्यायालयात न्यायाधीश – **ॲना चंडी**

३४. उच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश – **लैला सेठ**

३५. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश - **मीरा साहिब फातिमाबीबी**

३६. इंग्रजी कादंबरीकार (सगुणा) - **कृपाबाई सत्यनाथन**

३७. ज्ञानपीठ विजेती - **आशापूर्णा देवी**

३८. बुकर पारितोषिक विजेती - **अरुंधती रॉय**

३९. पुलित्झर पारितोषिक विजेती - **झुंपा लाहिरी**

४०. चित्रपट बालकलाकार (कालिया मर्दन) - **मंदाकिनी फाळके**

४१. चित्रपट अभिनेत्री, निर्माती तसेच - **देविकाराणी चौधरी**
पहिला दादासाहेब फाळके पुरस्कार मिळविणारी

४२. ऑस्कर पुरस्कार विजेती - **भानू अथैय्या**

४३. नाट्यलेखनासाठी आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळविणारी - **मंजूषा पद्मनाभन**

४४. वृत्तछायाचित्रकार - **होमाई व्यारावाला**

४५. आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविणारी चित्रकार - **अमृता शेरगिल**

४६. बीबीसी वृत्तनिवेदिका - **वेणू चितळे**

४७. जगत्सुंदरी - **रिटा फारिया**

४८. विश्वसुंदरी - **सुश्मिता सेन**

४९. मरीन इंजिनिअर - **सोनाली बॅनर्जी**

५०. परदेशातून डॉक्टर पदवी (एम.डी.) मिळविणारी - **डॉ. आनंदी गोपाळ जोशी**

५१. डॉक्टर - **डॉ. कादंबिनी गांगुली**

५२. प्रत्यक्ष सेवा देणारी शल्यविशारद डॉक्टर - **डॉ. रखमाबाई राऊत**

५३. नलिकाबालक (टेस्ट ट्यूब बेबी) निर्माण करणारी - **डॉ. इंदिरा हिंदुजा**

५४. पहिली नलिका बालिका (टेस्टट्यूब बेबी) - **हर्षा**

५५. शास्त्रज्ञ / वैज्ञानिक - **डॉ. कमला सोहोनी**

५६. जिब्राल्टर सामुद्रधुनी पार करणारी - **आरती प्रधान**

५७. इंग्लिश खाडी पोहणारी - **आरती साहा-गुप्ता**

५८. समुद्रमार्गे (शिडाच्या जहाजाद्वारे) पृथ्वीप्रदक्षिणा घालणारी - **उज्ज्वला रॉय**

५९. पाच खंडांत सात सागरी मोहिमा यशस्वी करणारी जलतरणपटू - **बुला चौधरी**

६०. पॅराशूटिस्ट - **गीता चंदा**

६१. द. ध्रुवावर पाऊल ठेवणारी - **रिना कौशल धर्मशक्तू**

६२. उ. व द. ध्रुवांवर पॅराजंपिंग करणारी - **शीतल महाजन**

६३. एव्हरेस्टवर जाणारी - **बचेंद्र पाल**

६४. बुद्धिबळ जगज्जेती - **सुसान पोलगार**

६५. बॅडमिंटन जगज्जेती - **सायना नेहवाल**

६६. विमानचालक - **सरला ठकराल**

६७. व्यावसायिक वैमानिक - **हरप्रीत अहलुवालिया**

६८. रेल्वे ड्रायव्हर - **सुरेखा भोसले**

६९. भारोत्तोलन (११३ किलो) वैयक्तिक ऑलिंपिक पदक मिळविणारी - **करनाम मल्लेश्वरी**

७०. अंतराळवीर - **कल्पना चावला**

७१. अंतराळात सर्वाधिक काळ वास्तव्य करणारी - **सुनीता विल्यम्स**

# प्रतिक्रिया...

माहे जानेवारी २०१५ चा अंक मी वाचला. शिक्षण संक्रमण हा अंक समाजातील सर्व घटकांना उपयुक्त आहे. या अंकात आई-बाबांची शाळा - डॉ. नीला सत्यनारायण यांनी लिहिलेला अतिशय वाचनीय आहे.

या लेखामध्ये आई-बाबांसाठी सुद्धा 'शाळा' असणं अत्यावश्यक हे कळाले. या शाळेतून मुलांवर संस्कार कसे करायचे आणि मुलांचे व्यक्तिमत्त्व कसे घडवायचे हे आई-बाबांची शाळा या लेखातून वाचता आले.

वरील लेख मला अतिशय आवडला. डॉ. नीला सत्यनाराचयण यांचे हा लेख लिहिल्याबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतो !

**- श्री. मकरंद च. पाटील**
सहशिक्षक - जवाहर विद्यालय,
अणदूर, ता. तुळजापूर

☆☆☆

शिक्षण संक्रमण डिसेंबर २०१४ मधील 'इंग्रजी विशेषांक' हा अंक विशेष आवडला. विशेषकरून The Role of English Teachers +2 Level या दिलीप घायल यांच्या लेखामधून आपल्यातील उणिवा जाणवल्या. यातील एकूण २५ मुद्दे आवडले. डॉ. व्ही. टी. पाटील यांचा पान क्र. १८ वरील तोंडी परीक्षेवरील लेख चांगला आवडला. पान क्र. ४५ मधील Teachers as a facicitator या लेखामधून एक जाणीव निर्माण होते. पान क्र. ६३ मधील Books you like to read यामुळे ग्रामर/कौशल्ये यावरील अनेक पुस्तकांची माहिती मिळते. याचा उपयोग शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही होतो.

मा. संपादकांनी हा विशेषांक काढल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. वर्षातून एकदा असा 'इंग्रजी विशेषांक' काढावा ही नम्र विनंती. सर्व शिक्षणसंक्रमणाशी संबंधितांचे आभार !

**- श्री. सतीश व. ठाकरे**
माध्य. शिक्षक - ब्राह्मणवाडा, अमरावती
संपर्क : ९४२३४२७५३३

☆☆☆

सन २०१५ या राज्य मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रथमत: राज्यमंडळास हार्दिक शुभेच्छा !

शिक्षण संक्रमणचा जानेवारी २०१५ चा 'सुवर्णमहोत्सवी विशेषांक' हातात आल्याबरोबर तो वाचण्यास सुरुवात केली. आणि राज्यमंडळाने खरोखरच शिक्षक, विद्यार्थी आणि शाळा यांच्या सर्वांगीण विकासासाठी माहिती, ज्ञान यांचा परिपूर्ण असा वाचनीय अनमोल ठेवा दिला असे मनोमन वाटले.

मी शिक्षण संक्रमणचा नियमित वाचक आहे. प्रत्येक महिन्याचा शिक्षण संक्रमण आल्याबरोबर येणाऱ्या रविवारी तो वाचून पूर्ण करतो. तो रविवार माझ्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. शिक्षक जडणघडणीत खऱ्या अर्थाने शिक्षण संक्रमण म्हणजे माझ्या दृष्टीने एक शिक्षण प्रशिक्षकच आहे. यातून मिळणाऱ्या सर्वच माहिती व तंत्राचा दैनंदिन अध्यापनात खूपच उपयोग होतो, असा माझा अनुभव आहे.

राज्य मंडळाचे व्यापक काम आणि नियमितपणे होणारे विविध उपक्रम, सर्वच क्षेत्रातील तज्ज्ञांचे सखोल माहितीपूर्ण व मार्गदर्शनपर लेख, विद्यार्थी, शिक्षक, शाळा तसेच शिक्षणविषयक सर्व घटकांना पर्यायाने समाजाभिमुख, आदर्श शिक्षण पद्धतींचा विचार नक्कीच चांगल्या गुणवत्तेकडे वाटचाल करण्यास प्रोत्साहन, प्रेरणा देणारा हा अंक दिशादर्शक आहे.

नक्कीच सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक, नैतिक, तात्त्विक आणि उच्च शिक्षणविषयक मूल्ये विकसित करणारा या नवीन वर्षातील हा पहिलाच अंक सर्व वाचकांना संग्राह्य आहे. या दर्जेदार, सूचक, अतिसुंदर अंकाबद्दल मा. संपादक सो. व सर्वांचेच मन:पूर्वक आभार आणि नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

**- श्री. ज्ञानेश्वर केंद्रे**
उपशिक्षक - न्यू इंग्लिश स्कूल,
निमगिरी, ता. जुन्नर, जि. पुणे.

☆☆☆

# प्रतिक्रिया...

शिक्षण संक्रमण - जानेवारी २०१५ हा सुवर्णमहोत्सवी विशेषांक वाचला. वाचून खूप चांगले तर वाटलेच परंतू त्यातून शिक्षणाच्या विविध संकल्पना अधिक प्रभावी असल्याने, ज्ञानात भर पडली. विविध उदाहरणातून शैक्षणिक विचार मांडल्याने सर्व लेख मनाला स्पर्शून गेले. आणि त्यामुळे जीवनाला कलाटणी मिळण्यास निश्चित उपयोगी पडेल. आणि हो, अशाप्रकारचे विशेषांक आमच्यापर्यंत पोहचवल्याबद्दल तुमच्या सर्व टिमला मानाचा मुजरा...

सर, श्री, सुरेश साळगावकर यांचा स्वानुभवातून साकारलेली शिदोरी आम्हाला उलगडून दाखविल्याने आमच्या अध्यापनाला नवीन दिशा मिळाली. डॉ. नीला सत्यनारायण यांचा बालसंगोपनावरील लेख अतिशय सोप्या भाषेतून आणि ते सोदाहरण स्पष्ट केल्याने मन अंतर्मुख झाले. आई-बाबाविषयीची जाणीव अधिक प्रगाढ झाली. डॉ. जयंत नारळीकर यांच्या लेखातून व्यवहारीपणाचे ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समजून आले, त्यातून त्यांचा दूरदृष्टीपणा उमगला. डॉ. न. म. जोशी यांच्या भविष्यवेधी शिक्षण संकल्पनेतून शिक्षणाची अधिक व्यापकता समजली. माणूस हा संकुचित आणि स्वविचारी बनत असून, शिक्षणातून माणूसपणाचे शिक्षण मिळाले पाहिजे असे सांगितले. तसेच डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक धोरण, तत्त्वज्ञान आणि त्यांच्या विदेशवारीवर जो प्रकाश टाकण्याचा प्रयत्न डॉ. बबन जोगदंड यांनी केला. तो अंतर्मुख करणारा आहे. डॉ. उमेश दे. प्रधान यांनी आदर्श शाळेची संकल्पना आणि त्यावर उपाय या गोष्टी सुरेखपणे सांगितल्या. विविध शैक्षणिक पैलूंना त्यांनी हात घालत, वैयक्तिक विकासाची कास धरण्यास सुचविले.

असलेले ज्ञान नष्ट होत जाते म्हणून ते ज्ञान सतत तेवत ठेवण्यासाठी शिक्षकाने वाचन संस्कृती जपली पाहिजे आणि स्वत:ला समृद्ध केले पाहिजे. उक्त विचार श्री. शहाजी ह. ढेकणे सरांच्या लेखातून स्पष्ट झाले. श्री. महेंद्र बैसाणे यांच्या लेखातून शैक्षणिक अंधश्रद्धा निर्मूलन यातून नवे स्पष्टीकरण साधले. तसेच एकविसाव्या शतकातील भाषा शिक्षणाचे महत्त्व हे वास्तविक विचार सौ. संजीवनी कुवळेकर यांच्या लेखातून भाषेचे महत्त्व आणि त्यातील मातृभाषेविषयीची प्रेम हेच ज्ञान भाषा असते. अशा या विचारातून भाषाविषयीचे ज्ञान लाभले मनाला धीर व घट्टपणा आला. आणि हो आपल्या या मातृभाषेतच साखरेचा गोडवा असून आपण इंग्रजीसारख्या पोरक्या भाषेसमोर हात पसरवतो असे विचार स्पष्ट झाले.

एकूणच सर्व लेख अतिशय सुरेख होते. त्यात लेखकांचे फोटो, फोन नंबर व रंगीत छटेने भरलेले कागद अशा या विविधतेमुळे हे शिक्षण संक्रमण वाचताना कंटाळा आला नाही. आणि हो, त्यातील हिंदी व इंग्रजीचे लेखही आवडले हे आवर्जून सांगावेसे वाटते.

**- श्री. गंगारेड्डी बोडखे**

सहशिक्षक - राजर्षी शाहू महाराज हिंदी विद्यालय,

वणी, जि. यवतमाळ

संपर्क : ९०११६३९६४६

☆☆☆